म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
सं. नं. ९८००

प्रसंगात.

नं २०८ सं ९८००

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(…तल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
महादेव विष्णू मोडक
नांव-सन्मित्ररहस्य दर्पण नाटक
२०८
सं. क्र.
सन्मित्ररहस्य दर्पण नाटक
नाटक

श्रीगजानन: प्रसन्नोस्तु.

# सन्मित्ररहस्यदर्पण नाटक.

महादेव विष्णु मोडक

यांनीं तयार करून

"श्रीगोवर्धन मुद्रालयां" त छापविलें.

( सर्व हक्क मालकानें राखले आहेत. )

शके १८२२ सन १९००

किंमत ८ आणे.

॥ श्री ॥

# अर्पणपत्रिका.



## वसंततिलका.

॥ श्रीमन्महागणपति स्तवितांचि भावें ॥
॥ पावे झणी विलय विघ्नगण स्वभावें ॥
॥ श्रीशारदा विनवितां मतिदे अनन्या ॥
॥ गातां स्वयें स्वपद सद्गुरु दाविधन्या ॥ १ ॥

## शार्दूलविक्रीडित.

॥ सारीं सार विचार नीति घटना दावी जणू आरसा ॥
॥ पातिव्रत्य विवेक मित्र महिमा वर्णावया फारसा ॥
॥ प्रेमे मोडक विष्णु बालक महादेवाख्यहा आपण ॥
॥ हें सन्मित्र रहस्य दर्पण गणाध्यक्षा करी अर्पण ॥२॥

## इंद्रवंशा.

॥ वाचोनि सन्मित्र रहस्य दर्पण ॥
॥ पावोत संतोष समग्र सद्गण ॥
॥ हें निर्मुनी नूतन रम्य नाटक ॥
॥ प्रार्थी माहादेव गणेश सेवक ॥ ३ ॥

# अभिप्राय.

I have read the book Mr. Modak was kind enough to send me Irrespective of the question whether vice should be presented to the public gaze in all its livid attractiveness I believe that the auther has in a great measure, succeeded in shewing that purely intellectual virtue, of spotless innocence, and with all its untried vigour of thearies and convictions, is yet sometime powerless to resit the insinuatig charms of evil when confronted with the dreadful realities of this world. A sounder basis of virtue, he depicts, would be not a guileless ignorence of evil and its methods, but a consciousness of infleneace their with stoic ability to resist it. The other characters introduced in the book are equally interesting and the inflictig loyalty of a Hindu wife; the paradoxical devotion of a lifelong friend, and the subtle dexterity of the ministers of evil are portrayed in colours almost lifelike

19-8-1900 Mukund R. Jayakur M. A.

---

## । अथ श्रीमत्स्वाभिप्रायार्यापंचक ।

---

मोडक विष्णुसुत महादेव रसिकपदिं सदैव जो लीन ॥
सन्मन रमवी तत्कृत सन्मित्ररहस्य दर्पण नवीन ॥ १ ॥
भवसागरीं सुसंगति तारि कुसंगति भलत्या बुडवि तूर्ण ॥
हें नाटक वाचीतां तात्पर्य असें मनीं ठसे पूर्ण ॥ २ ॥
धन्या पतिव्रता स्त्री लोकीं जन्मोनि ही वृथा कुलटा ॥
वाटे स्पष्टचि कीं हा घातकसा मार्ग सेवितां उलटा ॥३॥
हा नाटककार सुखें डोले होतांचि रसिक संतोष ॥
सुज्ञजन स्वीकारिति गुण केवळ ते उपेक्षुनी दोष ॥ ४ ॥
भाषा सरळ मनोरम भावार्थ यथार्थ हा अभिप्राय ॥
लोकस्थिति अनुलक्षुनि कळवाया स्वकवि यापरी गाय ।५

मु. मुंबई. श्रीक्षेत्रवालुकेश्वर } १२।८।१९००. आत्माराम मोरेश्वर छत्रे.

श्रीगणेशायनमः

# प्रस्तावना.

सालाबादप्रमाणें श्रावणमास सुरूं होतांच श्रीगणपत्युत्सव संबंधीं चर्चा सुरु झाली. त्यांत पुढारी मंडळींच्या मतें यंदाच्या सार्वजनिक श्रीगणपतीच्या उत्सवाची मजल साधारणरीत्या सालाबादप्रमाणापर्यंत जाऊन पोंचेल किंवा नाहीं या बद्दल शंकात्मकच दृष्ट झाली. त्यामुळें विशेष उद्योग करून ही उणीव भरून काढावी इतकेंच नव्हे! तर याही पेक्षां शास्त्र व लौकिकदृष्टया महत्वाचीं जीं तदंगभूत कृत्यें तीं घडून येण्या विषयीं उद्योग करावा अशी मल प्रेरणा झाली. व नुकतेंच वाचणंयत आलेलें **त्रीवेणीप्रनाथ नाटक** - याच्या अनुमानानें एक चांगलें मनोरंजककथानक तयार करता येईल असें वाटल्यावरून लिहिण्यास सुरवात करून श्रीकृपेनें लोकरच एक लेखी प्रत तयार केली. सांप्रत आपल्या समाजाला आनंदपर्यवसायी कथानकाची गोडी विशेष आहे. असें कित्येक अनुभवी मित्रांच्या सुचनेवरून समजल्यानं प्रस्तुत जनांच्या अभिरुचीप्रमाणें जितकेंहें रमणीय करवेल तितकें करण्याचा यत्न केला आहे. व अनादि पीठ व सकल उत्साहाधिपती श्रीमन्मंगलमूर्ति यांच्या सेवेसाठीं हा ग्रंथ त्यांच्या चरणींच अर्पण केला आहे. यांत कुलीन स्त्रियांचा अलंकार जें एकनिष्ठ पतिप्रेम, खऱ्या मित्रप्रेमाचें भूषण जो निष्कपटपणा व विपत्कालीं पूर्ण व निश्चल प्रेमभाव, वार स्त्रियांचें कपटाचरण, द्रव्याचा अनिवार्य लोभ, त्याकरितां पसरलेलें कपटजाल व दर्शनी प्रेम आणि अखेर बेइमान व प्रसंगीं खून करण्यालाही प्रवृत्त होण्याचे धाडस, व ईश्वरी न्यायाप्रमाणें त्याच्या गुणाला व दुर्गुणाला योग्य मोबदला हे भाग यथामति हुबेहुब वठविले आहेत. पांचव्या अंकांत

कोर्टाचा देखावा मोठा गमतीचा आहे. तथापि "आपरितोषा द्विदुषां नसाधु मन्ये प्रयोगाविज्ञानम्" असें कालिदासाचें वाक्य आहे यामुळें सबळ लोकाभिप्राया वांचून हें पुस्तक प्रसीद्धिला अणण्याचें धैर्य मला येईना. ह्मणून हें धैर्य येण्याला रा. रा. मुकुंदराव जयकर एम् ए. आर्यन् एज्युकेशन सोसायटीचे माजी प्रिन्सिपाल, व बडोदा हायस्कूलचे माजी अध्यापक व कविवर्य रा. रा. आत्माराम मोरेश्वर छत्रे या दोन थोर व सन्माननीय गृहस्थांनीं प्रस्तुत कार्य व अवकाश या दोहोंकडे लक्ष्य देऊन, इतर महत्वाचीं कामें एकीकडे ठेऊन, आपला अमोलिक वेळ या कामाला दिला व दोन तीन दिवसांतच हा खेळ समग्र काळजीपूर्वक वाचून त्यांनीं जे अभिप्राय दिले, तेच या पुस्तकाच्या प्रसिद्धीला मुख्य कारणीभूत झाले सबब या गृहस्थांचे मी आदरपूर्वक आभार मानतों. या शिवाय रा. रा. शंकर दाजी शास्त्री पदे यांनीही आपलीं इतर खासगी कामें बंद ठेऊन, सुमारें आठ दिवसांत पुस्तक छापून तयार करून दिलें, त्याबदल त्यांचेही मनापासून आभार मानतों. देश भाषेच्या सेवेचा हा माझा पहिलाच प्रयत्न आहे. व यासाठीं मिळालेला अवकाश फारच थोडा, ह्मणून जें कृत्य घडून आलें तें श्रीमन्मंगलमूर्तीच्याच कृपेचें फल यांत बिलकूल शंका नाहीं. आतां माझ्या उदार आर्यबांधवांनां इतकीच नम्र विनंती करतों कीं अशा एकंदर घाईमुळें नजरचुकीनें राहिलेले बारिक सारिक दोष कुठें कुठें आढळतील, तरीं आशा अल्प दोषांकडे दुर्लक्ष करून, केवळ हंसक्षीर न्यायानें या प्रयत्नालात उत्तेजन देतील.

गणेश भक्त.

**माहादेव विष्णु मोडक.**

श्रीगणेशायनमः

# सन्मित्ररहस्यदर्पण नाटक.

अंक १---५.

स्थळ---एक बाग.

पात्रें--तात्यासाहेब आणि रघुनाथराव (संध्याकाळीं कचेरीतून निघाल्यावर हवा खाण्या करितां फिरत फिरत एका बागेंत जातात व तेथें असलेल्या एका बाकावर बसतात.)

तात्याः—मित्रा हे पहा आपल्यांत येक जुनी ह्मण आहे कीं उत्तम व्यापार, मध्यम शेती, आणि कनिष्ट नोकरी त्या प्रमाणें नोकरी जी पूर्वी अगदीं कनिष्ट मानली आहे, तिच्या वांचून बहुतेकांनां उपजीविकेचें दुसरें साधनच नाहीं असें झालें आहे.

सोन्या सारखा आमचा हा हिंदुस्थान देश असल्या मुळें हा अशा स्थितिला येऊन पोचेल असं कोणाच्या स्वप्नींही आलं नसेल. मूळ हिंदु धर्माचं खोब्र झालं त्यामुळें धंदे बसले, शेतकीचा बाजा वाजला, अत्यंत गरिबीमुळें पोट भरण्या करितां लोक नाहीं नाहीं तीं

कर्में करूं लागले. विश्वासाला जागा नाहींशीं झाली; रंडीबाजी, नाच, तमाशे, आणि दारू गांजा, अफीण हीं दुर्व्यसनें दिवसानुदिवस वाढत चाललीं. त्यामुळें विचार शक्ति व शारीरिक शक्ति या दोन्हीही अगदीं लयाच्या पंथाला लागलीं. कां मी ह्मणतों हें खरं कीं नाहीं. ?

**रघुनाथः**—वाहवा आज तुह्मी तर बुवा अगदीं साधूच बनला. अब्बब! केवढा हा तत्वविचार. येखाद्याला वाटले कीं आपण ह्मणजे पुन्हां रामदास स्वामीनीच अवतार घेतला कीं काय? मित्रा आज आपल्याला जर उणें पुरे चार पैसे मिळत आहेत तर ही काळजी वाहून मनाला संताप कां करून घ्यावा. गाणं, बजावणं, नाच, टीफीण, प्लेझरपार्टी करून आयुष्याचे दिवस आनंदांत घालवावे. जागोजाग च्यार नाजुक माणसें विजे प्रमाणे चमकणारी देवानें उत्पन्न केलीं आहेत त्यांचा परामर्ष जर आपण घेतला नाहीं तर कोण घेईल? स्वभार्या ह्मटली ह्मणजे वंशोत्पत्तीच्याच मात्र उपयोगी पण, विषयसौख्य विना ( नाकाला बोट लावून खूण करतो ) होणारच नाहीं ! मान मरातब आदबी मधुर भाषण व मना प्रमाणें वर्तन करावं तर ाच रंगेल्यांनीं. आज पर्यंत तुला अनुभव नाहीं असं

दिसतं जर असता तर खचीतच या वसंत ऋतूच्या दिवसांत, सायंकाळच्या थंडगार वेळीं आणि गाढ छायेंत व मंद वायूच्या झुळकेंत तुला हा देशाच्या काळजीचा विषय आठवला नसता. या जगांत विषयाचं थोडेसं सौख्य अनुभवून घे ह्मणजे तुझी खात्री होईल कीं मित्र रघुनाथ ह्मणतो त्यांत लवभरही मिथ्यत्व नाहीं.

तात्याः—काम क्रोध आदि जे मनोविकार आहेत त्यांचा अगदींच त्याग केला असतां सृष्टि क्रमच बंद राहील ह्मणून तो असणें हे जगाच्या नियमाला अनुसरूनच आहे. परंतु त्या गुणाचा अतिरेक अथवा अतिशयपणा मात्र दोषास कारण होतो. ह्मणून ह्मणतो कीं मी त्या सौख्याचा भुकेला नाहीं. तुला पाहिजे तर मी आतांच धन्य असं ह्मणतों. गृहस्था ज्या नादान हजारो लोक शरीराला, मालमत्तेला आणि अब्रूला मुकले त्या नादानं सर शेवटीं आपण फजितीला पात्र होऊन इह पर दुःख भोगणं एवढं माझ्यावर किंवा तुझ्यावर काय संकट आलं आहे. तुझ्या मनांत हें वेड असल्यास तूं तें काढून टाक. या वेडाचे परिणाम लोकांचे जे आपण पाहतो व ऐकतो तेवढ्या वरूनच आंगावर रोमांच उभे राहतात. मला सांग कीं या व्यसनानं आजपर्यंत कोण बरं नावालौकिकाला चढला आहे. ?

रघुः-तर काय बाहेरख्याली, तेवढ्यांनां लोक छिः थुः करतात ? किंवा पायपोसानं मारतात ?

तात्याः--तरमग मी येवढात्रेळ जें बोललों तें "उपड्या घड्यावर पाणी" या ह्मणी सारखंच झालं ह्मणायचं.

रघुः--मित्रा तुझं मन एखाद्या ह्मातान्या भिक्षुकासारखं वेडगळ होऊन राहिलं आहे. मी सांगतों कीं हा वेडा समज तूं मनांतून काढून टाक.

तात्याः-मीं असं ह्मणत नाहीं कीं विषयोपभोग अगदीं निंद्य आहे. आपल्या स्त्री पुरताच मात्र तो योग्य व अन्यत्र निंद्य असं मी ह्मणतों.

रघुः--आपण थोर आहा व शुक्राचार्यांच्या जागीं आपल्याला मानावं असें मी सर्वांस सुचवीन, समजला. बाबा ! अजून तुझ्या वरून इंगा फिरला नाहीं ह्मणून या गोष्टी. जेव्हां कज्जल विषदिग्ध कटाक्ष बाण तुझ्या छातींत लागून घर करील तेव्हां तूं मला मागेंसर ह्मणशील.

तात्याः--मित्रा मी खात्रीनं सांगतों कीं या बाबतींत माझं हृदय पोलादाला मागे हटवील. आणि माझ्या वर कोणत्याही रूपसंपन्न तरुणीनें कसाही कटाक्ष बाणाचा जरी वर्षाव केला तरी माझे मनाला लेश मात्र विकार उत्पन्न होणार नाहीं.

रघु:—आपली नुकतीच कुठ पंचविशी उलटते आहे; इतक्यांत नाकानं कांदे सोलण्याचे दिवस आले नाहींत. तुला माहीत आहे कीं विश्वामित्राने दुर्घट तपश्चर्येचा निश्चय केला होता त्याला सुद्धा मोह उत्पन्न होऊन शेवटीं तो कुत्रा होऊन मेनिकेच्या बरोबर गेला. आपण आपल्याला काय त्याच्याही वरच्या कडीचे तपोनिधी समजतां वाटतं ?

तात्या:—तें कसंही असो, पण तुला नाही का माहीत कीं घरांत सुद्धां माणसांच्या देखत माझ्या स्त्रीनें माझ्याकडे पाहिलं तर मला लाज वाटते व हें त्यांच्या लक्षांत आलं असल्यास कदाचित् तीं उघड बोललीं नाहींत तरी हा लबाड आहे असं मनांत ह्मटल्या शिवाय राहणार नाहींत असं वारंवार मनाला खात असतं, त्या मला ही बाहेरख्यालीची गोष्ट क्षणभरतरी सहन होईलका ? मनुष्याचा जन्म वारंवार येणार नाहीं असं असून जो एक वेळ मिळाला तो अशा कुवर्तनांत व्यर्थ [illegible] जगांत कोण असेल तो असो; धिःकार असो त्या रंडीबाज पाजी लोकांनां.

रघु:—शाबास शाबास! गौतममुने? आज तत्त्वज्ञानाचा आपण कळस केलात. पण हेच आपण याच विषयाबद्दल कधीं उलट प्रतिपादन करूं नका ह्मणजे मिळवलं.

रघु:—

रघु:–तर काय बाहेरख्याली, तेवढ्यांनां लोक छि: थु: करतात ? किंवा पायपोसानं मारतात ?

तात्या:--तरमग मी येवढावेळ जें बोललों तें "उपड्या घड्यावर पाणी" या ह्मणी सारखंच झालं ह्मणायचं.

रघु:--मित्रा तुझं मन एखाद्या ह्मातार्‍या भिक्षुकासारखं वेडगळ होऊन राहिलं आहे. मी सांगतों कीं हा वेडा समज तूं मनांतून काढून टाक.

तात्या:–मी असं ह्मणत नाहीं कीं विषयोपभोग अगदीं निंद्य आहे. आपल्या स्त्री पुरताच मात्र तो योग्य व अन्यत्र निंद्य असं मी ह्मणतों.

रघु:––आपण थोर आहा व शुकाचार्यांच्या जागीं आपल्याला मानावं असें मी सर्वांस सुचवीन, समजला. बाबा ! अजून तुझ्या वरून इंगा फिरला नाहीं ह्मणून या गोष्टी. जेव्हां कज्जल विषदिग्ध कटाक्ष बाण तुझ्या छातींत लागून घर करील तेव्हां तूं मला मागेंसर ह्मणशील.

तात्या:––मित्रा मी खात्रीनं सांगतों कीं या बाबतींत माझं हृदय पोलादाला मागे हटवील. आणि माझ्या वर कोणत्याही रूपसंपन्न तरुणीनें कसाही कटाक्ष बाणाचा जरी वर्षाव केला तरी माझे मनाला लेश मात्र विकार उत्पन्न होणार नाहीं.

रघु:—आपली नुकतीच कुठं पंचविशी उलटते आहे; इतक्यांत नाकानं कांदे सोलण्याचे दिवस आले नाहींत. तुला माहीत आहे कीं विश्वामित्राने दुर्घट तपश्चर्येचा निश्चय केला होता त्याला सुद्धा मोह उत्पन्न होऊन शेवटीं तो कुत्रा होऊन मेनिकेच्या बरोबर गेला. आपण आपल्याला काय त्याच्याही वरच्या कडीचे तपोनिधी समजतां वाटतं ?

तात्या:—तें कसंही असो, पण तुला नाही का माहीत कीं घरांत सुद्धां माणसांच्या देखत माझ्या स्त्रीनें माझ्याकडे पाहिलं तर मला लाज वाटते व हें त्यांच्या लक्षांत आलं असल्यास कदाचित् तीं उघड बोललीं नाहींत तरी हा लबाड आहे असं मनांत ह्मटल्या शिवाय राहणार नाहींत असं वारंवार मनाला खात असतं, त्या मला ही बाहेरख्यालीची गोष्ट क्षणभरतरी सहन होईल का ? मनुष्याचा जन्म वारंवार येणार नाहीं असं असून जो एक वेळ मिळाला तो अशा कुवर्तनांत व्यर्थ [illegible] जगांत कोण असेल तो असो; धिःकार असो त्या रंडीबाज पाजी लोकांनां.

रघु:—शाबास शाबास! गौतममुने? आज तत्त्वज्ञानाचा आपण कळस केलात. पण हेच आपण याच विषयाबद्दल [illegible]धीं उलट प्रतिपादन करूं नका ह्मणजे मिळवलं.

रघु:—[illegible]

तात्याः—उलट प्रतिपादन आणि माझ्या कडून, ही गोष्टच विसरा. बरं. बोलतां बोलतां बरीच रात्र झाली. चला आतां घरीं जाऊं

रघुः--जाउ आतां. विषय काय गमतीचा चालला आहे. हा पहा आज अष्टमीचा अर्धा चंद्र कसा मध्यरेषेंवर चकाकत असून किती शोभा देत आहे. ज्ञात्यां पुरुषांनीं स्त्रियांच्या मुखाची या चंद्रा बरोबर तुलना केली आहे ती किती मौजेची आहे बरं. ! जसें चंद्र प्रकाशाच्या योगानं सर्व वनस्पति टवटवीत होतात त्या प्रमाणं स्त्रीमुख चंद्रापासून मनाला किती आनंद होतो. मृत्युलोकीं जीं अनेक प्रकारचीं सुखं आहेत त्यांत हें सुख अत्यंत श्रेष्ठ यांत बिलकूल शंका नाहीं. एका कवीनं ह्मटलं आहे कीं " नारीपीन पयोधरस्तनयुगं स्वप्नेऽपिनालिंगितं " धिक्तस्य जीवितं " ह्मणून ज्या कोणाला अशा प्रकारचं सुख अनुकूल नसेल त्याचं जीवित व्यर्थ आहे.

तात्याः—महाराज आज आपण केवळ कैवटा-उच बनला. पण पहा का ज आजपर्यंत या विषय रूपी अफाट गुहेंत एक वेळ शिरले ते तींतच कोंडून मेले. समजलास.

रघुः—जो ज्याच्या गुणाला जाणत नाहीं तो त्याची निंदा करणारच; रानांतल्या कातकऱ्याच्या स्त्रीला पृथ्वी

मोल मण्याची माळ दिली तरी ती टाकून ती गुंजाचीच माळ विशेष आवडीनें धारण करील. या न्यायानें तुलाही विषयरसाची गोडी लागली नाहीं, यामुळें तूं त्या लोकांनां नावं ठेवतोस ह्मणून तो विषय अथवा त्याला अनुसरणारे लोक निंद्य आहेत असं ह्मणतां येणार नाहीं. मी ह्मणतों आग्रह धरून या कामांत कांहीं साधायचं नाहीं. हें खचीत समजा.

तात्या:-पंत आतां वाद घालण्याला वेळ नाहीं लौकर गेलं पाहिजे. नाहींतर न करतां सवरतां उगीच घरच्या माणसांनां शंका घ्यावयाला कारण होईल.

रघु:-बरं तर चला. खरच; रात्र बरीच झाली.

( दोघे जातात. )

प्रवेश पहिला समाप्त.

---

अंक १. ला.

प्रवेश दुसरा.

स्थळ--चंद्रा नायकिणीचा दिवाणखाना.

पात्रें--चंद्रा. चंदूलाल. राजाराम. मन्याबा, आबाजी आणि रघुनाथ.

चंद्रा:-( तक्याशीं टेंकून ) कां लाल. काल आपला अस्त कुठं झाला होता.

तात्या:—उलट प्रतिपादन आणि माझ्या कडून, ही गोष्टच विसरा. बरं. बोलतां बोलतां बरीच रात्र झाली. चला आतां घरीं जाऊं

रघु:--जाउ आतां. विषय काय गमतीचा चालला आहे. हा पहा आज अष्टमीचा अर्धा चंद्र कसा मध्यरेषेंवर चकाकत असून किती शोभा देत आहे. ज्ञात्यांँ पुरुषांनीं स्त्रियांच्या मुखाची या चंद्रा बरोबर तुलना केली आहे ती किती मौजेची आहे बरं. ! जसें चंद्र प्रकाशाच्या योगानं सर्व वनस्पति टवटवीत होतात त्या प्रमाणं स्त्रीमुख चंद्रापासून मनाला किती आनंद होतो. मृत्युलोकीं जीं अनेक प्रकारचीं सुखं आहेत त्यांत हें सुख अत्यंत श्रेष्ठ यांत बिलकूल शंका नाहीं. एका कवीनं ह्मटलं आहे कीं " नारीपीन पयोधरस्तनयुगं स्वप्नेऽपिनालिंगितं " धिक्तस्य जीवितं " ह्मणून ज्या कोणाला अशा प्रकारचं सुख अनुकूल नसेल त्याचं जीवित व्यर्थ आहे.

तात्या:—महाराज आज आपण केवळ वेडबटाउच बनला. पण पहा का ज आजपर्यंत या विषयरूपी अफाट गुहेंत एक वेळ शिरले ते तींतच कोंडून मेले. समजलास.

रघु:—जो ज्याच्या गुणाला जाणत नाहीं तो त्याची निंदा करणारच; रानांतल्या कातकऱ्याच्या स्त्रीला पृथ्वी

मोल मण्याची माळ दिली तरी ती टाकून ती गुंजाचीच माळ विशेष आवडीनें धारण करील. या न्यायानें तुलाही विषयरसाची गोडी लागली नाहीं, यामुळें तूं त्या लोकांनां नावं ठेवतोस ह्मणून तो विषय अथवा त्याला अनुसरणारे लोक निंद्य आहेत असं ह्मणतां येणार नाहीं. मी ह्मणतों आग्रह धरून या कामांत कांहीं साधायचं नाहीं. हें खचीत समजा.

तात्या:-पंत आतां वाद घालण्याला वेळ नाहीं लौकर गेलं पाहिजे. नाहींतर न करतां सवरतां उगीच घरच्या माणसांनां शंका घ्यावयाला कारण होईल.

रघु:-बरं तर चला. खरच; रात्र बरीच झाली.

( दोघे जातात. )

**प्रवेश पहिला समाप्त.**

---

## अंक १. ला.

दुसरा.

**स्थळ**--चंद्रा नायकिणीचा दिवाणखाना.

**पात्रें**—चंद्रा. चंदूलाल. राजाराम. मन्याबा, आबाजी आणि रघुनाथ.

चंद्रा:-( तक्याशीं टेंकून ) कां लाल. काल आपला अस्त कुठं झाला होतां.

चंदूः—हं. हं कालची गोष्ट ! मी ह्मटलं आपल्या ध्यानांत सुद्धां नसेल. पण इथं कुठलं चुकायला. इथ ह्मटलं ह्मणजे मिनिटा मिनिटाचा हिशोब. काल आमच्या गावचा येक स्नेही आला होता तो अगदीं पाठीस लागला कीं कुठं तरी मौज पाहायला जाऊ, ह्मणून इकडे येण्याची वेळ झाली तशी मी आपल्या कडून होईल तितकी टाळाटाळ करण्याचा घाट घातला पण तो कांहीं केल्या सोडीना. मग मी त्याच्या बरोबर गेलों, पण जिवांत जिव कुठ होता. तो इथ गुंतून पडलेला.

चंद्रा—तोंडापुरती पडत पोशी करावी अशी तुह्मीच. वर पण कुठवर गेला होता.

चंदूः—वर कुठच गेलों नव्हतों. तें नवीन मंदीर बालाजीचं झालं आहेतें तळ्यावर तिथं देवाची स्थापना होती, सहज मोठी मौज पहायला सापडली. पण मी आपलं मन ठेवलेलं इथं तें कस्च बरोबर येतं. त्यामुळं मला कांहीं विशेष [illegible]
दोन नाजुकसे धक्के बसले झाल ! पण मला मिनिटा मीनिटाला आपलं स्मरण होत होतं.

चंद्राः—वाः ! येकूण आपल्याला देव बराच प्रसन्न झाला ह्मणायाचा. हें पहा चंदूलाल, मी तुह्माला साफ सांगतें कीं जर असं इदर तिदर माझ्याशीं करायच

[library stamp]

असेल तर माझ्याकडे तुमचं येण्याचं बिलकुल काम नाहीं.

राजाराम:—राव पुजा तर खूप झाली बरं ती पलिकडली चिलीम घ्या ह्मणजे जरासा बार भरतो.

चंदु:—( चिलीम देतो ) आज पासून अर्ध्या वचनातच वागायच. राजारामजी हें प्रकर्ण कांहीं निराळ्याच प्रकारचं आहे. घटकाभर कमीजास्त जरी बोलणं झालं तरी तें तापटपणामुळें अंतरीं गंगाजलाप्रमाणें निर्मल.

मन्याबा:—अक्षी बराबर बोलला राव. दोस्ती करावी तर अशा गोड माणसाचीच करावी न्हाइतर आमीबी लइ पायल्या. क्वान आलान् क्वान गेला जनू दकलबी न्हायी.

रघु:—[ मनांत ] काय लोक बेटे तोंडपुजे त्यांनां दगडाचा परीस बनवायला बिलकुल उशीर नाहीं ( उघड ) किती वाजले असतील बर.

आबाजी:—"नियर्ली कार्टर पास्ट टवेल्हव" बारा वाजून साडेदहा मिनिटें झालीं.

चंद्रा:—लाल. ह्मटलं. बर आता पुरे करा आपली कथा. लोकाना कंटाळा आला. ( रघुनाथरावला ) आज इतक्यांत जाण्याची तयारी शी?

रघु:—आतां रात्र बरीच झाली. झोपेन डोळे पुर-

चुरूं लागले. काल गाण्याला गेलों होतो. आणि आज आफीसांत कामही चेपून होतं, त्यामुळें क्षणभरसुद्धां आडव आंग करायला वेळच झाला नाहीं.

चंदुलाल–गाणं जमलं नाही ह्मणतात चांगला.

मन्याबा:–कशाच राव गाती ती बेंगरूळ चिमी. तिला ऑबी करायला न्हाइ येत आन उगच आपलं.

रघु:–गाण बरं झालं, पण आरंभालाच रात्र झाली

चंद्रा:–चिमणी कां गायला आली होती ? ती काय गाईलतं आहे ठाऊक. पण ह्मणतातना तशांतली गत; आवडीला मसण गोड. मनांत लोभ असला ह्मणजे सर्व नीट नाहींतर रंभा आली तरी तिला कोण पुसतो. असो गावांत आहेत भाझ्या दोन सवती ह्मणून मंडळी-ना उगींच समाधान तरीं होतं मग इथं कशाला मंडळी येणार ?

रघु:–( उठून ) गडे मी येतों आतां बरीच रात्र झाली.

चंद्रा:–वा हें काय बर ? अंमळ बसा.

रघु:–( बसतो ) इथे आलें ह्मणजे हेंच पडतं. सुटका होत नाहीं. आणि जावं असं वाटत नाहीं.

चंद्रा:-अहाहा ! काय चंद्राची प्रीती अगदीं कुठं ठेवायलाच जागा नाहीं. तिच्या वांचून क्षणभर करमत नाहीं आजून ओळख पडून आठ दिवस झाले नाहींत

[library stamp]

तोंच इतकं मग पुढें काय होईल ? ( इतक्यांत रघुनाथराव खेरीज बाकीच्या मंडळीस जाण्याची सुचना करते व ते जातात. )

चंद्राः–( बाहेरल्या दरवाज्यास कडी घालून रघुनाथरावाच्या तक्याशीं टेकून बसते ) मी उगीच थट्टा केली. पण त्याचा राग नाहींना आला ?

रघुः–ज्या थट्टेचा रोख केवळ आनंद उत्पन्न करण्याचाच असतो. तीचा रागाशी संबंधच व्हायचा नाहीं साखर गोड ती गोडच. आतां एक साखरेचा !

चंद्राः–( मुरकून ) हें काय असलं हें ?

रघुः–ही प्रीति. एकांतांत तिचं प्राबल्य असंच अनावर होतं. ( तिला जवळ घेतो. )

चंद्राः–थोडेच दिवस तुमच्या माझ्या ओळखीला झाले. तरी जशी दहा वर्षे झालीं असावीं असें वाटतं.

रघुः–हीच पूर्वजन्मार्जित देणगी यासाठीं आयुष्याच्या चार घटका सुखांत घालविल्या शिवाय चैनच पडत नाहीं. ( मनांत ) आज तब्बेत खुष आहे. आजची वेळ पुन्हा यायची नाहीं. आज आपले सगळे उद्देश साधतीलसं दिसतं. ( उघड ) आज चार दिवस झाले हा गोजिरवाणा गोंडस चेहरा मनावर अगदीं रेखला गेला आहे.

चंद्राः–आतां मात्र वर्णनाची कमाल झाली.

चुरूं लागले. काल गाण्याला गेलों होतो. आणि आज आफीसांत कामही चेपून होतं, त्यामुळें क्षणभरसुद्धां आडव आंग करायला वेळच झाला नाहीं.

चंदुलाल–गाणं जमलं नाही ह्मणतात चांगला.

मन्याबाः-कशाच राव गाती ती बेंगरूळ चिमी. तिला ऑबी करायला न्हाइ येत आन उगच आपलं.

रघुः–गाण बरं झालं, पण आरंभालाच रात्र झाली

चंद्राः–चिमणी कां गायला आली होती ? ती काय गाईलतं आहे ठाऊक. पण ह्मणताततना तशांतली गत; आवडीला मसण गोड. मनांत लोभ असला ह्मणजे सर्व नीट नाहींतर रंभा आली तरी तिला कोण पुसतो. असो गावांत आहेत भाझ्या दोन सवती ह्मणून मंडळी-ना उगींच समाधान तरीं होतं मग इथं कशाला मंडळी येणार ?

रघुः–( उठून ) गडे मी येतों आतां बरीच रात्र झाली.

चंद्राः–वा हें काय बर ? अंमळ बसा.

रघुः–( बसतो ) इथे आलें ह्मणजे हेंच पडतं. सुटका होत नाहीं. आणि जावं असं वाटत नाहीं.

चंद्राः-अहाहा ! काय चंद्राची प्रीती अगदीं कुठं ठेवायलाच जागा नाहीं. तिच्या वांचून क्षणभर करमत नाहीं आजून ओळख पडून आठ दिवस झाले नाहींत

[library stamp]

तोंच इतकं मग पुढें काय होईल ? (इतक्यांत रघुनाथराव खेरीज बाकीच्या मंडळीस जाण्याची सुचना करते व ते जातात. )

चंद्रा:-( बाहेरल्या दरवाज्यास कडी घालून रघुनाथरावाच्या तक्याशीं टेकून बसते ) मी उगीच थट्टा केली. पण त्याचा राग नाहींना आला ?

रघु:-ज्या थट्टेचा रोख केवळ आनंद उत्पन्न करण्याचाच असतो. तीचा रागाशी संबंधच व्हायचा नाहीं साखर गोड ती गोडच. आतां एक साखरेचा !

चंद्रा:-( मुरकून ) हें काय असलं हें ?

रघु:-ही प्रीति. एकांतांत तिचं प्राबल्य असंच अनावर होतं. ( तिला जवळ घेतो. )

चंद्रा:-थोडेच दिवस तुमच्या माझ्या ओळखीला झाले. तरी जशी दहा वर्षं झालीं असावीं असें वाटतं.

रघु:-हीच पूर्वजन्मार्जित देणगी यासाठीं आयुष्याच्या चार घटका सुखांत घालविल्या शिवाय चैनच पडत नाहीं. ( मनांत ) आज तब्बेत खुष आहे. आजची वेळ पुन्हा यायची नाहीं. आज आपले सगळे उद्देश साधतीलसं दिसतं. (उघड) आज चार दिवस झाले हा गोजिरवाणा गोंडस चेहरा मनावर अगदीं रेखला गेला आहे.

चंद्रा:-आतां मात्र वर्णनाची कमाल झाली.

रघुः--बर पण आतां आह्मीं येतो.

चंद्राः--( राग दाखवून ) यावं. जाणाराला अडकवून कोणी धरावं. तुमच्या सारख्यांना राहा ह्मणून राहाविण्या सारखं पतिव्रतापण आमच्यांत कुठं आहे? बरं आहे. नाहींच जर बसायच तर मी काय ह्मणणार? आपला जीव वेडा ह्मणून पाठीस लागावं इथ तर त्याची दाद सुद्धां नाहीं.

रघुः--आतां पुरे हा गहजब. रात्र फार झाली. घरीं दरवाजा उघडणार नाहींत ह्मणून पंचाइत. नाहींतर इथून जावं असं वाटणार कुणाला?

चंद्राः--खरंच आहेतें. आह्मीं काय घटकेच्या सोबतिणी. कोणाची जन्माची सोबती माणसं असतात; तेव्हां मन तिकडे सहजच ओढणार.

रघुनाथः--काय! काय! ही पुष्य! आह्मीं नाहीं जात झालं

चंद्राः--रोज येणं तरी कुठं? साठा वर्षांनीं कधीं सुंठ फुलायची. बर कसंही असो या वेडीच्या समजुती करतांच घटकाभर बसलों ह्मणा ह्मणजे झालं. ( गळ्यांत हात घालते. ) पण मी ह्मणते हें ब्रह्मज्ञान पुरे खरेंच सांगा काल स्वारी कां नाहीं आली.?

रघुः--ह्मणजे मघा सांगितलं तें खोट वाटलं वाटतं. शपत, गाण्याशिवाय दुसरं कांहीं कारण नाहीं. परत

आलों तों फार रात्र झाली. ह्मटलं आपण निजला अ साल; झोप कुणी मोडावी ?

चंद्राः--मला किनइ; हे पैठणी आदराचे चाळे नाहीं आवडत. "तुह्मीं" "आपण" असं कशाला ह्मटलं पाहिजे. रात्री नऊ वाजल्या पासून मी वाटेकडे डोळे लावून बसलें. मनांत ह्मटलं आतां येणं होईल, अंमळशान होईल. पण ह्मणतातना तशातलीगत. नगाऱ्याच्या घाई पुढं टिमकीची काय बढाई. गाण्याला आकाशांतून प्रत्यक्ष रंभा थपल्यानाकाची आणि पायओढीत चालणारी आली होती. तिचा मुखचंद्र पाहून पोटांत भरतं आलं असेल मग तेव्हां माझी आठवण कशाला होणार. खरं च आहेते.

रघुः-तुझी कमाल आहे. येखादा काळजाचा दगड असला तरी तूं त्याला पाझर आणशील. पण मला एक शंका येते कीं माझा एक मित्र आहे. तो तरुण, श्रीमान, अब्रूदार आणि धूर्त आहे त्याचा आणि माझा या बाहेर ख्यालीच्या बाबतींत नेहमी वाद चाललेला असतो. त्यांचं चित्त तूं आपल्याकडे ओढून घेशील किंवा नाहीं ? तो मनाचा मोकळा असून जिवाला जीव देणारा आहे. त्याचा आणि माझा हा वाद किती दिवसा पासून चालला आहे. तो अशी प्रतिज्ञा करून आहे कीं कोणतीही

तरुणी माझ्यावर पाहिजेत्यारीतीनें आपल्या सौंदर्यानं अंमल करील तरी मी विषयाकडे वळणार नाहीं.

चंद्राः--होहो!! आलं लक्षांत. मी तुमच्या बरोबर त्यांनां पुष्कळ वेळा पाहिलं आहे. मूर्ती थोडिशी भयंकर खरीच. चालणं बोलणं कसं संभावित आहे. एक दिवस मी देवदर्शनाला गेलें होतें. व तुमच्या बरोबर ती स्वारी होती तेव्हां मी त्यांनां पाहिलं, वाटेन चालायचं तें आजु बाजूला बघायचंसुद्धां नाहीं, चेहरा दिखील मोठा मोहक आहे.

रघुः—माझा तो खरा मित्र आहे ह्मणून तूं किती त्याची वाखाणणी केलीस तरी मला गोडच लागणार. पण तुमची बायकांची गोष्ट सांगतो. कीं एकदा एखादी गोष्ट लक्षांत आली कीं लागलाच तो नाद. आतां तुमची सारी रात्र याच विचारांत जायची. तो चांगला आहे, तो असा आहे, तो गोजिरवाणा आहे, हाच आतां निजध्यास लागणार. धन्य तुमची बायकांची!

चंद्राः—आणि तुमची पुरुषांची नाहीकां धन्य? तें असो; पण तुह्मी त्यांना बरोबर घेऊन कां नाहीं येत एखादे वेळीं.?

रघुः—काय तूं वेडीतर नाहीसना. अग जो बायकांकडे वाकड्या नजरेनं पाहातसुद्धां नाहीं, तो माझ्या

बरोबर इथ कसा येईल ? ह्मणून मी ह्मणतो कीं पाहूं तूं त्याला कसं आपलं वेड लावतेस ते !

चंद्राः—मी काहीं सर्वांतर साक्षकां आहे ? जर निदान एक वेळ तरी त्यांना माझ्याकडे आणाल तर मग पाहीन. आपण होऊन तर त्यांच्याकडे जातां येत नाहींना!

रघुः—मला तेंच कठीण पडलं आहे कीं तो इथं येतो कसा ?

चंद्रा—( गळ्याभोवती हात घालून )पण राग नाहींना आला माझ्या बोलण्याचा. मी ती थट्टा केली.

रघुः—परस्त्रीचा एकदां नाद लागला ह्मणजे तिच्या लाथा सुद्धां गोड लागतात. मग रागाला जागा कुठून असणार. अशा गोड भाषणांनीं प्रीति आणि विनोद या वांचून आह्माला दुसरं कांहीं दिसतच नाहीं. आतां मी येतोंच ( जाऊं लागतो )

चंद्राः—उद्यां येतांना तुमच्या त्या मित्राना घेऊन या बरकां ? तुह्माला माझ्या गळ्याचीच शपथ आहे.

रघुः—पाहीन यत्न करून. खात्रीकांहीं देतां येत नाहीं.

चंद्राः—( आपल्याशीं ) देवानं हा जर योग जुळवून आणला तर सौख्य आणि दोन पैसे दोन्ही लाभणार आहेत. पहावं आतां काय होतं तें.

प्रवेश २ दुसरा समाप्त.

---

## अंक पहिला.

### प्रवेश तिसरा.

स्थळ—एका देवालयातील चौथरा.

पात्रें: तात्या साहेब आणि रघुनाथराव

तात्या:-( रघुनाथराव कांहीं विचार करित आहे असें पाहून ) मित्रा आज कचेरींत चूक वगैरे झाली आहे कीं काय? तुझ्या मनांत कांहीं तरी विचार घोळताहेत असें एकंदर चेहऱ्या वरून दिसतं. ह्मणून म्हटलं काय आहे ?

रघु:-छे: चुकी! तसं कांहीं एक नाहीं. मनांत ह्मटलं ही रम्य जागा ज्यानं बांधली त्याच्या गुणाची प्रशंसा करण्याला तो किती याग्य आहे. प्रस्तुत या जगांत जुन्या चाली रीति बहुतेक मोडकळीला येऊन पैसा ह्मणजे परब्रह्म झाला आहे, ह्मणून त्याचा लोभ न धरितां जो लोकोपयोगाकडे त्याचा व्यय करितो, तो किती धन्य ह्मणावा बरं! हे पहा! कोणताही मनोविकार जिंकण्याला त्या विकाराचा संबंध घडलाच पाहिजे. त्याचा जर अनुभव नसेल तर त्या मनोविकाराला जिंकण्याला यत्न कसा होणार? मी ह्मणतों कीं जें ज्ञान अनुभवानं प्राप्त होतें तेंच टिकाव धरतं. या मनोविकारांचा एकदम अम्मल बसल्यानं शृंगऋषी सारखे तपोनिधी सुद्धां विकार वश झाले. तिथं तुझी आमची कथा काय ?

ह्मणून ह्मणतों कीं मनुष्यानं अगदीं नादीं लागूं नये. तरी विषय ही काय चिज आहे हें जाणलच पाहिजे.

तात्याः-पण मी ह्मणतों कीं " पुढच्यास ठेंच आणि मागचा शहाणा " ही जी ह्मण आहे ती काय खोटी आहे? अमुक एक रस्त्यानं गेलं असतां आपण संकटांत पडूं, हें ज्ञान असलं ह्मणजे बस्स आहे. त्याच मार्गनं जाऊन आपण कसें खड्ड्यांत पडतो इथ पर्यंत कां कोणी विषाची परिक्षा पाहत बसतो?

रघुः-तुला ठाऊक आहेना; अर्जुनानं भगवंताला कोणता प्रश्न केला आहेतो? तो विचारतो कीं आपल्या शरिरांत असा कोण प्रबळ आहे कीं तो ' अनिछन्नपि· वार्ष्णेय बलादिव नियोजितः " ह्मणजे अमुक एखादी गोष्ट अपाय करणारी आहे. असं आपण जाणत असतां ती करण्या विषयीं मनाला मोह उत्पन्न करून त्यांला बांधून नेल्या प्रमाणें त्या मार्गाला प्रवृत्त करतो.

तात्याः-बरं बोललास:-त्याच गीतेंत भगवंतानीं साफ सांगितलें आहेकीं, "असंशयं महाबाहो मनोदुर्निग्रहंचलं।। अभ्यासेनतु कौंतेय वैराग्येणच गृह्यते " ह्मणजे हें मन जिंकण्याला फारच दुर्घट आहे. ह्मणून ते वश होण्या करितां विषय वस्तु पासून त्याला मोह उत्पन्न होऊं नये, ह्मणून नेहमी तशी संवय करणें हा एक मार्ग अथवा

विषयवस्तूचा त्याग करणें हा दुसरा मार्ग. त्यापैकीं विषयवस्तूचा त्याग करणं हेंच तत्व मला पसंत आहे.

रघु:—असो. माझं ह्मणणं काय कीं विषयवस्तु पुढें असून तिचा मोह उत्पन्न न होऊं देण्या विषयीं सारखा यत्न मनुष्यानं करित असलं पाहिजे. आणि तुझं ह्मणणं काय कीं त्या मार्गालाच जाऊं नये. अर्था अर्थी पाहतां आपले मार्ग जरी निरानिराळे असले तरी हेतू एकच आहे. ह्मणून मी ह्मणतों कीं आजपासून तूं थोडा थोडा माण-साळत जा. ह्मणजे या जगांतील ऐहिक सुखाचा तूं भागीदार होशील.

तात्या—असो. आतां तुमचा आमचा सल्ला झाला. या करतां हा विषय एकीकडे ठेवूं या. बरं रघुनाथराव रात्रींचा दिव्याचा खेळ करून चित्रं नाचवतात तो तूं पाहिला आहेस का?

रघु:—अरे शेंकडो वेळा! तुला काय त्याचं आश्चर्य वाटलं. तो कांहीं नजर बंद किंवा मांत्रिक खेळ नाहीं.

तात्या:—तसं नव्हे. माझं मत इतकंच आहे कीं त्यांची योजना आणि हात चलाखी फारच तारीफ कर-ण्यासारखी आहे.

रघु:—( मनांत ) आता हा तिनिसांजचा वेळ आहे. याला खेळ पाहण्याचं मिष करून त्या ठिकाणीं एक

वेळ न्यावा. ( उघड ) हो. हो! बरीच आठवण झाली. आपल्या एका मित्राला हा खेळ चांगला माहित आहे. व तो मोकळ्या मनाचा असून त्या खेळा वरच त्याची उपजीविका नाहीं. या साठीं तो तें प्रकर्ण आपल्याला चांगलं समजुन सांगेल. तुझी मर्जी असेल तर चल; आतांच मजा पाहायला सांपडेल. ही वेळ आहें.

तात्याः—दुसऱ्यानं केव्हांतरी जाऊं, आतां संध्येचा वेळ झाला; घरीं वाट पाहतील.

रघुः—तर मग ही मौज पाहणं तुझ्या कपाळींच नाहीं. कारण दिवसास हा खेळ होऊ शकत नाहीं. आणि रात्रीं तुला घरांतून बाहेर पडण्याची अडचण, कारण तूं एक प्रकारचा बंदिवान पडलास. तूं सुधारलेला व जाणता ह्मणवतोस आणि इतका परतंत्र राहतोस हें तुझं तुलाच शोभतं.

तात्या.—थांब. तुझी मर्जी असेल तर मी आज येण्याला तयार आहें. पण अगोदर घरीं जाऊन संध्या जेवण आटोपल्यावर घरांत सांगून क्षणभर बाहेर जाण्याला कांहीं हरकत नाहीं. मी तयार आहें. तुझं जेवण आटोपलं ह्मणजे माझ्या घराकडून ये. मला हाक मारल्या बरोबर मी तयार आहे.

रघुः—खूप बहार केलिस. बरं बोलवायला गाडी घेऊन येऊंका? "भटजी लग्न करा तर ह्मणे तुह्मीच बायको

व्हा. " त्यातलीच ही गोष्ट. मौज पाहायला न्यायचं तुला. ते तुमच्या घरीं या; मग रावसाहेबांची अगदीं लवकर ह्मणजे निदान दोन घटकानीं तयारी झाली तर होणार, कदाचित् त्यांत सुद्धां माशी शिंकायची. रावसाहेब? इतके कांहीं आह्मी आजच बनलों नाहीं. तुझी मर्जी असेल तर माझ्याकडे ये मग बरोबर जाऊं ( मनांत ) इतकी बतावणी बस्स झाली. हा अनायासं जेवण होऊन नंतरच्या वेळीं हातीं सांपडणार आहे. दोन घटका अडकवण्याला हरकत नाहीं ( उघड ) बरं आहे रावसाहेब. तुमच्या ह्मणण्या प्रमाणंच कां होइना. पण जर लवकर तयार व्हाल तर—मी एक दोन हाका मारीन.

तात्याः--मी तयार राहतों तूं बरोबर अठाला ये.

( दोघे जातात. )

तिसरा प्रवेश समाप्तः

---

## प्रवेश चवथा.

**स्थळ**—चंद्राचा वाडा.

**पात्रें**—चंद्रा, मौलाबक्ष. संताजी. चंदूलाल, रघुनाथराव. तात्यासाहेब आणि गजाउ कुणबीण.

**गजाउः**—काय ? वन्स. आज आपल्या मुकास्नी लई टवटवी दिसति जनु; जसा कुनाला कुनी जिवाचा

जिवलग भेटल्यावानी! सांगा कीं मला. भाईर फुटायची नग काळजी कराया.

चंद्रा:—अग आज किनई माझा जीव अगदीं विचारांत पडला आहे. एक गृहस्थ नवाच येणार आहे. दिसण्यांत कसा जसा मदन आणि मुद्रा थोडिशी रागिट दिसते. त्याचं मन आपल्याकडे ओढून घेण्याला काय काय तजविजी कराव्या? काय नेसावं? कसं बेलावं? कोणकोणते दागिने घालावे आणि बैठकीचा थाट कसा करावा या विचारांत मी आहें. तूं सांगबर मला काय काय शोभतं ते?

गजाऊ:- अग बया? काय हा इचार. कोनाबी बाप्याला एका वाकड्या नजरेन येडं करनं ह्यंजी तुमच्या हातून गेलंच न्हाई. एवढ्या कामालाहो इचारकशाला!

चद्रा:—अगं तू ह्मणतसे तं खरं पण सगळे पुरुष सारखेच का असतात! कसबाचं काम मोठ्ठ कठीण आहे. आमच्याकडे येणारे जे लोक त्यांत कित्येक आपल्या कामाकाजानं कंटाळलेल्या मनाला क्षणभर बोलून चालून विश्रांति घ्यावयाकरितां येतात. कित्येक बोलण्याच्या ढबीवर वेडे असल्यामुळें बोलून समाधान करण्या करतां येतात. कित्येक विषयाकडेच लक्ष देऊन असतात. त्यांना बोलणं चालणं किंवा वस्त्रं भूषणं यांची गरज नसते.

कोणी गाण्या करतां, कोणी केवळ नेत्रसुखा करतां, कोणी आंबट शोका करतां आमच्याकडे येतात. तर सगळ्यांची मनं आपल्याकडे ओढून घेतली पाहिजेत. कीं ज्या आमच्या कसबानं ते आमच्या पूर्ण नादी लागून पैशाच्या राशीच्या राशी आमच्या करतां खर्च करून आज्ञेंत राहतील. गजे, आज स्वारी येणार आहे ती मोठी शहाणी व श्रीमान् आहे. व त्यांचा मित्र त्यांनां फसवून इकडं आणणार आहे. अशा मानी व बाहेर ख्यालीच्या रस्त्या विषयीं अजाण मनुष्याला लोभाळून आपलासा करण्याचा मोठा विचार माझ्यावर येऊन पडला आहे. व रघुनाथरावानी तर माझी परिक्षा पाहीन असं ह्मटलं आहे. तेव्हां ह्मटलं कसं होईल?

गजाऊः—तुमास्नी तो गोऱ्या आंगाला काळा भरजरी शालू लई चांगली सोबा देतो. शिमग्याचा दिशीं तो नेसून आणि समदे दागिने घालूनशानी तुह्मासनी मी पायलं रस्त्यानं, आन माझ्याबी मनाला लई ग्वाड लागलं.

चंद्राः—बर तर मी खोलीतून पोषाख करून येते. तूं दिवाण खान्यांत जाऊन बैठकी वर व गाद्या तक्यावर नवीन धुतलेले पाचेच्या वासाचे अभ्रे घाल व हिरवी हंडी व समोरा समोरचे दोन चिमण्याचे दिवे लाव. बैठ-

ळीच्या मधील चवरंगावर चांदीच्या ताटांत अत्तर गुलाब पाडव्याच्या दिशीं जसा मांडला होता तसा मांड. तसंच तबकांत सर्व सामग्री भरून ठेव; मोगरा व मोतियाचे गजरे चांदीच्या लहान तबकांत भरूनठेव व माझा हात पुसायचा रेशमी रुमाल त्यावर घालून पलंगाच्या शेजाऱ्च्या पेटीवर ठेव. अशी तरतरित तयारी ठेवशील कीं पाहुनच एकदम मन वेडं होईल.

गजा:–मला तयारीच नग सांगाया. ती मी अक्षीलेश ठेवते.

चंद्रा:–( खोलींत जातांना ) गजे कोणी आल तर त्यानां पुढच्या बैठकीवर बसावयास सांग. व मी येतें. ह्मणून बसवून घे. ( जाते. )

मौला बक्ष:–अजी; दरोजा खोलो.

संताजी:–दार उघडाहो.

गजा ( दार उघडून ) याकी हतच बसा. वन्सेनी सांगितलया आपनास्नी कीं जरा बसा मी येते म्हुन

मौला:–बोहोत मंजूर है (दोघे बसतात.)

चंद्रा:–( प्रवेश करिते. ) यावं असं या आंतल्या बैठकीवर यावं. ( ते बसतात )

चंदुलाल–दार उघडाहो

गजाऊ:–दार उघडते व तो आंत येतो.

चंदू:-( चकित होऊन ) अबबब! आज काय हें ! एक कलाक झाला मी इथ येऊन गेल्याला तेव्हां यातली कांहींच तयारी नव्हती. आणि इतक्यांत हे इंद्र भुवन बनून गेलं. काय बक्षी साहेब या स्वर्गीच्या रंभाच ह्मणायच्या, घटकेत स्वर्ग दाखवतात.

चंद्राः-ह्मटलं तोंड आटपा बरका ? आज मला थट्टा खपायची नाही. बसायचं असलं तर उगिच बसावं नाहींतर वाट धरावी.उगच देवळांत दाटी उपयोगीं नाहीं सांगते.

चंदूः-बरबोवा तस काहोइना; आह्मी एक अक्षर ही बोलत नाहीं. घटकाभर हें चंन्द्रबिंब डोळ्या समोर असलं ह्मणजे झालं.

चंद्राः-( मुर्का मारून ) कायमेल माणसाचादुष्टस्व-भाव असतो तरी कोणजाण ?

चंदुः-नोकरींत कांहीं चूक झाली असली तर बोला ?

चंद्राः-आतां तोंड पुरे. कोणी गृहस्थ येणार आहेत ते येऊन जात तोंपर्यंत मनुष्या प्रमाणें एका जागीं बसा स्वस्थ.

चंद्राः-( दाराचा कानोसा घेऊन ) हं हे रघुनाथरा-वच असतील.

चंद्रू:-( गातो ) " आह्मानंदी लागतां टाळी ॥ आठवेना तो वनमाळी "

चंद्रा:-कां ? लाज नाहीकां वाटत. बरं त्याना बसवून घ्या ? मी आलेंच ( जाते. )

चंद्रू-ठीक आहे. ( तात्यासाहेब व रघुनाथराव येतात )

तात्या:-( हळूच रघुनाथाला ) आपले मित्र हेच-कां ? ( येकाकडे बोट दाखवून )

रघु:-नाहीं ते आता येतील. ( चंद्रा येते )

तात्या:- ( चपापून ) हां हां हें काय ?

रघु:-कुठ काय आहे ? हेच ते मित्र.

तात्या:-ह्मणजे ?

रघु:-ह्मणजे काय तेच हे.

चंद्रा-( लवून ) राम राम, ही दीन दासी मंडळींनां मुजरा करते. ( तक्यापुढं बसते ) काय मेला उन्हाळा तरीहो. आंगावर मलमलसुद्धां सहन करवत नाहीं पाहिजे तितके सुवासिक व थंड उपचार केले तरी आपला सर्वांगांचा दाह आहेच. केव्हां येकदांचा हा उन्हाळा जाईल असं झालं आहे.

चंद्रू:-तशांत पुरुषांच फारस कठीण नाहीं. पंचा किंवा लंगोटी नेसली तरी चालतं पण बायकांचं तसं नाहीं. आणि त्यांत आपल्या सारख्याचं ह्मटलं ह्मणजे ??

रघुः–या दिवसांत पाणी कितीही गार केलं तरी ते पितां पितां ऊन्ह होतं. मात्र हे दिवस ऐषआरामाच्या उपयोगीं खरें. कां तात्यासाहेब खरं कीं नाहीं ?

तात्याः–तें सगळं तुला ठाऊक.

चंद्राः–कोणाची आवड कशी असते कोणाची कशी असते. कोणाला उन्हाळा तर कोणाला पावसाळा शत्रू वाटतों. ज्याला भाकर पोळी जिलबी एक सारखीच वाटते व ज्यांचा मतलब केवळ पोटभरण्याचाच असतो असे कितीएक असतात. एखाद्याला जो पदार्थ आवडतो तो मिळेल तरच खाइन नाहींतर उपोषण करीन असं ते ह्मणतात. पण सर्वच पदार्थ सारखे किमतीचे आहेत असं मानल तर मग पृथ्वींत उंचनीचपणा नाहीं असंच ह्मटलं पाहिजे. तर तसं नव्हे. जगांत उंच नीच आहेत. व तसं मानलही पाहिजे. मात्र आवड ही गोष्ट निराळी आहे.

रघुः–काहो ? ही तुमची समजूत पण अशीच सर्वत्रांची असेल असं तुह्माला वाटतं का ?

चंद्राः–शूः शूः (पंखा हालविते) माझी वेडीची पाहिजेतो फजीती करील. (तबकातले विडे देते व तात्यासाहेबानां देतांना उजव्या हाताला दुसरा हात लावून देते)

चंदूः—काय चमत्कार आहेतरी हो! एकाच गलबतांत बसलेल्या लोकांपैकीं तुफानाचे वेळीं त्यांतील कित्येकांना तें उलंडून टाकते आणि कित्येकाना जिवा भावानं आश्रय देतं हें आश्चर्य नव्हेका!

चंद्राः—मला आश्चर्य वाटतं कीं पुष्कळ लोकांच्या समजांत निरनिराळ्या मताचे जरी पुष्कळ असतात तरी दुसऱ्याचं बरं पाहून मत्सर उत्पन्न होणारा असाही एखादा असतो.

रघुः—( तात्यास ) काय काय विषय चालले आहेत जरा पहातर खरं.

मौलाः—रावसाहेब इदर कुच्छ बात करना न चाहिये. जैसी अस्मानमे परी बुलबुलके माफक सिरानीका बोलबोलती और अपने दिल दारोंकों खूष करती वोहीताल ह्यां है. मै ग्वाल्हेर, अमदाबाद, बंबई, धुलिया, मालेगाम, और दख्खनमे गोमांतक देख आया. बहोत नाज नो कों देखा; लेकिन ऐसी परी कहाबी नजर न आई. भगवानने सबी ताल और चष्मोंकानूर ह्याही इनायत किया है ऐसा मे जानताहूं.

चंदूः—सच, बक्षीसाहेब. पण चष्मोंका नूरह्मणजे क्या?

मौलाः—उसका मायना येहै के नयनके तीरसे बक्सोका कलेजा ये छीनलेतीहै. अब समजे या नहीं

चंद्राः-( हंसून ) क्या बक्षीजी आपबी खूप हो. ( रघुनाथाकडे पाहून ) ज्याला आपलं असं ह्मटलं त्याचा गौरव करणं हें थोराचं कामच आहे.

मौलाः-( चंद्राला बाटलीची निशाणी करून ) मंगवाना, और रंगमें दोदो प्याले सबोंको पिलाना.

चंद्राः-( खुणेनं बोलूनका असं सुचवून ) बक्षी साहेब ? आपला बाळा तबलजी कां बरं नाहीं आला अजून ? ह्मटलं लौकर आला असतां तर वेडं वाकडं कांहींतरी ह्मटलं असतं. आपण ग्वाल्हेरीस गाणं पुष्कळ ऐकलं असेल ?

मौलाः-बहोत बहोत सुना. कालेखां, मुरादखां, फैजखां, सरफराजखां ऐसा बहोत सुना तोभी सच कहतांहुं के आपके सुरावटकी मिठास कहांही सुन्नेमे न आयी

चंदुलाल-अहो सुन्नेमे काय अन् चांदिमे काय ? ही खुबी कुठच नाहीं. ( सर्व हसतात. )

चंद्रा-काय मेली थट्टा ही.

( तबलजी वगैरे येऊन वाद्यें लावतात. )

चंदुः-आतां एकाद दोन, अगदीं मिठास होऊं द्या ? त्या दिवशींच " मोहक ही तनुलतिका " फार गोड लागतं

चंद्राःआँ ( गाते )

पद चाल ( लक्ष्मी सम चंचल या चा० )

मोहक ही तनुलतिका विषयीं वर्णिती ॥
मधुर स्मित गौर वर्ण नेत्र चमकती ॥ धृ० ॥
कज्जल विष दिग्ध बाण हृदयीं झोंबती ॥
आकर्षुनी मनसारे मोट बांधिती ॥ राघुपरी
पंजरीं त्या सहज कोंडिती ॥ मगते मकरंदी
भृंग समचि लोळती ॥ अंतरा ॥ ऐसे नवयुवति
सुखीं मग्न राहती ॥ भूवरितें नंदन वन सौख्य
भोगिती ॥ १ ॥

चंदुः—वाहवा? क्या बहार आहे कीं नाहीं बक्षी साहेब?

बक्षीः—इस्सेबी और होगीं यार? सुनोतो सही?

चंदुः—त्या दिवशींचंतें दुसरं " कलहंसाचा जोड तें अगदीं थाटांत होउं द्या?

संताजीः-खरंच ते गोड बोल अजून कानांत कसे भरून राहिले आहेत.

चंद्राः—( म्हणूं लागते. )

लावणी ( शाखासद्गुणयाचा० )

हलखुज बांधा रंग गोजिरा चाल गजाचे
परी ॥ मुरकुनि प्रेमे सहजहि बघतां हृत्तापातें
हरी ॥ उचंबळतां अंतरीं प्रीतिच्या लहरा

बरचे वरी ॥ त्या योगे मन धीर घेइना होय
वृत्ति बावरी ॥ हलखुज ॥ कलहंसाचा जोड
गोड किती पद्रानें सावरी ॥ वाटे वैभव सर्व
घेऊनी आली रतीमंजरी ॥ ऐसे सुंदर रूप
मनोहर खरी स्वर्गातिल परी ॥ अवयव सर्वही
नीट रेखिले पूर्ण मदन मंजरी ॥ १ हलखुज
बांधा ॥

मौला:-ओहो. मेरा दिल तो बागो बाग हो आता है. क्या वस्ताद! जैसी बांसुरी बजतीहै. और आपके साथ जैसी गंगाजमना मिलकर चले है. क्या बात है!

चंदु:- स्वर्गांत यापेक्षां अधिक सुख असेल असं आपल्याला कांहीं वाटत नाहीं.

रघुनाथ:- ( तात्याकडे पाहून ) इकडे पहा कशी ब्रह्मानंदी टाळी लागली आहे ती?

तात्या:- यांत नवल तें काय? साखर कधीं गोड लागणार नाहीं असं होईलकां? गाण्याचा धर्मच आहे कीं ऐकणाराला तें धुंद करतच.

चंदू:- यांत काय संशय आपल्या ह्मणण्याला सुभाषिताचा चांगला आधार आहे. त्यांत ह्मटलं आहे कीं. "सुभाषितेन गीतेन युवतीनांच लीलया ॥ यस्यन द्रवते चित्तं सयोगी ह्यथवा पशुः"

मौला:-बेशक आप सच कहते हो. ये जाय वैसी ही है.

रघु:-काय तात्यासाहेब? चलाव आतां बरीच रात्रझाली.

तात्या:-जसं आपण ह्मणाल तसं.

रघु:-रावसाहेब खरंच सांगा कीं इथं आल्या पासून आपल्याला फायदा झाला किंवा तोटा झाला बरं?

तात्या:-तें मी कांहीं बोलूं शकत नाहीं. फायदा होवो अथवा तोटा होवो.

रघु:-तोटा कां होईल? जिच्या रूपावरून शेंकडो सौंदर्यवान स्त्रिया ओवाळून टाकाव्या अशा चंद्राची ओळख झाली. शिवाय गाण्यानं झालेला आपला आनंद सर्वांनी पाहिलाच आहे.

चंद्रा:-वाहवा आज आपण चंद्राची रंभाच बनवलीत. ( तात्याकडे दाखवून ) या पायांशीं अशा शेंकडो हात जोडून उभ्या राहतील. उगच मला थोर करणं हें कौतुक आहे.

रघु:-काय साहेब ऐकलं ना? हें.

तात्या:-हो आपणही ऐकलं असेलच.

मौला:-चंद्राजी. अब हम जातेहै राम राम. ( जातो ).

चंद्र:—बर आह्मीही आता येतो. ( जातो )

गजाऊ:—मी मद् घरांत जाते ( जाते )

चंद्रा:—ठीक आहे. ( तात्यासाहेबाजवळ येऊन बसते. )

रघु:—तात्यासाहेब आज आपण स्वर्गांत आहोत अशी कल्पना करा. आज पर्यंत हें सुख फारच थोड्यांनां लाधलं असेल.

तात्या:—( मनांत ) खरंच आहे. काय ही अवयवांची ठेवण. दागिने व कपड्या लत्त्याचा नीट नेटकेपणा, भाषणांत नम्रता तरी किती? लोक जे वेडे होतात यानां मी खचीतच मूर्ख ह्मणणार नाहीं. ( उघड ) हं सर्व आपल्यामुळें. पण आज आपण आह्माला चोख फसवलत. आतां इतका उशीर कां झाला ह्मणून घरीं विचारलं तर मान खाली घालायची पाळी आपण आणलीत.

रघु:—मित्रा. तुला फसवलं नव्हे, यांत उलट आह्मी आपल्यालाच फसवून घेतलं. कारण मिया बिबी राजी झाल्यावर मग आमचं बी मुळींच रुजणार नाहीं. पण चंद्राजीनी माझी पाठ घेतली कीं कसंही करून आपल्या मदन मूर्तीचा व त्यांचा भेटीचा योगायोग आणावा ह्मणून. नाहींतर त्या आज जगाला अंतरल्या असत्या. कोणाचं ही बरं झाल्यास आपल्याला आनंद आहे.

चंद्राः- ( लाजून ) वाहवा हें काय? उगीच कांहीं तरी आपलं बोलावं.

रघुः-तुला माझीच शपत आहे. तात्यासाहेबांना इथ आणण्याला तूं आग्रह नाहींका केलास?

चंद्राः- ( लज्जित उभीराहून ) मी नाहीं कुठ ह्मणते पण, रघुनाथराव? आपण ओघ आणलातच ह्मणून सांगतें कीं मी स्वारीला पाहिलं तेव्हां पासून अगदीं तळमळ लागून राहिली होती. कीं येकदा सोन्याचा दिवस कधीं येईल ह्मणून. रघुनाथरावजींचा आणि माझा काय पूर्व जन्मींचा ऋणानुबंध असेल तो असो. त्यानीच या पायाची भेट करून देऊन माझा जीव वाचवला. आतां मी हे पाय कद्धीं सोडायची नाहीं. ( तात्याच्या गळ्याला मिठी घालतें ) तात्या ( लज्जेनें बावरतो ) काय जुलूम हा! रघुनाथराव आपण त्यांना कांहींतरी सांगा, हें काय?

रघुः-आपण ह्मणत होताकीं मोह उत्पन्न करणाऱ्या वस्तूचा त्याग करून आपलं मन त्यापासून परावृत्त करावं ह्मणून. तर मग आपण विद्वान् आहात व पुष्कळ ग्रंथावलोकन ही आपल्याला झालं आहे. तेव्हां मी ह्मणतो विवेक करा आणि या कोमलांगी स्त्रीच्या प्रेमाची गळ्यांत पडलेली घट्ट मिठी ज्ञानमार्गे सोडून

तिला ह्मणा पाहूं एकदां ? ड्यॉम फुलिश " [महाराज ? " परोपदेशे कुशला भवंति " अनुभव नाहीं तो-पर्यंत वैराग्याचा पाया अगदीं कच्चा असतो. आणि डळमळित पायावर बांधलेली इमारत कच्ची होणार यांत नवलतें काय ? यातन्वंगी सुकुमार गात्रेच्या सकृद्दर्शनानच सर्वांगांत मदन संचार होणार, मग स्पर्श झाला असतां मनुष्य कसं वेडं होणारनाहीं ? या करता हा कपिलाषष्ठीचा योग आला आहे तो घालवूं नको. व या लोण्याहून मृदु अंतःकरणाला अंतर देऊं नको !!

तात्याः-( मनांत ) खरंच, असा प्रसंग प्राप्त झाला असतां मोठ्या दृढ निश्चयाचामनुष्य सुद्धां विरघळून जाईल यांत कांहीं शंकानाहीं. ( उघड ) बरं आता उठाच.

चंद्राः--( पदरानें डोळे पुसत व किंचित् उसासे टाकून ) किती जरी आपलं मन उघड करून सांगितलं तरीं "शेळी जाते जिवानिशी आणि खाणारा ह्मणतो वातट " तशातली गोष्ट. आणि मघाशीं बोलणं निघालं होतंकीं सिंव्हाला उपोषण करावं लागलं तरी तो करील परंतू हत्ती शिवाय दुसरा भक्ष्य त्याला गोड लागायाचाच नाहीं. ( आपल्याशीं ) चंद्रे ? तू अगदीं वेडी वेडी आहेस तुझा जीव मात्र इकडच्या साठीं तिळतिळ

तुटतो पण काय उपयोग ? तिकडे असं वाटेल तर ना ?

रघु:--चंद्राजी, आतां मी घरीं जातों. तुमची दया येण्यास हरकत कायती माझीच आहे. माझ्या मागें दयेचे डोंगर कोसळतील ( हंसतो ) .

तात्या:--( हसून ) छट् नॉन सेन्स. डोंट् टॉकयू. आय ॲम कमिंग उइथयू. अपरात्र झाली आता चला.

चंद्रा:--( पलंगावररुसून बसते. ) मेला माझा जीव ही कसा तो जाईना.

रघु:--तुझा सुधारणेंपणाचा आतां कळस झाला. तोंडानं ह्मणतोस कीं रात्र झाली घरी चला. पण तुझे पाय कांहीं चिकटले आहेत ते उचलत नाहींत. तूं तर आतां कमाल केलीस नादीपणाची.

चंद्रा:--काय चमत्कार तरी पहा. एकाला ह्मणायचं पळ आणि दुसऱ्याला ह्मणायचं पाठीस लाग. !

तात्या:-- ( उभा राहून ) मी जातों आतां.

रघु:--वाचलेल्या पुस्तकाच्या कोना कोपऱ्यांत कुठं याला तोड सुचत असली तर आठवा आणि या वेळेला आतां कांहीं तरी युक्ति लढवा. आपल्या सारख्याना विचार न सुचणं ह्मणजे आश्चर्यच ह्मणायचं आतां. विश्वामित्राचा मी आपल्याला दाखला दिला असता पण त्याला आपण कमी कोटींत टाकला आहे.

तात्याः–गड्या मला तूंच या अडचणींत आणून हीं टाकलं आहेस आणि तूंच का असं टोंचून बोलतोस! इथून सुटून जाण्याची तोड तुलाच काढली पाहिजे.

रघुः–काय चमत्कार आहे! मी तुला कोणत्या संकटांत घातला आहे. अरे बुकांतील शहाण्या? ज्या सुखासाठीं महत्तपश्वर्येचा त्याग करून असल्या सुखाची जोड केली. त्याचा प्रवाह यदृच्छेनें तुजवर वाहत असतां ती अडचण असं समजतोस?

तात्याः–सर्व खरं पण अता रात्र थोडी राहिली भाषण काय कधीं संपायाचं आहे कां?

रघुः–मीं सांगतों ऐक ( कानाशीं लागून ) तिला सांग मी उद्यां येईन, आणि चलाजाऊं घरीं.

तात्याः–( तिच्या जवळ जाऊन ) बरं आतां द्या रजा एकदा. ?

चंद्रा--जाणाराला नको कुणी ह्मणावं?

तात्याः--समंजस मनुष्यानं वेड पांघरणं हें नीट आहे का? आजच्यानच काय झालं आहे?

चंद्राः- बोलायला काय होतें? "नहिवंध्या प्रजानाति गुर्वी प्रसव वेदना" मी किती प्रकारें विनवणी करते आहे. तरी आपलं आहे ते आहेच. ह्मटलं मोघम गोष्टींनी समज पडेल ह्मणून.

तात्याः–समज कशाचा पडायचा ?

रघुः–आतां द्राविडी प्राणायाम कां ? आपण इतका वेळ राहिला त्यामुळं आपल्या हेतू बद्दल आम्हाला मुळी-च शंका उरली नाहीं ह्मणून ह्मणतों आतां हा लपंडाव बाजूला ठेवून चंद्राजीच्या मना प्रमाणं वागून मग चला, नाहींतर मला तरीं जाऊंद्या.

तात्याः–बर ठीक आहे.

रघुः–ठीक काय आहे ?

तात्याः–मी उद्यां तुमच्या समजुती करतां याठि-काणी येण्याचं कबूल करतों. मग तर झालं ?

चंद्राः–बरं आपण मला सोडून जायचं ह्मणता तर मलाही राहून काय करायचं आहे ? ( बाहेर जाऊं लागते )

रघुः–( तिचा हात धरून ) काय बरंहें ? भलतंच नाहीं तें. आता इथशिकस्त झाली. तुला भीड वाटत असली तर मी बाहेर जातों. ( बाहेर जातो )

तात्याः–मी खरोखर वेडा बनलों. आहे. काय क-रावं हें कांहीं सुचत नाहीं. बरं मी जातों उद्या खचीत येईन. पण आता मात्र रजा दिली पाहिजे.

चंद्रा–रजा देणार मी कां कोणी आहे ? मी आपल्या पायाची दासी आहे. आपल्याला जें योग्य दिसेल ते करावं.

तात्या:—गड्या मला तूंच या अडचणींत आणून हीं टाकलं आहेस आणि तूंच का असं टोंचून बोलतोस! इथून सुटून जाण्याची तोड तुलाच काढली पाहिजे,

रघु:—काय चमत्कार आहे! मी तुला कोणत्या संकटांत घातला आहे. अरे बुकांतील शहाण्या? ज्या सुखासाठीं महत्तपश्चर्येचा त्याग करून असल्या सुखाची जोड केली. त्याचा प्रवाह यदृच्छेनें तुजवर वाहत असतां ती अडचण असं समजतोस?

तात्या:—सर्व खरं पण अता रात्र थोडी राहिली भाषण काय कधीं संपायाचं आहे कां?

रघु:—मीं सांगतों ऐक ( कानाशीं लागून ) तिला सांग मी उद्यां येईन, आणि चलाजाऊं घरीं,

तात्या:—( तिच्या जवळ जाऊन ) वरं आतां द्या रजा एकदा.?

चंद्रा--जाणाराला नको कुणी ह्मणावं?

तात्या:--समंजस मनुष्यानं वेड पांघरणं हें नीट आहे का? आजच्यानच काय झालं आहे?

चंद्रा:- बोलायला काय होतें? "नहिवंध्या प्रजानाति गुर्वी प्रसव वेदना" मी किती प्रकारे विनवणी करते आहे. तरी आपलं आहे ते आहेच. ह्मटलं मोघम गोष्टींनी समज पडेल ह्मणून.

तात्याः-समज कशाचा पडायचा ?

रघुः-आतां द्राविडी प्राणायाम कां ? आपण इतका वेळ राहिला त्यामुळं आपल्या हेतू बद्दल आह्माला मुळी-च शंका उरली नाहीं ह्मणून ह्मणतों आतां हा लपंडाव बाजूला ठेवून चंद्राजीच्या मना प्रमाणं वागून मग चला, नाहींतर मला तरीं जाऊंद्या.

तात्याः-बर ठीक आहे.

रघुः-ठीक काय आहे ?

तात्याः-मी उद्यां तुमच्या समजुतीं करतां याठि-काणी येण्याचं कबूल करतों. मग तर झालं ?

चंद्राः-बरं आपण मला सोडून जायचं ह्मणता तर मलाही राहून काय करायचं आहे ? ( बाहेर जाऊं लागते )

रघुः-( तिचा हात धरून ) काय बरंहें ? भलतंच नाहीं तें. आता इथशिकस्त झाली. तुला भीड वाटत असली तर मी बाहेर जातों. ( बाहेर जातो )

तात्याः-मी खरोखर वेडा बनलों. आहे. काय क-रावं हें कांहीं सुचत नाहीं. वरं मी जातों उद्या खचीत येईन. पण आता मात्र रजा दिली पाहिजे.

चंद्रा-रजा देणार मी कां कोणी आहे ? मी आपल्या पायाची दासी आहे. आपल्याला जें योग्य दिसेल ते करावं.

तात्याः—रघुनाथराव बाहेर उभे आहेत, ते ह्मणतील हा चेंगट आंत काय करतो आहे. ह्मणून ह्मणतो हस्त मुखानं येकदा परवानगीद्या पाहूं.

चंद्राः—ठेवा माझ्या गळ्यावर हात आणि वहा शफत कीं उद्यां मी खचित येईन ह्मणून?

तात्याः—तुमच्या गळ्याची शपथ मी उद्यां रात्रीं खचीत येईन त्यांत कांहीं अंतर होणार नाहीं. झालं आतां ( तात्या बाहेर येतो )

चंद्राः—( दोघांना विडे देऊन ) रामराम करते.

अंक पहिला समाप्त.

श्रीगणेशायनमः

## अंक २ रा.

### प्रवेश पहिला.

स्थळः—तात्या साहेबाच्या
घरची वाचनाची खोली

पात्रें:--तात्या ( खुर्चीवर बसून, गीत गोविंद
पुस्तक वाचीत, आपल्याशीं )

तात्याः—गारुडी पुंगी वाजवू लागला. ह्मणजे सर्प जसा तल्लीन होऊन डोलू लागतो त्या प्रमाणं कालच्या गाण्यापासून माझी अवस्था झाली आहे. याचं वेड मोठं चमत्कारिक ह्मणतात तें खरंच. कालचे ते हावभाव अगदीं डोळ्या समोर दिसत आहेत. ते उतरून घेतलं असतं तरीं बरं झालं असतं! किती गोड वर्णन? काय बरं तें? हं "हलखुज बांधा रंग गोजिरा चाल गजाचे परी" अहाहा! किती तरी गोड. आणि त्या वेळीं तिनं बाजू बंदांनीं शोभणाऱ्या सुकुमार हातांनीं मला आलिंगन दिलं ते स्मरण झालं कीं शरीरावर अष्टभाव उभे राहतात. ( पुन्हा विचार उत्पन्न होऊन आपल्याशीं ह्मणतो ) परंतु आपली वंश परंपरेची कीर्ति, सदाचरण व संभावितपणा या सर्वांस माझ्या डोक्यांत शिरलेलं हें वेड खचीत काळिमा लाविल. संपत्तिचा नाश करील.

इतकंच नाहीं पण मुख्य जी शरीर संपत्ति तीहीना सून आपल्याला सर्व प्रकारं हें वेड भणंग भिकाऱ्या-प्रमाणें रिकामें करून जन्मपर्यंत विपत्तींत टाकील. मग रडत बसावं लागेल. हेंच खचीत आहे. कारण "या विषयाच्या पायीं बुडाले कितीएक लक्षापती" असं कवींनीं हजारों जागीं वर्णन केलं आहे व आपल्या अनुभवासही येत आहे. या आपल्या शहरांतील दवा खान्यांत आपण नित्य पाहतों कीं, त्यांत असलेल्या रोग्यापैकीं निम्मेशिम्मे रोगी या विषयाचा परिणाम भोगीत पडलेले आढळतात. सारांश सर्वप्रकारें आपण जी गोष्ट मनांत आणली आहे ती अनिष्ट व नाशकर-णारी आहे यांत कांहीं शंका नाहीं सावित्री. (जी दाराच्या आडून ह्या सर्व चेष्टा पहात होती ती आप-ल्याशीं ह्मणते ) हे आजचे हावभाव आणि चाळे आजपर्यंत कधीं नजरेस पडले नाहींत. आणि आजच हें काय बरं? नित्याच्या आणि आजच्या वर्तनांत कांहीं तरी फेरबदल आहे खचीत. परंतु केव्हां केव्हां येखादें पुस्तक वाचीत असतांनां त्यांत शृंगार रसाचा अविर्भाव आला असतां वाचकाचे मनोरथ कांहींसे चमत्कारिक होतात; त्या स्थितींत संविधानकाच्या अनुरोधाप्रमाणं मनाचे आणि शरीराचे भाव निरनिराळे होतात, त्या

प्रमाणं ही स्थिति कशावरून बरं झाली नसेल ? असो; आणखी थोडावेळ वाट पहावी ह्मणजे काय असेल तें स्पष्ट समजून येईल. तर इथंच कांहींवेळ उभं राहून काय काय रंग बदलतात तें पहावं. ( उभी राहते )

तात्या:—हें गीतगोविंदकाव्य, यांत राधेच्या व कृष्णाच्या शृंगाराचं वर्णन किती मौजेचं केलं आहे. ( वाचतो ) "प्रिये चारुशीले, प्रिये रम्यशीले, वदसि यदि किंचिदपि दंतरुचि; कौमुदी हरति दरतिमिर मतिघोरां॥ स्फुरदधर सिवधंतर वदन चंद्रमा रोचयति लोचन चकोरं." अहाहा! किती जरीं वाचलं तरी सार काय? कीं या विषयातून कोण सुटला आहे बरं? कोणी नाहीं. प्रत्यक्ष श्रीकृष्ण, जो पूर्ण ईश्वरावतार त्यानं राधेशीं कसे कसे विलास केले आहेत. तेव्हां, प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या मनावर जर मदनाचा इतका गहजब झाला होता तर साधारण मनुष्याच्या मनावर तसंहोण सहज आहे. विषयानें शरीर व मालमत्ता क्षय पावते हें खरं आहे. तरीं जर विचारानं वागलं व नियमित खर्च केला तर कांहीं मालमत्तेला अथवा अब्रूला धोका येईल असं नाहीं. जे अविचारी असतात ते मात्र फसतात. योग्य देणगी दिल्यानं व नियम राखल्यानं आणि जपून गेल्याआल्यानं, प्रपंचातील सौख्य व लौकिक हीं दोन्हीं साधतील.

इतकंच नाहीं पण मुख्य जी शरीर संपत्ति तीहीना सून आपल्याला सर्व प्रकारं हें वेड भणंग भिकाऱ्या-प्रमाणें रिकामें करून जन्मपर्यंत विपत्तींत टाकील. मग रडत बसावं लागेल. हेंच खचीत आहे. कारण "या विषयाच्या पायीं बुडाले कितीएक लक्षापती" असं कवींनीं हजारों जागीं वर्णन केलं आहे व आपल्या अनुभवासही येत आहे. या आपल्या शहरांतील दवा खान्यांत आपण नित्य पाहतों कीं, त्यांत असलेल्या रोग्यापैकीं निम्मेशिम्मे रोगी या विषयाचा परिणाम भोगीत पडलेले आढळतात. सारांश सर्वप्रकारें आपण जी गोष्ट मनांत आणली आहे ती अनिष्ट व नाशकरणारी आहे यांत कांहीं शंका नाहीं सावित्री. (जी दाराच्या आडून ह्या सर्व चेष्टा पहात होती ती आपल्याशीं ह्मणते ) हे आजचे हावभाव आणि चाळे आजपर्यंत कधीं नजरेस पडले नाहींत. आणि आजच हें काय बरं ? नित्याच्या आणि आजच्या वर्तनांत कांहीं तरी फेरबदल आहे खचीत. परंतु केव्हां केव्हां येखादें पुस्तक वाचीत असतांनां त्यांत शृंगार रसाचा अविर्भाव आला असतां वाचकाचे मनोरथ कांहींसे चमत्कारिक होतात; त्या स्थितींत संविधानकाच्या अनुरोधाप्रमाणं मनाचे आणि शरीराचे भाव निरनिराळे होतात, त्या

प्रमाणं ही स्थिति कशावरून बरं झाली नसेल.? असो; आणखी थोडावेळ वाट पहावी ह्मणजे काय असेल तें स्पष्ट समजून येईल. तर इथंच कांहींवेळ उभं राहून काय काय रंग बदलतात तें पहावं. ( उभी राहते )

तात्याः—हें गीतगोविंदकाव्य, यांत राधेच्या व कृष्णाच्या शृंगाराचं वर्णन किती मौजेचं केलं आहे. ( वाचतो ) "प्रिये चारुशीले, प्रिये रम्यशीले, वदसि यदि किंचिदपि दंतरुचि; कौमुदी हरति दरतिमिर मतिघोरां॥ स्फुरदधर सिवधंतर वदन चंद्रमा रोचयति लोचन चकोरं." अहाहा! किती जरीं वाचलं तरी सार काय? कीं या विषयातून कोण सुटला आहे बरं? कोणी नाहीं. प्रत्यक्ष श्रीकृष्ण, जो पूर्ण ईश्वरावतार त्यानं राधेशीं कसे कसे विलास केले आहेत. तेव्हां, प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या मनावर जर मदनाचा इतका गहजब झाला होता तर साधारण मनुष्याच्या मनावर तसंहोण सहज आहे. विषयानें शरीर व मालमत्ता क्षय पावते हें खरं आहे. तरीं जर विचारानं वागलं व नियमित खर्च केला तर कांहीं मालमत्तेला अथवा अब्रूला धोका येईल असं नाहीं. जे अविचारी असतात ते मात्र फसतात. योग्य देणगी दिल्यानं व नियम राखल्यानं आणि जपून गेल्याआल्यानं, प्रपंचातील सौख्य व लौकिक ही दोन्हीं साधतील.

ह्मणून जिनं आपलं शरीर मोठ्या प्रेमानं मला अर्पण केलं; तिला धिःक्कारणं या सारखं मोठं पाप नाहीं. पूर्वी ययाति राजानं सुद्धा शर्मिष्ठेच्या विनंति वरून तिचा अंगिकार केला. यासाठीं आपण दिलेलं वचन पाळलं पाहिजे. ह्मणून आज तर तिथं गेलं पाहिजे. परंतु मित्रत्व कोरडं घेणं रास्त नाहीं, तर तिला शोभण्यासारखी तिच्या जवळ ज्या जिनसा आहेत त्यांत नाहीं अशी वस्तु कांहीतरी दिली पाहिजे. पण आतां कशा अडचणी आहेत पहां? घरांतील वस्तु तर नेतां येत नाहीं. व बाहेरून आणून द्यावी तर रघुनाथाला कळवता कामाचं नाहीं. कारण तो फजिती करकरून माझी पाठ पुरवील, पण जर त्याच्या नकळत द्यावं तर ती वस्तु आणावी कोणी व द्यावी कुणी? आपल्याला हें काम स्वतः तर करतां येत नाहीं, कारण तसं केल्यानं मोठेपणा राहत नाहीं. ह्मणून जें करणं तें रघुनाथाच्या साह्यानं करावं हेंच ठीक. बरं आतां किती वाजले असतील? ( घड्याळाकडे जाताना सावित्रीकडे लक्ष जाऊन ) अरे? ही स्वारी इथ केव्हां आली हें कांहीं कळत नाहीं. बरं असो; कशीतरी ही. वेळ मारून नेलीच पाहिजे ( तिला ह्मणतो )

तात्याः—कां, आपण आज इथंशा उभ्या?

सावित्रीः—पहावं ह्मटलं मनोराज्याचा थाट कितपत चालतो तो.

तात्या:-(मनांत) माझ्या हाताचे चाळे व हावभाव हिनें पाहिले तर नसतील नां? कसंही असो या वेळेस हिचं समाधान केलच पाहिजे. नाहीं तर झिडकारल्यानं इच्या मनांत खचीतच वहीम येईल. (उघड) मग अशा जवळ या, या गरीब वेड्यावर उगच आपली छाया तरी पडूं द्या. ह्मणजे दोन भाषणांनीं माझा गरिबाचा समाचार घेतला असं तरी होईल.

सावित्री:-समाचार घ्यायला जिव्हाळ्याचीं माणसं दुसरी थोडीका आहेत?

तात्या:-कितीही जरी आप्त माणसं असली तरी संसारांत ममतेची दोनच येक आई व दुसरी बायको; ह्मणून ह्मणतों कीं या, या आता.

सावित्री:--केवळ मनधरणी करता बोललेले बोल आणि दाखविलेले प्रकार यांचा ठसा वठावा तसा वठत नाहीं, इतकच नाहीं पण तो जसजसा वठवायला जावं, तसतसा त्याचा रंग जास्त फिकाच होत जातो. बाह्य चेष्टांनी जर खोट्या लोभाला खरं स्वरूप देउं गेलं तर तेंका कुठं लपायचका आहे? तस जर होतं तर मग काय पाहिजे? मी जरी शहाणी नाहीं तरी गोड, खारट, आंबट, तुरट आणि कडू ज्यापेक्षां मला समजतं त्यापेक्षां ढोंगाला मी कधींहीं खरं ह्मणायची नाहीं. स-

त्याची वृद्धी सदा सर्वकाल असते; आणि खोटं तेव्हांच विरघळतं मी आज सुमारें अर्धा प्रहर इथं उभी आहे. वसर्व प्रकार पाहिले. त्या वरून खाचित सांगतें कीं कांल जो मनाचा प्रकार होता तो आज नसून दुधांत मिठ घातल्या प्रमाणें बदल झालेला आहे.

तात्याः–( मनांत ) मी किती जरी लपंडाव केला तरी तें कांहीं लपेलसं दिसत नाहीं. लहानपणापासून हिला त्याहायला, वाचायला, शिकवलं त्यामुळं गुरुची विद्या गुरुलाच फळली. असो. ( उघड ) पुरुषांपेक्षां बायका फार हुषार असतात; परंतु नानाप्रकारचे कुतर्क त्यांच्या मनांत खेळत असल्यानें कोणत्याही गोष्टीचं खरं अनुमान त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. त्या फक्त मांजराचा वाघ आणि वाघाचा मांजर करण्यांतच हुषार. बायकांचा स्वभाव मी ओळखत नाहीं कीं काय ? आपण तर्क केलात तो स्त्रीजातीच्या स्वभावाला अनुरूपच आहे. पण आपला हा असमंजसपणा न जाणतां पुरुषांवर दोषारोप करणं यापासून उभयपक्षीं सुख होत नाहीं.

सावित्रीः–कसंही असो, आपण जे दोष द्याल ते मस्तकीं घेण्याला मी तयार आहेच; पण आपल्या जवळील अर्थाला आणि सगळ्यांत शरीराला संभाळून आपण वागला ह्मणजे झालं. ज्यांत आपलं कल्याण त्यांत-

च माझं सौख्य आहे. पण हें पहा, सोनं पूर्वीचं जरी निष्कलंक आहे तरी तें तांब्याच्या भांड्यांत सतत ठेवल्यानं कलंकी होतं, यासाठीं लोकांच्या दुष्टसंगतीचा या सूर्याला डाग न लागावा येवढंच देवाजवळ मागणं आहे. जेयपर्यंत घराला अग्नि लागला नाहीं, अथवा घर फोडण्याकरतांचोरानें प्रयत्न चालविला नाहीं, तोंपर्यंतच जे यत्न करणं ते सफल होण्याची आशा आहे. रोग दुःसाध्य झाला ह्मणजे मग तो बरा होणं फार कठीण पडतं.

तात्याः–ती आपली पुस्तकी भाषा एकीकडे ठेवा, ( मनांत ) या बायकोचं नांव जिवलग आणि जन्माचा मित्र! ( उघड ) या, इकडे तर या, ही खुर्ची आपली वाट पहाते आहे, तिची तरी आशा पूर्ण करा.

सावित्रीः–मी ह्मणते त्याच्या प्रचीतीला कांहीं फारवेळ नाहीं लागला, हेंच पहा; मला स्मरत नाहीं कीं एकान्तांत कधीं आपण वेगळीं बसलों. स्मरतं कां?

तात्याः–याचं नाव समयसूचकता. शाबास, बरं या या आतां, आपल्या हक्काच्या जाग्यावर या. वक्तशीर माझ्याकडून जरी घसरलं, तरी आपल्यासारखं सांभाळून घेणारं असलं ह्मणजे आनंदाला तोटा काय?

सावित्री:–मातीचे कुले डकवून कां कुठे डकत असतात? आणि असं करता डकले असं घटकाभर मानायचं त्यातलीच ही आतां चाललेली मनधरणी आहे.

तात्या:–हे बघा! आतां विनोद बस्स झाला. मघापासून एक तास झाला. हें काय बरं? मला आज ग्रंथसंग्रहालयांत सभेला जायचं आहे. ह्मणून ह्मणतों कीं, जरातरी बसा ह्मणजे इतका वेळ व्यर्थ गेला असं वाटणार नाहीं.

सावित्रा:–( जवळ खुर्चीवर बसते )

तात्या:–कां आतां आळस कोणाकडून? असं काय बरं? किती हा राग? ( तिला मांडीवर घेतो )

सावित्री–आजच्या सभेंत कोणता विषय आहे.?

तात्या:–( हंसतो ) "एकी"

सावित्री:–हा विषय आपण प्रतिपादन करणार! कां नास्तिक पक्षाकडे असायचं.?

तात्या:–वा? असं कसं होईल. एकी नसावी असं कोणी तरी ह्मणेल कां.?

सावित्री:–रघुनाथ भाउजींचा काय अभिप्राय आहे?

तात्या:–त्यांनींतर ही सभाउभी करण्याचा व एकीचा विषय प्रतिपादन करण्याचा मूळ पाया घातला आहे.

सावित्री:—आजच्या तुमच्या प्रतिपादनांत एकी होणार कां? व झाली तर सतत राहणार कां?

तात्या:—हें कोणी पाहिलं आहे. सौख्या करतां लोक यत्न करतात ते सर्वच कां शेवटाला जातात. तर तसं नाहीं, यत्न कुणी टाकला आहे कां?

सावित्री:—एकी अशी झाली पाहिजे कीं ती जन्मपर्यंत टिकेल. हें ध्यानांत असूंद्या. नाहीं तर वाळूच्या भिंतीप्रमाणें ती रचीत असतांच कोसळत असते.

तात्या:—कोसळण्याच्या गोष्टी त्या निराळ्याच असतात. ह्या प्रसंगाची गोष्टच निराळी आहे.

सावित्री—आपण असं मला सांगा कीं आजपर्यंत अशा कोणत्या गोष्टी तडीस गेल्या आहेत बरं? मी खचीत सांगतें, कीं या प्रसंगीं आपल्याच्यानं जवाब देववणार नाहीं. तर मग अशा गोष्टींत आयुष्य घालवण्यापेक्षां देश सुधारणा व स्वतःची सुधारणा यापैकीं अगोदर कोणती गोष्ट केली पाहिजे याचा विचार करणं नीट होईल असं मला वाटतं.

तात्या:-( रस्त्याकडे पाहून ) रघुनाथराव आलेसे दिसतं.

सावित्री:-हो आतां एकीचा विचार एकांतीच झाला पाहिजे, त्यांत मी खपणार नाहीं. मी जातें तर (जाते)

( रघुनाथराव येतात )

तात्याः-ये बैस असा. कसं काय ? आज माझें डोकें सारा दिवसभर चुरचुरताहेत. ज्याला जागरणाची संवय नाहीं, त्याला हें एक दुखणंच ह्मणायचं.

रघुः-संवय होई तोंपर्यंत होतं असं ? आपण वचनाच्या पूर्ततेकरतां बहुतकरून झोंप घेतली असेलच.

तात्याः-वाहवा ! वचन ! ! काय वचन महत्वाचं ?

रघुः-असं काय, एकून वचनं निरानिराळ्या प्रकारचीं असतात तर मग

तात्याः-तर काय ? जागयाचं जें महत्व तेंच वचनाचं. ह्मण आहेना " जशास तसं. " पण तुझं कसं काय ह्मणणं आहे. पुन्हा कालच्या जागीं जावं किंवा नाहीं ?

रघुः-आपल्याला वचनाचं महत्व वाटत असेल तर जावं नाहीं तर नये जाउं.

तात्याः-पण रिक्तहस्तें जाण्यापेक्षां कांहीं तरी.

रघुः-त्याचं आजच काय आहे. आणखी कधीं पाहतां येईल.

तात्याः-तसं नव्हे. तसं जाणं मला कांहीं पसंत नाहीं. ह्मणून ह्मणतो हे बघ. ( रुमालांत गुंडाळलेली पैठणी त्याच्यापुढें टाकतो )

रघुः-तूं तर अगदीं तयारींतच आहेस. मग माझं मन पाहत होतास वाटतं,

तात्या:-आता ही पैठणी तूं आपल्या बरोबर ने. त्या बद्दल कांहीं काळजी नको. माझ्या सासऱ्यानं ही आईच्या आणि बाबांच्या नकळत घेऊन दिलेली आहे. आतां, येऊनजाऊन ती बोलणार. त्याचं काय एवढं. स्त्रिया सर्वस्वी आपल्या ताबेदार आहेत. पहिल्यानं जरा खंडोबाचं वारं आणावं आणि मग समाधान करावं, कीं सांडली तर सांडली. दुसरी घेऊं, ह्मटलं ह्मणजे झालं.

रघु:-त्या भोळ्या मनाच्या स्त्रिला असा फसवण्याचा बेत केलास आं ?( आपल्याशीं ) अतांच जर याला दोन शब्द कमी ज्यास्ती बोलावं तर त्याचा कांहीं उपयोग नाहीं. बरं नाचूंद्या ? ( उघड ) तुझी मर्जी ( पैठणी घेऊन जातो)

तात्या:-( आरशांत चेहरा पाहून मिशांचे केंस सारखे बसवून, शेंडी विंचरतो व ह्मणतो ) जाइच्या वेली प्रमाणं तिचं नाजुक आलिंगन व हावभाव आणि एकांत हे प्रकार तिच्या खऱ्या प्रेमाची साक्ष देतात. यांत मला बिलकुल शंका येत नाहीं. बरं, एकवेळ ही तरी मौज पाहूं, तर आधीं जेवण खाणं आटपावं ( जातो)

सावित्री ( दरवाजा बंद करून दिवा लावते व सचिंत होऊन ( आपल्याशीं ) उसासा टाकून ज्या गोष्टीची मी काळजी करीत होते ती प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांपुढं

येऊन उभी राहिली आं? देवा. ज्या गोष्टीचा मी गर्व वाहत होतें कीं माझ्या इथं माझ्या वांचून इतर स्त्रियां-विषयीं अगदीं पराङ्मुख असायचं ह्मणून. पण त्याचा आज परिहार होण्याचं चिन्ह दिसूं लागलं. कोणत्या राक्षसणीनं माझ्या सुखांत माती कालवली कांहीं कळत नाहीं. नारायणा! ज्यांची कुलीनता, विद्या, पापभीरुत्व, ईश्वराविषयीं आस्तिक्य बुद्धि, या विषयी सर्व लोक माना डोलवतात अशा भांडारावर माझ्या समोर, दुष्टेनं दरोडा घालण्याचा बेत केला हें केवढं आश्चर्य? दुर्बुद्ध-पणा बोधानं गेला असतां पण इथं उपदेश, करण्याची प्राज्ञा कोणाची. इश्वरा? मला दुसरी कोणतीही काळजीत्वां ठेवला नव्हतीस ह्मणून हा दुःखाचा डोंगरच मजवर लोटलास काय? जेथपर्यंत बायकांवर पतीची प्रेमदृष्टी आहे. तेथ पर्यंतच कायती आमच्या अयुष्याची आणि थोरपणाची शोभा. ते वारं एकदा उलट फिरलं ह्मणजे कसलगं बाई बायकांचं जिणं? वरं मी ह्मणतें, अद्याप पर्यंत अशा कोणत्या गोष्टि आढळल्या, कीं त्यावरून माझ्या वरील प्रीतींत अंतर पडलं असं ह्मणायला जागा झाली आहे. खचितच नाहीं, उगीच तर्कानं आपला जीव काळजींत टाकणं कांहीं नीट नाहीं. "चक्षुर्वैसत्यं" प्रत्यक्ष पाहावं ते व्हां तें खरं. बराच वेळ झाला जाऊन नाहींका? तर

आतां लवकर जावं हेंच बरं. पण इथं हे टेबलावर रुमालांत काय बरं गुंडाळून ठेवलेलं दिसतं आहे. ( रुमाल सोडते ) अतां मात्र कांहीं शंका उरली नाहीं. ही मोत्याचीजाळी अर्गज्याची, डबी भरजरीची चोळी,आणि हे जडावाचं फिरकीचं फूल!! बरं आतां वर येण्याची वेळ झालींतर इथं बसून उपयोगीं नाहीं. ( जाते ) तात्या ( वरती येऊन सर्व आलंकार व बूटस्टाकिंग्ज् घालून जिना उतरणार तोंच सावित्री वर आली आणि लडिवाळपणानं हात धरून दिवाणखांन्यात तात्यांला नेते. )

सावित्रीः—जिवलगा, केवढी मी थोर भाग्याची कीं ही वेळ साधली. अशा थाटानं प्रेमाचा प्रकार माझ्या नशीबानं आज आणलान्. ( प्रेमानें कमरेभोंवती हात टाकून ) ह्मटलं सभा किती वेळ चालेल.

तात्याः—याचा काय नेम. कदाचितं उजाडेल सुद्धां

सावित्रीः—तर मग माझा मनःचंद्र आतांच मावळला किंवा कसं ?

तात्याः—हें काय असं. मला गेलंच पाहिजे. कांहीं आणखी एखादी गोष्ट विचारायची असेल तर पुन्हां कधीं विचारा पण आतां जाउंद्या. ( आपल्याशीं ) ज्या प्रियकरणीचं भाषण म्या कधीं झुगारलं नाहीं व तिला वाईट वाटेल असं कधीं अक्षर तोंडावाटें काढलं नाहीं

तिच्याशीं हा असला भाषणाचा प्रकारना ? पण करता काय !! वेळ येईल तसं वागलं पाहिजे. नाहींतर जायला उशीर होईल. ( उघड ) सोडा ह्मटलं ह्मणजे सोडावं, कितीदा माणसानं सांगावं कीं गेलंच पाहिजे ह्मणून.

सावित्रीः-बरं आहे, जायचंच तर मी काय करणार ? पण आपल्या बगलेंत काय आहे ? बुकं असतील. मग आपला विठू नाहींका नेणार तीं. आपणच कशाला घ्यायला हवं ?

तात्याः-हें काम विठूच्यानं होण्याजोगं नाहीं. सोड गडे. जाऊंदे आतां.

सावित्रीः-बरं जावं, पण फार जाग्रण करूं नये. बरंका ?

तात्याः-छेः होतां होईल तो मी लवकरच येईन पण कांहीं नेम नाहीं. ह्मणून उगीच तुह्मीं जागत नका बसूं. आह्मांला निदान दोन, तीन, तरी वाजतील. ( जातो )

सावित्रीः-एकाएकीं सरळ मनाला इतका विपर्यास कशामुळं झाला बर ? याला संगतीच कारण आहे; असो लवकरच प्रकाश पडेल ( जाते )

प्रवेश पहिला समाप्त.

---

## अंक दुसरा.

### प्रवेश दुसरा.

**स्थळ.**--चंद्राचा महाल.

**पात्रें** चंद्रा, गजाऊ, चंदूलाल, व परकी तीन चार गृहस्थ

**चंद्रा**:-( मध्यें ठेवलेल्या तक्याला टेकून बसली आहे. चंदूलाल सामोरे बसले आहेत. गजाऊ दरवा-वाज्यांत उभी आहे. परके लोक बाजूस बसले असून गोष्टी चालल्या आहेत. )

**चंद्रा**-मन मोठें चंचल आहे असं ह्मणतात, ह्मणजे काय की तें क्षणोक्षणीं निरनिराळ्या वस्तूंचा कल्पना करतं असं असून आज किती दिवस झाले माझं मन त्या मदनमूर्तीकडे सारखं गुंतून राहिलं आहे. त्याला दुसरं कांहीं सुचतच नाहीं. हें कायबरं ?

**चंदू**:-यांत नवल तें काय ? त्याला जी वस्तु प्रिय असते तिकडे त्याचं ध्यान लागणं हा त्याचा धर्मच आहे. मलाच पहाना आपल्या या गोजिरवाण्या मुखचंद्रा वाचून एक मिनिटभर सुद्धां चैन पडत नाहीं. फार काय सांगू झोपेंत सुद्धां आपलं तेच. (दाराचा कानोसा घेऊन ) हा आवाज आपल्या अभिष्ट देवतेचाच आहेसं वाटतं ध्या, लक्ष एक सारखं लागलं ह्मणजे परमेश्वर सुद्धां फळ लौकर देतो.

चंद्राः—( गाऊ लागते ) आतां कुठवरी या जिवा देऊ तरी धीर ॥ तुजवरुनिहे शरिर ओवाळिन दासि पणाची मी आज्ञा पाळीन॥ आतां देउ तरी धीर ॥ १ ॥

( इतक्यांत तात्या व रघुनाथ येतात )

रघुः—या तात्यासाहेब असे या. हा समुरचा तक्या आपल्यासाठींच आहे.

तात्या—आपणही बसा. उभे राहून आपले पाय दुखूं लागले असतील.

चंद्राः—रावजी, पुरे गडे आतां. किती मेली गरि. बाची थट्टा करायची. ( मुरका मारून पदर सावरते ) जा गडे. ही काय मेली थट्टा. ( उठून पहिल्यानें तात्याला पट्टी देते मागून रघुनाथाला व इतर मंडळींना देते ) घ्या चंदूलाल. आज आपल्याला वटवट करण्यानं फार श्रम झाले आहेत

चंदुः—त्याचा हा खरोखर परिहार आहे. बरं आतां आह्मी येतों. बिदागी झालीच ह्मणायची ( जातो )

( बाकीच लोकही जातात. )

तात्याः—रघुनाथराव, आतां आपल्याला ही परवानगी झाली ह्मणायची.

चंद्राः—कायहो रावजी? मी अद्याप पर्यंत बोललें नाहीं पण आतां बोलते. कोणाच्याही घरीं कोणीं जाई

तोपर्यंत तो स्वतंत्र असतो पण मग काहीं तो स्वतंत्र नाहीं. कां खरं कीं नाहीं. ?

रघुः—आता कशाला हवा तो शुष्कवाद हे संभाळा. (गाठोड पुढेकरून)

चंद्राः– हे काय हें ?

रघुः—ते मला कांहीं माहीत नाहीं. तुह्मी आणि हे समजूनघ्या. आतां आह्माला जाऊंद्या जरूरीचं काम आहे.

तात्याः—( डोळ्याची निशाणी करून ) आज झोपेनं अगदी कमाल केली

चंद्राः—मी मघाच ह्मणणार होतेकीं बिछाना तयार आहे. क्षणभर विश्रांती घ्यावी ह्मणून.

रघुः—तात्या ? आता आपण क्षणभर इथच आराम करा. मला एके ठिकाणीं सत्यनारायणाला जायाचं आहे. ( चंद्राला ) पाहतो आता आपली करामत. ( जातो. )

( चंद्रा दरवाजा लावून आंत येते )

चंद्राः—या मदनमूर्तीला पाहून अंतरी कशी गलबल होऊन गेली आहे. काय पहा चमत्कार. मन माशीं सारखं या ताटावरून त्या ताटावर सारखं उडत राहायचं पण या ठिकाणीं कसं एकाग्र झालं आहे. आणि मला कांहीं बाई धीर होत नाहीं.

तात्याः–कां, इथं कोण तिसरं आहे? तर आपल्याला येवढी भीड वाटते.

चंद्राः–तिसरं कोणी आहे ह्मणूनच इतका उशीर.

तात्याः–मी यांत कांहीं समजलों नाहीं.

चंद्रा–बरंच वेड घेऊन पेड गावाला जातां येतं. मी ह्मणते इथ जे कोणी तिसरं आहे. त्यानं आपल्याला सुद्धां जागेवरच बसवून ठेवलं आहे. नाहींतर इतका वेळ!!

तात्याः–ही रूपकाची सरणी अद्याप माझ्या ध्यानांत आली नव्हती. बरतर, आपण दोघं मिळून त्या लज्जेला घालवून टाकू? (चंद्राच्या गळ्यांत हात घालतो,) कां गेली कां नाहीं ती तिसरी.?

चंद्राः–( हंसून ) असं ह्मटलं ह्मणजे झालं ( तात्याला आलिंगिते ) पडदा पडतो.

प्रवेश २ रा समाप्त.

---

## अंक दुसरा.

### प्रवेश तिसरा

**स्थळः**—तात्या साहेबाच्या घरचा दिवाणखाना.

**पात्रें** तात्या आणि रघुनाथराव

रघुः–कसं काय? मी गेल्यावर मग खूप गंमत झाली कीं नाहीं?

तात्या:-तें कांहीं पुसू नकोस. एकून तिथं प्रीतीची कमाल आहे. भाषण किती मधुर. जसा प्रत्येक शब्दांत सुधारस भरून राहिला आहे. आदरातिथ्याचा प्रकार तर काय!! एका क्षणांत शत्रुचा मित्र होईल. केळीच्या गाभ्याप्रमाणें सुकुमार कांती आणि अवयव किती नाजुक, बस्स! विधात्याची कमाल आहे- बराच वेळ उडत उडत पुष्कळ प्रकारांनीं तिनें आपली इच्छा दाखवली परंतु पहिलाच प्रसंग व ती महा धूर्त, यामुळं मला हलक्यांत गणील ह्मणून मी ही बेताबातानंच होतो. पण मग सर्व यथास्थित झालं.

रघु:-आपल्या व तिच्या वचन ऋणांतून मी आतां मोकळा झालों.

तात्या:-( हंसून) वा: !! ऋण ह्मणजे काय विचारावं. कांहीं असो तुह्मीं या इहलोकीच्या रंभेशी माझा परिचय केलात हे तुमचे माझ्यावर मोठें उपकार आहेत असं मी समजतों बरं संध्याकाळीं तूं त्या सूर्य नारायणाच्या मंदिरांत भेटशीलच. मी तिथं येईन.

रघु:-बर मी जातो आतां (जातो) (तात्याची आई येते)

गंगाबाई-तिथं खुर्चीवर कोण बसलं आहेते?

तात्या:-आई मी तात्या आहे, काय पाहिजे ?

गंगाः—काय पाहिजे. ते सांगते आतां तुला. बाबा, कालरात्रीं कुठं होतास? हेंकां जाग्रण ह्मणायचं, कां दुखण्याला आमंत्रण ह्मणायच? आपल्या शरिराला जपून मग सर्व गोष्टी. खबरदार आजपासून सभे बिभेला जाशीलतर!

तात्याः—छेः छेः आई आतां रोज कांहीं इतकी रात्र व्हावयाची नाहीं.

गंगाः—घरीं केव्हां आलास?

तात्याः—पहाटेस च्याराच्या अगोदरच आलों त्या लुच्चा विठ्यानं ह्मणे दार उघडच टाकल होतन्. बरं तूं जा आतां तूं कांहीं काळजी करूं नको.( जाते )

सावित्रीः—( वर येऊन दरवाज्यास कडी घालून तात्याला घट्ट आलिंगन देते व व रंडू लागते ) देवा माझा सौभाग्य रवी अक्षय्य तेजःपुंज राहून त्याच्या प्रेमळ प्रकाशांत मी विलास करून आपलं आयुष्य मोठ्या सुखांत घालवीन असं मनांत आणित होते ती आशा सर्वस्वी नष्ट झालीशीं दिसते. कांहीं सुचत नाहीं काय करूं तरी काय?

तात्याः—हं हे काय हे, मला नको हा त्रास.

सावित्रीः—देवा!! आजकायरे मजवर प्रसंग आणलास हा. कां मला दुःखाच्या वणव्यांत लोटलस?

तात्या:–उगच तोंड लांब करून बोलावं ह्मणजे काय? चला जा घरांत.

सावित्री:–देवा लग्न झाल्याला आज थोडासा कां काळ गेला पण नाहींग बाई! असें शब्द कधीं निघत नसत. आजचं हें कांही विलक्षण दिसतं हें. मला कांही बाई सोसत नाहीं हें कोणत्या चांडाळणीनं सर्व घर धुतलं, अब्रू गिळून टाकली, लज्जा मर्यादा सर्व नाहींशीं केली, कसं हे बुद्धीवर झाकण पडलं? कांही बाई समजत नाही.

तात्या:–बस्स आतां पुरे करा; किती निर्भिडपणा हा.

सावित्री:–हे पहा. माझ्या आई बापांनीं मला आपल्या स्वाधीन केलं आहे. तर आपणच माझं संगोपन केलं पाहिजे. अग्नी, ब्राह्मण यांच्या समक्ष लग्नांत घेतलेल्या शपतेची यत्किंचित् तरी भीति बाळगायची; नाहींतर याच हातांनी माझी कायती वाट करावी. आपण जरी किती लपवा लपव केली तरी ती मला समजल्या शिवाय का राहणार आहे?

तात्या:–ह्मणजे तुह्माला मी भितो कीं काय? मी स्वतंत्र आहे. मी मालक आहे. बस्स पुरे झाला आतां त्रास आपल्या कामाला जावं यांतच बरं आहे.

सावित्री:–हे पहा मी काय बरं आपल्या सेवेला चुकलें ह्मणून माझ्यावर इतका राग! देवा या निर्मल

मनाला या दुरव्यसनाचा मळ लागेल अशी मलाच काय, कोणालाही कल्पना आली नव्हती ( उसासा टाकते ) जिवलगा जे घरीं तेंच बाहेर, आतां जास्त काय सांगूं. जे जे या नादीं लागले ते ते प्राणाला मुकले. ह्मणून ह्मणते नको उगीच भलता नाद, अजून कांहीतरी विचार करा.

तात्या:-आज उपदेशाचा काय पाऊस पडतो आहे पण आतां हें पांडित्य पुरे आहे.

सावित्री:-जिवलगा? निजल्याला कोणीतरी जागं करील. जाग्याला काय जागं करायचं आहे. "नहि पश्य-ति जन्मांधो कामांधो नैवपश्यति" इथपर्यंत स्थिति येऊन पोचली.

तात्या:-वाहवा. आह्मी आंधळे आहों नाहिंका? पळारे आतां नाहीं तर आमच्या लाथा तुह्माला लागतील, मी जसजसी तुझी भाषणं ऐकून घेतो तसं तसं तुझं पांडित्य फारच वाढवूं लागलं.

सावित्री:-देवा आतां तूं तरी मला मार्ग दाखीव.

तात्या:-होय, आतां वैकुंठाहून विष्णु तुमचे वाटाडे होऊन येणार आहेत. समजला?

सावित्री:-जिवलगा? मला हे दुःख आतां नाहीं हो सहन होत. मी इतर गोष्टी विषयीं शेखी मिरवीत नाहीं पण माझ्या पाति व्रत्याचा मला पक्का भरंवसा आहे. प्रिया

नकाहो भलत्याच गोष्टिचा अंत पाहूं.

तात्या—काय मान भावीपणा हा ? मी जितका काणाडोळा केला इतका कोणीही केला नस्ता समजलीस ? मी जर एक एक गोष्ट तुला विचारूं लागलों तर तुझ्या तोंडावाटे अक्षर सुद्धां निघणार नाहीं. असं असून तूं होऊनच ज्या पेक्षां तसा प्रसंग आणलास त्या पेक्षां दे जबाब पाहूं ? तो काजळी रंगाचा भरजरी शालू, ती फिरकीची तीन फुलं आणि ते मुरली धरच्या छबीचं चौथे फूल या तीन जिनसा कुठं आहेत. दे जबाब कोणाला दिल्यास ?

सावित्री:—नारायणा ! ! काय गहबज हा केवढं हे दूषण ? जो पर्यंत इकडून असे शब्द निघाले नव्हते तो पर्यंतच जिवंत राहण्यांत कांहीं तरी अर्थ होता. आत मात्र हा जीव जड वाटतो. अगदी नको नकोसा झालां केवढा थोरला भयंकर आरोप हा ! आणि तो तरी कुणाकडून. आतां कांहीं जगण्यांत गोडी नाहीं राहिली. ( बेशुद्ध पडते )

तात्या:—घाबरून. अरे सहज बोलण्याचा काय भयंकर परिणाम झाला हा ( तिला मांडीवर घेऊन ) जिवलगे उठउठ. हे काय सहज थट्टेनें बोलण्या वरून असं काय रागवावं ? डोळे उघडून येकदां पोटभर मा-

मनाला या दुरव्यसनाचा मळ लागेल अशी मलाच काय, कोणालाही कल्पना आली नव्हती ( उसासा टाकते ) जिवलगा जे घरीं तेंच बाहेर, आतां जास्त काय सांगूं. जे जे या नादीं लागले ते ते प्राणाला मुकले. ह्मणून ह्मणते नको उगीच भलता नाद, अजून कांहीतरी विचार करा.

तात्या:-आज उपदेशाचा काय पाऊस पडतो आहे पण आतां हें पांडित्य पुरे आहे.

सावित्री:-जिवलगा? निजल्याला कोणीतरी जागं करील. जाग्याला काय जागं करायचं आहे. "नहि पश्यति जन्मांधो कामांधो नैवपश्यति" इथपर्यंत स्थिति येऊन पोचली.

तात्या:-वाहवा. आह्मी आंधळे आहों नाहिंका? पळारे आतां नाहीं तर आमच्या लाथा तुह्माला लागतील, मी जसजसी तुझी भाषणं ऐकून घेतो तसं तसं तुझं पांडित्य फारच वाढवूं लागलं.

सावित्री:-देवा आतां तूं तरी मला मार्ग दाखीव.

तात्या:-होय, आतां वैकुंठाहून विष्णु तुमचे वाटाडे होऊन येणार आहेत. समजला?

सावित्री:-जिवलगा? मला हे दुःख आतां नाहीं हो सहन होत. मी इतर गोष्टी विषयीं शेखी मिरवीत नाहीं पण माझ्या पाति व्रत्याचा मला पक्का भरंवसा आहे. प्रिया

नकाहो भलत्याच गोष्टिचा अंत पाहूं.

तात्या—काय मान भावीपणा हा ? मी जितका काणा-डोळा केला इतका कोणीही केला नस्ता समजलीस ? मी जर एक एक गोष्ट तुला विचारूं लागलों तर तुझ्या तोंडावाटे अक्षर सुद्धां निघणार नाहीं. असं असून तूं होऊनच ज्या पेक्षां तसा प्रसंग आणलास त्या पेक्षां दे जबाब पाहूं ? तो काजळी रंगाचा भरजरी शालू, ती फिरकीची तीन फुलं आणि ते मुरली धरच्या छबीचं चौथे फूल या तीन जिनसा कुठं आहेत. दे जबाब कोणाला दिल्यास ?

सावित्री:—नारायणा !! काय गहबज हा केवढं हे दूषण ? जो पर्यंत इकडून असे शब्द निघाले नव्हते तो पर्यंतच जिवंत राहण्यांत कांहीं तरी अर्थ होता. आत मात्र हा जीव जड वाटतो. अगदी नको नकोसा झालां केवढा थोरला भयंकर आरोप हा ! आणि तो तरी कुणाकडून. आतां कांहीं जगण्यांत गोडी नाहीं राहिली. ( बेशुद्ध पडते )

तात्या:—घाबरून. अरे सहज बोलण्याचा काय भ-यंकर परिणाम झाला हा ( तिला मांडीवर घेऊन ) जिवलगे उठउठ. हे काय सहज थट्टेनें बोलण्या वरून असं काय रागवावं ? डोळे उघडून येकदां पोटभर मा-

झ्या कडे पाहा पाहूं. ( मोठ्यानं ओरडून ) हें चिन्ह कांहीं नीट दिसत नाहीं. या खरोखर निरपराधीं व एकनिष्ट असलेला मी व्यर्थ गांजली. हे भक्त वत्सल प्रभो ?? माझे सर्व अपराध क्षमा करून या प्रसंगी धांवघे. प्रिये मी चांडाळा पेक्षांहीं नीच. कीं तुझ्या मर्मावर असह्य डाग दिला, पण मला एकवार क्षमा करून माझ्यांशीं बोल, गोडसं दोन शब्द. हरहर !!! (घाबरून हाका मारतो) आई. आई. लवकर येऊन हें पहा काय अरिष्ट झालं आहे ? गंगाबाई (तात्या साहेबाची आई धांवत येऊन व सावित्री जवळ जाऊन ) अरे ही तर बेशुध्ध पडली आहे. तात्या असं झालं तरी काय ?

तात्याः—अग बोलता बोलता चक्कर आलं आणि धाडकन आंग टाकलन्. वायूची झाकतर नव्हे ना हीं ?

गंगाबाईः–बये सावित्री? अम्मळ इकडे पहा, सावध हो. तुझ्या सारखी सद्गुणी सून या जगांत कधीं झाली नाहीं आणि पुढेंही होणार नाहीं. तुझ्या सद्गुणा मुळं मला लोक किती तरी मान देतात. रघू अरे रघू !!

( रघुनाथ येतो )

रघुः––काय पाहिजे. आई.

गंगाः––जा धावत जा आणि माझ्या पेटिच्या खणांत चांदीच्या डबींत हेम गर्भाची मात्रा आहे ती घेऊन ये॥ जा. जा पळ.

( शेजारचे लोक येतात व चवकशी करतात )

( रघुनाथ प्रवेश करून. )

रघु:-आई ही घ्या मात्रा.

( गंगाबाई मात्रा उगाळून देते )

तात्याचे वडील ( घाबऱ्या घाबऱ्या ) अरे एकदम झालं तरी काय ? तात्या याचं नांव काय ?

गंगा:-कांहीं काळजी नकोहो करायला. मात्रा दिल्याबरोबर चांगली शुद्धीवर आली. जरा कांहीं पोटांत गेलं ह्मणजे चांगली हुषार होईल.

गंगा:-रघुपती ? जा, तें दूध घेऊन ये लवकर. बये असं येकदम झालं तरी काय तुला.

सावित्री:-( बसली राहून ) मला काय झालं याची कांहीं शुद्ध नाहीं माझा झोंक गेला एवढ मला स्मरण आहे.

गंगा-बरच सावरलं. बरतर बरं सगळ्या वेळा का सारख्या असतात. येखादं भलतचं व्हायचं. पण आपलं नशीब बळकट ह्मणायचंन दुसरं काय ? बरं चला आतां आपण सगळे खालीं. हिला कांहीं वेळ जरा इथच स्वस्थ पडून राहूं द्या.

( पडदा पडतो. )

प्रवेश तिसरा समाप्त.

## अंक २ रा.

### प्रवेश चवथा

**स्थळ**-कोल्हापुरांतील कृष्णराव सराफाचा वाडा.

कृष्णराव पुढे वही घेऊन हिशेब करीत बसला आहे इतक्यांत एक शिपाई कागद देऊन जातो.

कृः—पत्राकडे पाहतो. स्टांप जामनगांवचा आहे. हं व जावयाचं पत्र दिसतं. बरेच दिवसांनी पत्र आलं. ( पत्र फोडतो व वाचतो )

श्री.

ति. रा. रा. आण्णा साहेब वडिलांचे शेवेसी.

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. आलीकडे बरेच दिवसांत आपलेकडील पत्र येऊन कुशल समाचार कळला नाहीं त्यामुळें काळजी लागली आहे इकडील मजकूर आपले जांवई, मुलगी वगैरे घरांतील सर्व खुशाल आहेत मात्र आज चार दिवस झाले. सौ. सावित्री वहिनीच्या पोटांत बारिक बारिक दुखत असल्यामुळें जरा अस्वस्थ होत्या. त्यामुळें अन्न नीट जात नाहीं. मी ह्मणतों, त्यांना इथं आल्याला सुमारें अडीच वर्षें झाली असतील यामुळें आपण त्यांना तिकडे हवा पालटण्याकरतां नेलं असतां ठीक होईल. तशांत इतके

दिवस इकडे राहिल्यानं माहेरी जाण्याबद्दल त्यांच्या मनाला साहजी वाटत असेल. त्या माझ्या जवळ कांहीं असं बोलल्या नाहींत. हा माझा तर्क आहे. तथापी स्वाभावीक स्थितीवरून तो बरोबर आहे असं मला वाटतं. बायकांचा ओढा माहेराकडे असतो आणि त्यांत कांहीं झालं सवरलं ह्मणजे आधीकच वाटणें साहजीक आहे. तरी आपण येऊन त्यांना घेऊन जावं. असं माझ्या मनाला पसंत वाटल्यावरून लिहिलं आहे. कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला

रघुनाथ

कृष्ण.—बरं झालं. आज पुष्कळ दिवसांनं मुलीची खबर समजली. या अपिलाच्या खटल्यामुळें माझं चित्तच इतक्या दिवस ठिकाणीं नव्हतं. मग पत्र कसचंन काय. रघुनाथरावासारखा मनुष्य जो पर्यंत तिथं आहे तोंपर्यंत मी बिनघोर आहे. असो आपल्यालाही त्यांना भेटल्याला बरेच दिवस झाले. तर आपणच जावं. ( जातो )

प्रवेश चवथा समाप्त.

प्रवेश पांचवा.

स्थळ—तात्यासाहेबाच्या घरचा दिवाणखाना.

पात्रें—तात्या आणि रघुनाथ.

तात्या:-मित्रा काय पर्वाचा प्रसंग भयंकर!! तिनं येकदम डोळे फिरवलेन. मी अगदीं घाबरून गेलों. आ-ईनं ती मात्रा दिली मात्र ती लागलीच सावध झाली.

रघुनाथ:-झाली ती गोष्ट नीट निभावली ही पर-मेश्वराची देणगी समजा. अशा येकदम शुद्धीवर आ-णणाऱ्या मात्रेचा वळसा तुह्मांला सुद्धां घ्यायला पाहिजे आहे. असं मलाही आतांशा वाटूं लागलं आहे.

तात्या:—झाली ही मात्रा आह्मांलाच झाली असं मी समजतों.

रघु:—असं समजल्यावर आणखी काय पाहिजे.

( गडी येतो. )

गडी:-कोणी कृष्णराव आले आहेत.

तात्या:—ठीक आहे त्यांना घेऊन ये.

( कृष्णराव येतात. )

कृष्ण:—नमस्कार रघुनाथराव

रघु:—नमस्कार. यावं बसा. आज फार दिवसांनीं भेट झाली. आणि यासाठींच मी आपल्याला तसं लि-

हिलं. नाहींतर वहिनीच्या प्रकृतिच्या संबंधानं आतां ठीक आहे.

कृ:-तुह्मीं जोंपर्यंत इथं आहा तोंपर्यंत मला कांहीं काळजी नाहीं.

तात्या:-तेंही खरंच त्यानींच प्रसंग काढावा.

कृष्ण:--ह्मणजे इतकी का मुलीची प्रकृति बिघडली होती ?

तात्या:-तें कांहीं सांगतां येत नाहीं. चांगली बोलतां बोलतां घेरी येऊन येकदम बेशुद्ध झाली.

कृष्ण:-रघुनाथरावांनीं पत्रांत असं कांहीं स्पष्ट लिहिलं नव्हतं. तरी मीच यावं असं होतं तें आतां लक्षांत आलं. बरं झालं स्वतः आल्यानं सर्वांच्या भेटी झाल्या. आतां माझा विचार तिला कांहीं दिवस हवा पालटण्याला घरीं न्यायचा आहे. मग जशी आपली मर्जी.

रघु:-तें आबानां विचारलं पाहिजे.

कृष्ण:-मी अगोदर व्याह्याना व विहिणीनां भेटूनच आपला सल्ला घ्यायला आलों.

तात्या:-यांत माझा कसचा सल्ला. माझ्याहून थोर आहेत त्यानां विचारलं ह्मणजे झालं. कां रघुनाथराव. असंचना ?

रघुः—आपण ह्मणता तेंही नीटच आहे. बरं आहे. सगळ्यांचा रुकार आहे, मग कांहीं काळजी नाहीं. लवकरच महिना पंधरा दिवसांनीं पाठवून द्या ह्मणजे झालं.

( सर्व उठतात व परस्परांनां नमस्कार करून )

कृष्णः—येतों तर आतां.

रघुः—यावं.

तात्याः—( नमस्कार करतो. ) ( सर्व जातात. )

प्रवेश ५ वा समाप्त.

( अंक दुसरा समाप्त )

अंक दुसरा समाप्त.

श्रीगणेशायनमः

# अंक ३ रा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—तात्याच्या घरचा दिवाणखाना.

**पात्रें**—तात्या.

**तात्या**:—हर हर प्रीतीच्या मनुष्या वांचून एक क्षण-भर सुद्धां चैन पडत नाहीं. सध्या स्वारी माहेराहून परत येई पर्यंत मी आतां मोकळा आहे. मी ऐकतों कीं लोक ह्मणतात परवांच्या प्रसंगाला मीच कारण झालों. पण जें होष्यमाण त्याला उपाय काय. चंद्राचा या का-मांत काय अपराध आहे. पद्माकर रावाच्या घरांत चंद्रा शिरली, ती सर्वस्वी नाश केल्याशिवाय बाहेर निघत नाहीं हं; काय आश्चर्य. जे लोक प्रीतीला ओळ-खत असतील जे असं कधींहीं ह्मणणार नाहींत. बाकी आमचं कुटुंब ह्मणजे मूर्तिमंत लक्ष्मीच खरी यांत कांहीं शंका नाहीं. हा एखाद्याचा पायगुण असतो. पहाना दोन दिवस झाले ती नुक्ती गेली मात्र तोंच घरावर दरोडा पडून होत नव्हत सगळं चोरांनीं लुटून नेलं. आतां वेळे-ची पंचाइत येणार. चंद्राचं प्रेम कसोटीला लावण्याची वेळ आली आहे. मी आतां अशास्थितींत आहे ह्मणून

ती पूर्वीपेक्षां ममता जास्तच करील. तर आतां तिकडेच जावं. पण मनांत आल्या प्रमाणें पुढच्या तजविजी करतां आधीं सावकाराकडे जाऊं आणि मग तसेच तिकडे जाऊं ह्मणजे झालं. (इतक्यांत पद्माकरपंत येतात.) ताल्या, जरा इकडे ये. बाळा तूं आतां कांहीं लहान नाहीस. बरं वाईट नफा तोटा सर्व तुला समजतो. तरी व्यसनानं तुझी मती अगदी भ्रष्ट होऊन गेली आहे. माझं काय आज आहे न उद्या नाहीं. माझ्यापश्चात तुला आतां उपदेश करणारा सुद्धां नाहीं बरं. मला माझ्या स्वतः बद्दल कांहीं वाईट वाटत नाहीं. पण इतकंच दुःख होतं कीं परमेश्वरानं तुझ्या सारखा मुलगा दिला असून माझ्यामागें तुझं चांगलं चालेल अशी कांहीं आतां आशा नाहीं. झालं तुमच्या धुंदीमुळं दारं उघडी पडलेली पाहून परवा चोरांनीं होत नव्हतं ते सगळं नेलं. वाड्या वांचून आतां काहीं राहिल. नाहीं. आतां पुढं विचारकाय ? हे विचारण्या साठी तुला बोलावलं.

ताल्याः—आबा, आपण जन्म दिलांत परंतु माझ्या प्राक्तन कर्मोचा अधिकारी मीच आहे. "दैवो विचित्रागति" त्यातलीही गोष्ट आतां बोलून उगीच दुःख कशाला करून घेता. माझ्या दैवीं असेल तसं होईल.

आउताई:-अण्णा मी तुला एक गोष्ट विचारणार आहे. पण नीट बोलशीलकां?

तात्या:-ताई असं उसन्या सारखं काय? बोलतेस. कधींतरी मी तुझं मन मोडलं आहे कां?

आउ:-अण्णा तू ह्मणतोस त्याप्रमाणं प्रत्यक्ष माझं जरीं तूं कांहीं अनहित केलं नाहीस तरी आज या वयांत बाबांवर आणि आईवर जो प्रसंग कोसळला आहे त्याला सर्वांशी कारण तुझंच वर्तन आहे. मग त्यांच्या जिवाचं दुःख पाहून माझ्या पोटांत कसे कढ येणार नाहींत बरं. ह्मणून तूं जर सांगत असशीलतर. त्यानां आणि आईला माझ्या बरोबर माझ्या घरीं नेते. तुला ह्मटलं विचारावं ह्मणजे बरं.

तात्या:-ताई. तूं ह्मणतेस तेहीं ठीकच आहे. आतां त्यांच्या जिवाला जिथं बरं वाटेल तिथंच त्यांनीं रहावं यांत मलाही कांहीं गैर दिसत नाहीं. ठीक आहे घेऊन जा दोघानाहीं च्यार दिवस तिकडे. तूं माझ्या विषयीं कांहीं काळजी करूं नको. मी दिवाळीच्या सुमाराला रजा मिळाल्यास व सवड असल्यास तुझ्याघरीं येईन.

अंक ३ रा.

प्रवेश पहिला समाप्त

———

# अंक तिसरा.

## प्रवेश दुसरा.

स्थळ.--चंद्राचा दिवाणखाना.

पात्रें चंद्रा, व तात्या.

चंद्रा:-काय तरी दैव पहा! मेलं मनांत योजावं एक आणि होतं भलतंच. तशी गत. मी ह्मणत होते यंदाचा शिमगा सुखांत व ऐष आरामांत आपण उभयतां काढूं. पण प्रारब्ध!! या प्राण्याला कुठें सुखी राहू देत आहे, संकटे येऊं लागलीं ह्मणजे एकदम कोसळतात. याच वेळेला नोकरी कां जावी? मेले दरोडखोर तरी पहा. जशी दरोडा घालायला त्यांनां एवढी ही एकच जागा सापडली. मिळून तोंडवर करून बोलायला मला मार्ग ह्मणून राहिला नाहीं. मी ह्मणते तो सण राहो परता. पण माझ्या भावाच्या लग्नाचा बेत जमला आहे. आपल्याला च्यार लोकांत नावासारखं लग्न करायचं ह्मटलं ह्मणजे सात आठशें रुपये तरी निदान पाहिजेत. आणि जवळ नाहीं एक पै. अशी अडचण पडली आहे.

तात्या:-( तिच्या गळ्यांत हात घालून ) लाडके? तूं कां चिंतेत पडतेस? मिरें नासली ह्मणून जोंधळ्याला हार जातील की काय? काय चिंता आहे. यावर्षी जरी

मी नागावलों आहे, तरी या येवढ्याशा पाच चार अडचणी मला भारी आहेत असं तूं बिलकुल समजूं नकोस.

चंद्रा:-तें कसंही असो; कोणी अडचणींत असतां त्याला काडीभर देखील संकटांत घालण्याला मनाला मोठं अवघड वाटतं; पण मी ह्मणते, जसा आपला जीव तसाच दुसऱ्याचा.

तात्या:-छे: वेड सगळं. जित्रलगे, अग तूं वेडी आहेस, मित्रत्वाच्या हक्काला संकोच उपयोगीं नाहीं, मी पाहिजे तसं करून तुझं कार्याचं काम उरकतों.

चंद्रा:-( प्रीतीनें आलिंगेते ) प्राणविसाव्या, आपण आपल्या जिवाला अगदीं तसदी घेऊं नये; जर रकम आपल्याला मिळाली नाहीं तर मी आपले डागिने ठेवून अडचण काढीन, पण त्याबद्दल माझ्या प्राणाला मी कधींही संकटांत घालणार नाहीं ( तात्याच्या तोंडावरून हात फिरवून ) आतांशा पाहतें तो अगदींच दशा झालीहो. नाहीं तर या मुखेंदूची कितीतरी टवटवी. जणुकाय तेज सांडतं आहे असं दिसे. जेव्हां पाहिल्यानं. दर्शन झालं ती आठवण झाली ह्मणजे ऊर भरून येतो. ( मुका घेते) असो, ईश्वर या माझ्या प्राणाला सुखी ठेवो ह्मणजे सगळं त्यांत आलं.

तात्याः-( तिच्या पाठीवरून हात फिरवून ) "माय लाइफ् यू डोंट केअर" माझी नोकरी गेली, सर्व पैसा चीजवस्त जरी त्या दरोडखोरांच्या भक्षस्थानीं पडली, तरी येकदां तुझं हें मुखचंद्रदर्शन झालं ह्मणजे बस्स, दुःखाचे डोंगर बर्फाप्रमाणें पार वितळून जातात. आजच्या या प्रसंगीं माझं सर्व सौख्य एक तूंच कायती आहेस, ह्मणून तूं काडी इतकी सुद्धां काळजी करूं नको. रुपयाची बिषाद काय? हा घे तुझ्यापुढें ढीग करतों. (रुपये तिच्यापुढें ओततो) तुझ्या जिवापेक्षां रुपये काय जास्त आहेत? मला तुझ्या आधींच काळजी होती. होतं नव्हतं तेवढ्याचं चोरांनीं तळपट केलं तेव्हां ह्मटलं आतां पुढें काय तोड काढावी. ह्मणून तुझ्या जिवाकरतां वाडा सुद्धां गहाण टाकला आणि हे सगळे रुपये तुझ्या स्वाधीन केले आहेत. आतां नाहींना कांहीं हरकत?

चंद्राः-बरं पण ह्मटलं आतां रात्र नाहींका झाली?

तात्याः-मी तरी तेंच ह्मणतों. बोलायला काय? तूं जवळ असलीस ह्मणजे वर्षाचीं वर्ष सुद्धां पुरणार नाहींत.

चंद्राः-आपणच असं गोड करून घेतलं ह्मणजे झालं. चलावं तर. ( दोघे जातात )

---

## अंक ३ रा.
### प्रवेश तिसरा

स्थळः—चंद्राचा दिवाणखाना.

पात्रें:—चंद्रा आणि परकी दोन गृहस्थ.

चंद्राः—झालं आतां आपल्या मनांतले सर्व बेत सिद्धिला गेले. आतां तात्यासाहेबाची आपल्याला काय गरज उरली आहे ? कांहीं नाहीं, त्याच्याजवळ जें होतं नव्हतं तें सारं माझ्या स्वाधीन आहे. आतां मिळवलेले दाम जर अशा इष्की लोकांच्या भरीस घातले तर सरशेवटीं इस्पितळांत कण्हत पडून प्राण सोडण्याचा प्रसंग येईल. जुनं वस्त्र नवं होतं तेव्हां त्याला चांगली शोभा होते; ह्मणून तें जूनं झाल्यावर का डोक्याला गुंडाळून ठेवायचं आहे ? त्याचप्रमाण हें. ह्मणून आतां कांहीं तरी कारण उत्पन्न करून या रावजीना आतां नारळी पदरीं बांधलंच पाहिजे.

( तात्या येतो )

तात्याः—कां आज विचारांतसं. मी आल्याबरोबर रोज जें प्रेम दिसायचं त्यांतलं आज कांहीं नसून निराळंच चिन्ह दिसतं आहे.

चंद्राः—चिन्ह निराळं न दिसायला काय ? ज्याचं मन त्याला साक्ष असतंच.

तात्याः-माझ्या मनाला तर साक्ष या शब्दाचा हल्लीच्या वाक्यांतला अर्थ कांहीं समजत नाहीं.

चंद्राः--मनाला नांहीं ह्मणून तो डोळ्यापुढं तर नाहींना लपत, लोक माझ्या नावानं खडे फोडतात कीं चंद्राच्या नादीं लागून तात्यासाहेबाचं सर्वस्वी घर बुडालं. मी कां आलें होतें दरोडा घालायला? आणि खरोखर शपत वाहून सांगावं कीं सावित्री बाईना माहेरीं पाठविण्याविषयीं मी एक चकार शब्द तरी तोंडावाटे काढला कां? मग कां बरं मला शिव्याशाप सहन होईल. मला क्षणभर सुद्धां असलं खपायचं नाहीं.

तात्याः-हें कां वेड ह्मणायचं कां कायतरी ? ह्मणे लोकं अमुक ह्मणतातनी तमुक ह्मणतात. यांच्याशीं तला काय करायचं आहे. मी या बाबतींत तुला कधीं बोललों असेन तर सांग

चंद्रा-काय बोलण! ह्मणे लोकांशीं काय करायचं आपण एक जगांतून उठलां आहां, पण माझं तर तसं नाहींना? आपण माझं कांहीं जन्माचं पुरं करीत नाहीं त्या साठीं मला चारचौघांच्या पाय धरण्या करायचं काहीं. चुकत नाहीं. मग मी तुमच्या एकट्याच्या नादीं लागून काय करूं? माझं जन्माचं नुकसान करून घेऊं का?

तात्या:-काय चमत्कार तरी हा. माझं सर्व वित्त घेऊन मला या गोष्टी आं!! चंद्रा, आज तुझ्या आंगीं इतकं धैर्य कुठून आलं ? कांतुझं डोकं फिरलं?

चंद्रा:-बर इतकं करून सर्व गोष्टीकडे दुर्लक्ष केलं तरी आपण मला उपदेश करावा त्या प्रमाणं आपलं तरी वर्तन असतं ह्मणजे माणसाला धीर आला असता. ह्म णायचं काय कीं मला कायतो तूंच एक आहेस. अशा गोड गोड थापा मात्र ऐकून घ्याव्या पण आतां हें असे गुण पाघळूं लागले ह्मणजे मग माझ्या इथं कोणी पाउल सुद्धां टाकणार नाहीं. "परदु:खेन दु:खिता विरला" आपण काय आपल्या मतलबा पुरतच पाहता. मग त्यां- त दुसऱ्याचं कितीही नुकसान झाल तरी त्याचा विचार सुद्धां मनांत नाहीं. आपल्याला विस नखीची बाधा झा- ल्याच स्पष्ट दिसत आहे. ह्मणून ह्मणते तुह्मी माझ्या मा- डीवर पाउल टाकलत तर खबरदार. तुमच्या संगतीनं माझ्या नाजुक देहाची मात्र तुह्मी माती करण्याला तयार झाला आहा. माझं शरीर गुलाबाच्या फुलासारखं कोम- ल त्याचा सर्वस्वी नाश करण्याला तुह्मी कांहीं मागें पुढें पाहणारे गृहस्थ नव्हत. तुह्माला राग येवो नाहींतर पा- हिजेते होवो. निदान तुमची प्रकृती चांगली साफ झाल्या

खेरीज अगदी इथं येताकामा नये. इतक्यांत. ( हरबाव सदोबा येतात. )

हरबाः–( बसल्यावर ) कसं काय हये. याव, तवा रागा रागातच जनु. आमाकड गोडवानी बघाकीं.

सदोबाः–रागलई न्हायी. पन बारिक दिसतोया. कारन गालांत वाइच हसन्याच जनु चान्न पडल्यावानी सवछ दिसतया.

सदोबाः–( तात्याकडेपाहून ) काव तात्या, तुह्मी आपले या पायाला वाद्यल्यापरमानच झाला म्हनायचं न्हाइ धंदा ना उद्योग-धगा दादा बामनानीत अक्षी ताळ सोडला. ह्योपगा, आत न्हाई न्हाई तरी लाखाच्या गनतीतला असामी, पन पहाकी समद्यासनी पानी लाऊन शानी ह्या हत कोनात बसला या बायले वानी.

चंद्राः–सदोबा, त्याचं नुकतचं रामायण झालं आहे. तुह्मी आता कांहीं बोलूं नका.

तात्याः–आधी जाते बुद्धी आणि मग जातं भांडवल. असो आता झालंते काही माघारे येत नाहीं. हा दीड दमडीचा सद्या, मी आंत आहे असे समतांच पोबारा करणारा, तोच आज माझ्या पुढें तोंड करून मला लाजिरवाणे शब्द बोलतो आं! असो. सर्वच जग फिरलं परंतु "आपत्सु मित्रं ज्यानीयात्" असएक

सिद्धांत वाक्य आहे. त्याचा तरी अनुभव घेतला पाहिजे. तर आतां आपला प्रियमित्र रघुनाथ त्याकडे जावे ( जातो )

सदोबाः-राव, आपल्याला बी येऊन शान मायदळ वकत झाला. आपन बी जाउ चला. ( जातात )

---

## अंक ३ रा

### प्रवेश ४ था

**स्थळः**—रघुनाथाचें घर.

**पात्रें** तात्या आणि रघुनाथ.

तात्याः-रघुनाथाच्या गळ्याला मिठी मारून रडूं लागतो. )

रघुः—मित्रा उगा रहा. असा धीर सोडूं नको. आज देवाच्या दयेनं माझ्या घरी ताक भाताला कांहीं कमी नाहीं. तूं कांहीं एक काळजी करू नको. मनुष्याला पश्चाताप झाला ह्मणजे त्याचं लक्ष संकटातून सुटण्या करतां परमेश्वराकडे अनन्य भावानं लागतं व तशी त्याची निष्टा पाहून तो सर्वांचामायबाप पुन्हा कृपा करतो. तर कांहीं चिंता नाहीं जरी तुझी प्रकृती अगदीं क्षीण झाली आहे. तरी औषध पाणी च्यार दिवस केलं ह्मणजे पहिल्या सारखी उत्तम

होईल; तूं कांहीं घाबरूनको. माझ्या जिवातजीव आहे तों पावेतो मी तुला कधा अंतर देणार नाहीं. जें तुला गाडे लागेलतेखा. आणि स्वस्थ राहा. आताच्या आता जरी अपरात्रझाली आहे तरी कांहीं चिंता नाहीं मी वैद्याकडे जातो आणि आधीं औषध घेऊन येतो (जातो)

तात्याः—हे दीन दयाल प्रभो! मी तुला अनन्य भावानं शरण आहे. आह्मी या मायामोहांत सांपडलेल्या जीवांनीं कितीही तुझी स्तुति केली तरी जिथं वेदांनीं सुद्धां "नेति" असं एकवार नव्हे तर त्रिवार ह्मणून जे तुझ्या वर्णना विषयीं कुंठीत झालं. तिथे आह्मी ह्मणजे कःपदार्थ आहो. जीवांवर सर्वस्वी ममता करणारा तूंच एक आहेस! जीवानीं सन्मार्ग वर्ती व्हावं व तुझी भक्ति करावी याच हेतूनें तू त्यांनां अपरिहार्य संकटांत टाकतोस, ह्मणून इतकेंच मी मागतों कीं ज्या कोणत्याही संकटांत तूं आह्माला टाकतोस तीं सोसण्याला आह्माला तूं मानसिक धैर्य दे. आणि तुझ्यावरील आमची निष्टा कायम राहूंदे. प्रभो! माझ्यावर जिवा पलीकडे प्रेम करणारी आई मला आतां भेटेल काय? बाबांची कुशलवार्ता आताशा कांहीं समजत नाहीं माझ्या दुःखामुळें त्यांची काय अवस्था झाली असेल? माझी प्राणवल्लभा सह धर्मचारिणी साध्वीपत्नी जिनें मी मूर्ख बनलो ह्मणून मला

शुद्धीवर आणण्या करितां नाना प्रकारानं बोध केला ती आतां मला पुन्हा कधीं भेटेल? नारायणा! मज दीनावर कृपा करून या सर्वांची लौकर भेट कर. आतां आणखी इतकेंच मागतो कीं अशी दुःख कारक माझी अवस्था होण्याला सर्वस्वी कारण जी दुष्ट गणिका तिच्या मायापाशा पासून तूं इतर जीवांचं तरी रक्षण कर. तिच्या कपट जालांत कोणालाही टाकूनकोस.

रघुनाथ(औषध घेऊन येतो):—मित्रा आधीं हें औषध घे ह्मणजे तुला लागलीच बरं वाटेल. मग एक चमत्कारिक घडून आलेली हकीकत मी तुला सांगतो.

तात्याः-( औषध घेऊन ) बरं तूं आता कांहीं चमत्कारिक घडलेली हकीकत सांगणार होतास ती सांग पाहू. ह्मणजे मनाला चांगली करमणूक होईल.

रघुः—हे पहा. मी तुझ्या जवळून औषध आणण्यासाठीं ह्मणून निघालों आणि रस्त्यांत जातो मात्र इतक्यांत रस्ताभर पळापळ दृष्टिस पडली. कांहीं कळेना हें काय आहे. मारामारी सारखा कांही प्रकार दृष्टिस पडला. मारतोबा चालला होता. एकदा वाटे हें कां बंड तर नाही. मी अगदी घाबरून गेलों. मग बाजूला एक लोहाराचं जुनं दुकाम होतं त्यांत शिरालों आणि लपण्या करतां इकडे तिकडे सुरक्षित जागा पाहूं

लागलों. कांही सुचेना. अगदी पाचावर धारण बसली मग तिथंच एक जुनाट मोडकाभाता पडला होता त्यांत शिरून दबा धरून बसलों. मग जेव्हां रस्त्यांतला सारा दंगा मोडला आणि सामसूम झालं तेव्हां बाहेर निघालों. पण चमत्कार काय झाला तितक्यांत हें पहा त्यांत हें गाठोडं सांपडलं. हें तिथं कसं आणि कुठून आलं याची कांही कल्पना करतां येत नाही. तसाच मग धांवत धांवत गेलों वैद्याच्या घरी. इतक्याला माझा अजमास आहे की निदान दोन अडीच वाजण्याचा अंमल असावा. वैद्य माझ्या चांगला परिचयाचा होता ह्मणून जरी इतकी अपरात्र झाली होती तरी माझी हाक ऐकतांच उठून खाली आला. सर्व चौकशी बराबर करून हें औषध त्यानें दिलं आणि खात्रीनें सांगितलं कीं कसाही विकोपाला गेलेला अजार असला तरी हें इतकं औषध घेतल्याबरोबर प्रकृति चांगली पाहिल्यासारखी हुषार होईल नंतर मी तिथून निघालों तो हा धांवतच येतों आहें. बरं हें आधी गाठोडं सोडून पाहूं या.

तात्याः–( गाठोडं सोडून आश्चर्यानें ) अरे हा काय चमत्कार आहे पहा. हा पितळेचा डबा याच्या कडीवर दामोदर या नावचा एक कागद चिकटवून ठेवलेला आहे. बरं या डब्यांत आणखी एक लहान डबी आहे.

हें यांत काय लखलखत आहे ! ! हे हिरे आहेत, ही एक पाचेची आंगठी, हें काय गारुड आहे कांहीं लक्षांत येत नाहीं. बरं आधीं पत्र वाचूं ह्मणजे आपोआप समजेल. ( पत्र वाचतो ) यादीस्मरणार्थ. संवत १७६६ मि. वै. व. ३

| माल. | जागा. |
| --- | --- |
| एक लाख मोहरा एक जात अकबरीशिक्याच्या. | देवघरांत शिरताना उजव्या हाताकडील भिंतीच्या मध्यांत खाली चुन्यानें बांधलेले टाके जमीनींत आहे. |

सोने दागिने.

| | |
| --- | --- |
| गोफ १९, चंद्रहार १०, तोडे जोड ८, पुतळ्याचे हार पंचवीस, गोठ जोड १०, तनमणी २ | पाणेऱ्याच्या खोलींत पहिला माठ ठेवण्याच्या जागेच्या बरोबर लंब रेषेनें खालीं जमीनींत तीन हात खोलीवर |

किरकोळ जुने.

| | |
| --- | --- |
| शिक्के चांदीचीं भांडीं वगैरें अनमोल चीजवस्त. सर्व चांदीची | तिसऱ्या मजल्यावर जाण्याचा देवघरांतून जो रस्ता आहे, त्यानें जातांनां उजव्याहाताचे भिंतींत |

लेखनसीमा, दामोदर.

मित्रा ! ! हा मोठा चमत्कार आहे. ह्या खाणाखुणा सर्व बरोबर माझ्याच वाड्याच्या आहेत. ही माझी खात्री

झाली यांत बिलकुल शंका नाहीं. नुकतांच आमचे घरावर दरोडा पडला त्या वेळीं हें चोराचे हातीं लागून ते लपवण्याला त्याला ह्या वेळेला संधी न मिळाल्यामुळं कोणालाही संशय येऊं नये अश्या जागीं ठेवले असावे व ते माझ्याच मित्राला अकस्मात् आज मिळालं. हा केवढा देवाचा चमत्कार !! नारायणा! तुझी लील अगाध आहे. पण यांत लिहिल्याप्रमाणें तें जागच्याजागीं असलं पाहिजे ह्मणजे परमेश्वराचे उपकार अगदीं अवर्णनीय ह्मणायचे. "सानुकुलो जगंनाथः विकृतः सुकृतो भवेत्" हे अक्षरशः खरं आहे. सर्वस्वी रक्षण करणारा तोच आहे. त्याची अनुकूलता असल्यावर मग काय कमी आहे. बरं रघुनाथ, आतां तूं हे तीन हिरे घे आणि यापैकीं दोन वीक आणि एक आपल्या डाक्टर साहेबांच्या हातांत आंगठी करून दे. आज हें ऐश्वर्य भोगण्याला त्यानेंच हा देह परत दिला. सावकाराची तडजोड करून टाक, आणि हें पहा आधीं बाबांना आणि आईला पत्र लिही कीं ईश्वराच्या कृपेनें व तुमच्या पुण्याईनें पूर्वींपेक्षां आज मी दसपट अधिक संपत्तीचा मालक झालों आहे. इतःपर जे काय करायचं त्याचा विचार आपल्या येण्यावर अवलंबून

आहे. या प्रमाणें नीट चांगलं लिही. तसंच येताना बहिणींना आणि त्यांच्या मुलांना घेऊन या हें लिही ?

रघुः–आणि एक मुख्य पत्र राहिलं त्यांच नाहीं का स्मरण ?

तात्याः–तें तुला सांगायला नको. माझी खात्री आहे-तें पत्र आधींच जाणार.

रघुः–ठीक आहे. मी ती सर्व तजवीज करतों. (जातो)

प्रवेश चवथा समाप्त

अंक तिसरा समाप्त.

॥ श्री ॥

## अंक ४ था.

### प्रवेश १ ला.

**स्थळ**:—कोतवाल चावडी.

**पात्रें**:—चीफकान्स्टेबल गंगाधरपंत, व हाताखालचा जमादार.

**गंगाधर**:—आज पगाराच्या मानानं पाहतां जरी मी सरकारचा लहानसाच अंमलदार आहें, तरी माझी सत्ता खरोखर राजाहूनही जास्त आहे. मी मुख्य फौजदार असल्यामुळें गावांतील सर्व लहानथोर मला मोठा मान देतात. शिवाय पाहिजे तसा पैसा सुद्धां अगदीं गुप्त रीतीनं देतात तो निराळाच. हें सर्व वैभव जरी मला अनुकूल आहे, तरी एक गोष्ट मनाला फार खाते.

**जमादार**:—रावसाहेब अशी कोणची गोष्ट बरं ?

**गंगाधर**:—हें पहा अशी एक म्हण आहे कीं, किल्ला घेणं सुलभ पण कासोटा घेणं यापेक्षां बिकट. त्याप्रमाणें आज सारखं वर्ष झालं मी पहातों आहें कीं, या शहरांतील प्रसिद्ध नायकीण चंद्रा इच्यावर माझा सारखा डोळा आहे, पण तिथं अद्याप कांहीं बी रुजत नाहीं. कारण या शहरांतील नगरशेट या नावानं गाजणारा जो तात्यासाहेब सराफ, त्याचं तें पडलं आंगवस्त्र, तो

पाहिजे तितके पैसे ओतायला मागेंपुढें पाहाणारा नाहीं. त्याच्या जोरावर हे सगळे डौल, नखरे, आणि आमच्या विषयीं बेमुरवत, हीं फार वाढलीं आहेत हें मी ओळखून आहें.

जमादारः--पण, तात्यासाहेब माणूस पण माणूस आहे. तो खरा दिलदार आहे. एखाद्या यःकश्चित कारणानं आमचं कधीं त्यांच्या घरी जाणं झालं ह्मणजे रिकाम्या हाती आल्याचं आपल्याला कांहीं स्मरण नाहीं.

गंगाधरः- पण कायहो ! तो तात्यासाहेब ह्मणे. हल्लीं इच्या नादीं लागल्यापासून सफाई बुडाला. त्याला वेळेची सुद्धां पंचाईत आहे.

जमादारः--हरहर ! नारायणा ! अशा दिलदार मनुष्यावर असा प्रसंग. यावा आं ?

गंगाधरः—तात्या साहेबाची या प्रकारची स्थिती ऐकून कोणालाही वाईट वाटल्या वांचून राहणार नाहीं. पण चंद्रेला ह्मणावे आता कुठं जाशील ? तात्या साहेबाच्या आश्रय रूपी किल्यांत होतीस तेव्हा काय तुझे दिमाख. पण तिला ठाऊक नाहीं गाठ कुणाशी आहे ते

तात्याः—राव साहेब आपण काळजी कशाला करता. या नायकिणीचं घर ह्मणजे सर्व प्रकारच्या गुन्ह्याचं उत्पत्ति स्थानच ते. त्यांच्याकडे जाणारा येणाराला वरवर मात्र दिसत नाहीं. पण एखादी गोष्ट जेव्हां उघडकीस

येते तेव्हां मात्र ती सगळीं कारस्थानं लोकांच्या नजरेस येतात. कालच अशी एक गोष्ट कानावर आली आहे- कीं आपल्या हद्दींत एक सोनाराचा खून होऊन तो घरांतच अद्याप पडला आहे. त्यास कोणीही वारस न- सून फक्त त्याची एक बायको आहे, ती हल्ली येथें नसून चार पांच कोसांवर तिचं माहेर आहे तिथं गेलेली आहे. आणि मला अशी आंतून खबर लागली आहे कीं यांत चंद्रानायकिणीचं पूर्ण आंग आहे ह्मणून सां- गतो या खटल्यांत तिचा नक्षा उतरायला वेळ काय?

गंगाः—वा!! ही आज तूं मोठी आनंदाचीच खबर दिलीस. ठीक आहे ह्मणावे पाहून घेईन. बरे तर चला आधीं तिकडे जाऊ. कारण त्याची चौकशी करून व- रिष्ठाकडे रिपोर्ट आजच्या आज झालाच पाहिजे.

( दोघे जातात )

प्रवेश पहिला समाप्त

---

## अंक ४. था.

### प्रवेश दुसरा

स्थळ रघुनाथरावाचें घर

पात्रें तात्या व रघुनाथ

तात्याः—( बसला आहे इतक्यांत रघुनाथ येतो त्याला पाहून ) शाबास! इतक्यांत सर्व काम उरकून आलास?

रघुः—त्याला काय उशीर हे काम करण्याबद्दल एक तर माझ्या मनाची अत्यंत आतुरता. आणि त्यांत द्रव्याची अनुकूलता मग काय ? सगळी कामं वाफेच्या यंत्रा सारखी झराझर जुळून येतात. बाजारांत गेल्या बरोबर त्या हिऱ्या पैकी दोन विकले, त्याचे पसतीसशें रुपये आले. तिसऱ्या हिऱ्याची आंगठी तयार करवून आपल्या डाक्टर साहेबाना ती नजर केली. नंतर आपल्या सावकाराकडे जाऊन, हो ना करतां करतां शेवटीं साडेसत्तावीसशें रुपयावर तोड करून रक्कम त्याच्या पदरांत घातली, आणि ही पहा लागलीच वाड्याची किल्ली सुध्धां घेऊन आलों.

तात्याः—शाबास, तुझे मजवर अनंत उपकार आहेत इतकेच नाहीं तर तूं माझा गुरू आहेस. कारण कधीं न सुटणाऱ्या बाहेर ख्यालीच्या व्यसनाच्या दुष्ट परिणामाच्या प्रत्यक्ष अनुभवानें तूं मला शहाणा केलास. माझ्या सर्वांगाला घाण सुटून माझ्याजवळ कोणीही येत नसे अशा प्रसंगीं पोटच्या लेकाप्रमाणें तूं माझी सेवा चाकरी केलीस. फार काय सांगू ? तुझ्या निर्मळ मित्र प्रणयानं आज हें मला वैभव प्राप्त झालं आहे. कारण तुझ्या हातांत मिळालेला तो डबा व तें पत्र या बरहुकूम सर्व वैभव जे आज मला प्राप्त झालं आहे त्याचा मालक

तुला सहज होतां आलं असतं, असं असून यत्किंचित्‌ही लोभ न धरतां खऱ्या मित्रप्रेमानें तें तूं आज माझ्या स्वाधीन केलंस. तुझ्या सारखा मित्र देवानं जन्मो जन्मीं द्यावा.

रघुः— मित्रा तू माझा इतका स्तुतिपाठ केलास परंतु मित्रत्व एकपक्षीं कधीं संभाळलं जात नाहीं. तें सतत टिकण्याला परस्परांचीं मनं एकसारखीं निर्मल पाहिजेत, ह्मणून ह्मणतों यांत तुझ्या मनाचा मोठेपणाही वर्णनीय आहे- कारण एखाद्या हलक्या मनाचा मनुष्य असता तर ह्याच्या मनाला कुकल्पनेनं तेव्हांच ग्रासलं असतं पण तुझं मन माझ्या विषयीं प्रेमापासून लेश मात्र ढळलं नाहीं. नाहींतर कारणं का थोडी होती ? पण तुझं मन उदार तें उदारच. मी तुला या बाहेर ख्यालीच्या व्यसनाचा नाद लावला त्यामुळेंच तुला प्राणांत संकटें भोगावीं लागलीं, असं दुसऱ्या एखाद्या कच्या मनाच्या मनुष्याला वाटलं असतं व तो माझा पक्का वैरी होऊन राहिला असता. पण तुझ्या मनाला ती कल्पना शिवली सुद्धां नाहीं. आणि तूं माझे उलट उपकार मानतोस तेव्हां सांग तुझी धन्य आहे कीं नाहीं ? जगाला खऱ्या मित्र प्रेमाचा आज तूं कित्ता लाऊन दिलास. आजपर्यंत आपण हजारों मित्राचे वैरी

झालेले पाहिले त्याचं मुख्य बीज काय ? तर ते मित्र-भाव परस्पर मतलबापुरतेच असतात. त्यांत जरासं कुठं घसरतसं वाटलं की झालं पार, संपलं मित्रत्व. ह्मणून मित्रत्वाच्या हक्का विषयीं लोक आपला मतलबसिंधु सोडून देऊन खऱ्या निष्कपट प्रेमानं जर वागूं लागतील तर आपल्या देशावर कोसळणाऱ्या विपत्ती खचित लयाला जातील.

तात्याः—हे तुझे बोल अमृतापेक्षांही अधिक गोड लागतात. असो, माझीही प्रभुचरणापाशीं अशीच प्रार्थना आहे कीं, तो आमच्या सर्वांच्या अंतःकरणांत खरा मित्र प्रेम उत्पन्न करो. बरं, ठरल्याप्रमाणें पत्रें सगळ्यांनां लिहिलीसना ?

रघुः—तें तर सगळ्यांच्या आधीं केलं. बरं आतां चला वाड्यांत जाऊं. ( दोघे जातात. )

प्रवेश २ रा समाप्त.

---

## अंक ४ था

### प्रवेश तिसरा

स्थळः—तात्यासाहेबाचा वाडा.

**पात्रें**:— तात्यासाहेब, रघुनाथराव, कांहीं कारकून मंडळी.

तात्याः—मित्रा, आज देशावरची खबरबात, चिठ्ठी, पत्र काय काय आहेत ?

रघुः—आपल्या ठिकठिकाणच्या आडत्यां कडून आले. ली डांक आतांच उघडली. आजकाल दुष्काळ पीडित लोकांकारितां ठिकठिकाणीं धान्य पुरवण्याची खटपट मोठमोठ्या श्रीमान् लोकांकडून एकसारखी चालली आहे. त्यांत आपणही या श्रेयाचे भागीदार व्हावं अशा विषयीं आपले मित्र श्रीनिवासराव यानीं कलबुर्ग्याहून विनंति पत्र पाठिवलं आहे. बुंदिकोटा संस्थानातील जंगलाच्या तोडीचा मक्ता आपल्याला मिळण्या करतां केलेला अर्ज मंजून होऊन आला आहे. ( त्याच्या कानाशीं लागून ) शिवाय आपल्या जुन्या ऋणानुबंधीं नाजुक हातानीं लिहिलेलं खासगी अशी अक्षरं ज्यावर लिहिलेलीं आहेत असं एक पत्र आहे.

तात्याः—देशावराहून आलेलें धान्य व इतर जिन्नस यांचे भाव आजच्या व या मागच्या पत्रांत जे असतील त्यांत कमी जास्ती भाव पुढें होण्याचा रंग कसा आहे तें पाहून जर तेजीचा बाजार होण्याचा अंदाज असला तर माल खरेदी करण्याविषयीं ताबडतोब पत्रें पाठवावीं. जंगलाच्या तोडीचें काम आतांच हातीं घेतलं पाहिजे. तर तिकडे कोणाकोणाची योजना करावयाची व कशी काय व्यवस्था ठेवायची त्याचाही बंदोबस्त लवकर लावा. ते एक वेद पाठशाळेच्या व्यवस्थापकांकडून पत्र

आलं आहे त्यांत चांगली मदत नसल्यामुळें शाळा चालत नाहीं. तिकडे. ५०० रुपये आजच्या आज पाठवा. दुष्काळ पीडितांच्या मदतीकरतां ५०० रुपये श्रीनिवास राव यांच्याकडे पाठवून द्या. शेंदोनशें रुपये पर्यंत इतर आवश्यक दानधर्म म्हणजे कोणाचें लग्न आहे, मुंज आहे. कोणी यात्रेकरी साधू येतात त्यांच्या करतां ह्मणून तूं आपल्या जवळ ठेवून या सर्वांच्या अडचणी दूर होतील अशी तजवीज ठेव. बरं, झाली आतां रोजची कामं. आतां तूं मघाशी दाखवलेंस तें पत्र वाच पाहूं. त्यांत आणखी काय चमत्कार आहे तो.

रघुः—पत्र वाचतो. "माझ्या चित्त मानस सरोवरातील राजहंस श्रीमत रा. रा. तात्या साहेब यांस. चरणीलीन भ्रमरी चंद्रा, आपल्या विरह बाधेनें जर्जर होऊन कंठी प्राण धरून आपल्या नामस्मरणाच्या अमृतरूपी जीवनावर वाचली आहे, तिचे शतशः दंडवत विनंती कीं. आपल्या उदार आश्रयाला होतें त्यावेळीं जो माझा श्रेष्ठ मान होता त्यावर आपल्या गावांतील फौजदार गंगाधरपंत याणी झडप घालून माझी अत्यंत हेळणा मांडली आहे व माझ्यावर खून केल्याचा आरोप ठेवून माझ्या तोंडाला काळिमा लावण्याचा उद्योग त्यानीं चालविला आहे. हल्लीं मी त्यांच्या पाहऱ्यांत असून सारा

दिवस आणि रात्र डोळ्याचं पाणी कांहीं खळत नाहीं अशी माझी अवस्था आहे. करितां चरणीं विनंती इतकीच आहे कीं, जरी माझे हातून आपले अपराध झाले असले तरी ते पोटांत घालून मला क्षमा करावी व या प्राणसंकटांतून मला मुक्त करावं, कारण याचा परिणाम काय होईल याचा जरी आतां अनुमान होत नाहीं तरी कांहींतरी विलक्षण अपायकारक याचा शेवट होणार यांत शंका नाहीं. मी घाबरलें आहे. करितां या दीन दासीला या काळयवनाच्या ग्रासांतून सोडवून पुन्हां एकवार आपली अंकित करावी आणि भेटीचा लाभ द्यावा. कळावें ही विनंती.

आपली
**चंद्रा.**

तात्या:—बरं. पत्र वाचलं. या बाबतींत तुझा काय विचार आहे?

रघु:—या बाबतींत आतां असा विचार करायचा कीं जसां सर्पाला दूध घातलं असतांहीं त्याला त्या दूध घालणाराची ओळख नसते, व तो पुन्हां त्यालाही दंश करण्याला मार्गेपुढें पाहत नाहीं. तद्वतच इतउपर ही गोष्ट मानली पाहिजे. पूर्वी तुझ्या कोंवळ्या वैराग्याच्या झोकाच्या ईर्षेस पडून मी तुला चंद्राच्या घरीं नेलं आणि त्याचा परिणाम सरशेवटीं जेव्हां अगदीं विको-

पाला गेला तेव्हां माझं मन मला रात्रंदिवस खात असे व अजूनही खातं. त्यांत दु:खांत आज सौख्य इतकंच मानतों कीं तुझी शरीर संपत्ति चांगली झाली व तुला ईश्वराच्या कृपेनें द्रव्य मिळून तुझी स्थिति चांगली सुधारली. त्या चंद्रेच्या नादानं तूं आपलं राहतं घर सुद्धां घालवलं होतंस व ही गोष्ट मी मित्र ह्मणतोस आणि मला सांगितलीही नाहींस. याचा कांहीं तुझ्याकडे दोष नाहीं. कारण त्या प्रसंगी माझी अनिवार लज्जा तुला वाटली असेल आणि तसं होणं साहजिक आहे. ह्मणून ह्मणतों याप्रमाणे बुद्धीला भ्रम उत्पन्न करून आपल्याला संकटांत टाकणाऱ्या या मायावी स्त्रीयांचं कधीं दर्शन सुद्धां नको. तुला माहीत आहेनां, कीं, श्रीरामचंद्रावर भरतापेक्षांही अधिक प्रेम करणारी कैकयी त्या दुष्ट मंथरेच्या बुद्धीला लागल्यानं केवढा भयंकर परिणाम गुदरला तो आणि त्यांत तुला स्वत:चाच पूर्ण अनुभव या कामांत गुरु आहे. इतकं असून तूं मला माझें मत विचारतोस त्यापेक्षां तूं प्रत्यक्ष धर्म आहेस. असं ह्मणावं लागतं. असो आतां हें पत्र सुद्धां ठेऊन उपयोगीं नाहीं. ( पत्र फाडून टाकतो. )

तात्याः—चला, आजची नित्याची कामकाजें सगळीं मिसलीला लागली. चल आतां घटकाभर बागेत जाऊं.

रघुः-बागेंत जायला तुला आतां मन मुरादवेळ आहे. तूं जा तिकडे. मी आतां ठरलेल्याप्रमाणें सर्व तजवीज करण्यासाठीं जातों. ( दोघे जातात )

प्रवेश तिसरा समाप्त.

---

## अंक ४ था

### प्रवेश चवथा

**स्थळ**—तात्यासाहेबाचा बागेच्या.

**पात्रें**—तात्यासाहेब, सावित्री आणि तिची एक सोबतीण यमुना.

**सावित्रीः**-काय चमत्कार तरी हा !! हा जाईचा ताटवा पहा फुलांनी व कळ्यांनीं सर्व वेल व पानं कशीं अगदीं झाकून गेलीं आहेत. हेंच एक महिन्यापूर्वी इथं एक फूल किंवा कळी सुद्धां नव्हती.

**यमुनाः**-खरंच तें, ज्यावेळीं जें व्हायचं त्याच वेळीं तें होत असतं. यालाच ऋतुमान ह्मणतात, अग द्राक्षाच्या वेली आपण पाहत नाहींकां ?

**सावित्रीः**-या जाईचीं फुलं तोडून त्याचे हार गजरे करण्यापेक्षां रात्रीं इथंच पलंग घालावा ह्मणजे सुवासही मिळेल आणि ताटव्याची शोभाही कमी होणार नाहीं.

**यमुनाः**-तसंही केलं असतां चालेल. सावित्री तुला फुलांचा उपयोग चांगला समजतो. बरं. सांगातर तात्या

भाउजीना आणि येउंद्या बागेंत पलंग एकदाचा.

सावित्रीः-( हसून ) पुरे बाई किती थट्टा करशील? मी आपली भोळी मनांत आलं तें बोलून गेलें. कोणत्याही गोष्टीची एका हातानंच टाळी वाजत नाहीं.

यमुनाः-मी कांहीं हें ऐकून घ्यायची नाहीं. तात्या भाउजी कमीकां हौसी आहेत! तुझ्यापेक्षां कांकणभर जास्तच असें समज. तूंतर नुसता पलंग आणायचा ह्मणतेस, पण गोष्ट काढ मात्र कीं भाउजी ह्मणतील इतकं कशाला त्यापेक्षां नुसत्या फुलांचाच बिछाना करावा.

सावित्रीः-असो. त्याचा आतां विचार कशाला जेव्हां जें व्हायचं तें होईलच पण आतां या फुललेल्या कांहीं कळ्या काढूं कां ?

यमुनाः-जर त्या उपयोगाला लावणार असलीस तर अवश्य काढ.

सावित्रीः-उपयोग कां नाहीं. मी त्याचा गजरा करतें व तो आपल्या घरीं नजर करा ह्मणजे झालं कीं नाहीं त्याचा उत्तम उपयोग. ?

यमुनाः-हेंही खरंच. सावित्री तूं खरोखर मोठी शहाणी आहेस, दुसऱ्याला बहुमान देणें व गौरवणं

आणि प्रीति वाढवणं हे गूण थोड्याच बायकांत सांपडतील, पण हें पहा वळणाचं पाणी वळणालाच जायचं. असं !! मी समजलेंहो तुझ्या मनातला हेतू तुझ्या मनांत काय कीं, तूं गजरे तयार करावेस आणि मी आग्रह केल्यावर मग आपण ते भाउजीनां द्यावें हाचना तुझा हेतू ?

सावित्रीः—तूं किनई कमाल केलीस कांहीं कल्पनेची हो. इतकं कुठें शिकायला गेली होतीस तरी ?

यमुना—तुझ्याच जवळ.

सावित्रीः—शाबास. एक एक शब्द कसा ठेऊन दिलेला आहे अगदीं. बरं, मोज हे गजरे किती तयार झाले आहेत ते. मग तूं सांगशील तसंच करीन. झालंना आतां.

यमुनाः—मीच सांगतें कीं आपण आपल्या नाजूक हातांनीं ते तिकडे गळ्यांत घालावे आणि दोन हातांत बांधावे. समजलीस आतां. ह्मणजे कसं गोड दिसेल बरं ? आधीं त्यातले चार पांच एके ठिकाणीं जोड ह्मणजे गळ्यातला हार सजला. आणि हा एक आणि तुझ्या हातातला असे दोन हातामध्यें होतील. काय अगदीं तोंडापुरता मांडा, अग अगदीं बेताचेच झाले आहेत. ते पाहिलस कां ? इकडेच यायचे आहे हो.

( तात्या येतो व दोघीस पाहून )

तात्याः-कां काय चाललं आहे एकांत ? पण कोणाच्याही एकांतात तिसऱ्यानं जाऊं नये. असं शास्त्र आहे. ह्मणून ह्मणतों मी आपला सहज आलों, पण तुह्मीं आह्मांला वेड्यांत नाहींना काढणार.

यमुनाः—बरोबर आहे. आपण ह्मटलं त्यांतला अर्थ मी समजल्यें. आतां आपल्या उभयतांच्या एकांतांत तिसरी मीच आहें.

तात्याः— शाबास, तुमच्या सारखी चतुर फार विरळा. माझं बोलणं तुह्मीं आपल्यावरच ओढून घेतलं आं !!

यमुनाः-( सावित्रीच्या हातांत गजरा देऊन ) हं. ह्मटलं आतां कांहीं बाई वेळ फुकट नको जाऊ देऊं, कां नवी नवरी का आहेस तूं ? मघाशीं आपल्याशीं चाललेलं मनोराज्य आतां प्रत्यक्ष दृष्टिपुढें उभं आहे. हं, घ्या ह्या हार आणि घाला गळ्यांत मग ते गजरे देते. या ताटव्याला एकदां कृतार्थ होउंद्या.

सावित्रीः-हें ग काय असं ? मी नाहीं गडे.

यमुनाः—माझी भीड वाटत असली तर ही मी आड उभी राहते. ( जाते. )

तात्याः-अहाहा !! या वेळच्या लज्जेनं या शरिराला किती शोभा आणली आहे बरं ? तो हातांत फुलांचा हार

आणि ती उभं राहण्याची ढब, या वेळेला खचित चित्रच काढून ठेवावसं वाटतं. बरं आतां कितीवेळ उभं राहायचं माझे पाय नाहीं का दुखत ?

सावित्रीः–आपल्या ह्मणण्याचाच उशीर होता ( गळ्यांत हार घालते. व हातांत गजरे बांधते. ) या मदनमूर्तीची सुद्धां या वेळेची तसबीर काढून ठेवावी असं मलाही वाटतं.

तात्याः—बरं, विषय सर्व प्राणीमात्रांनां सारखाच आहे. असं जें वाक्य आहे कीं "सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् ;" ह्मणजे काय तुला सांगता येईल. सांग पाहूं. ?

सावित्रीः–हें काय ? मी का आपल्यासारखं शिकलेली कां आहे. मी कांहीं तरी कल्पनेनं आपलं सांगेन येवढंच.

तात्याः -बरं कल्पना तरी ऐकूद्या.

सावित्रीः–मी ह्मणतें त्याचा अर्थ इतकाच घ्यायचा कीं तो सर्व प्राणीमात्रानां सर्व साधारण आहे येवढंच. बाकीं त्याला अधिक चांगलं रूप देणं व अनेक उपचारांनीं तो वृद्धिंगत करणं हें मात्र मनुष्य प्राण्यावांचून इतरांनां साधायचं नाहीं. ह्मणून अनेक प्रकारच्या साहित्यांनीं विषयरसाची गोडी वृद्धिंगत करणें हें मनुष्यांच्या ज्ञानाचंच फळ आहे.

तात्या:-अहाहा!! किती मधुर भाषण तरी. आणि प्रश्नाच्या मतलबाला कसं तोलाला तोल. आणि शंका समाधान किती समर्पक आहे. एखाद्या शिकलेल्याला सुद्धां अशी जबाब देण्याची शैली साधायची नाहीं. प्रिये तुझ्यासारखं असं सद्‌गुणी स्त्रीरत्न माझ्या अंकित असल्यामुळं मी आपल्याला किती भाग्यवान आणि धन्य समजतों. मला खचित वाटतं कीं स्वर्गांत सुद्धां माझ्या सारखा सुखी कोणी नसेल.

सावित्री:-आणि आपल्यासारखा गुणाचा परिक्षक असला तरच त्या गुणाचा विकास व्हायचा, तेव्हां ह्मणतें मीही भाग्याची आहें असं नाहींका होत.

तात्या:-शाबास, या तुझ्या भाषणांत किती अर्थ गौरव आहे.

तात्या:-बरं प्रिये, असंच गोड उत्तर आणखी एखादा प्रश्न विचारला तर देशीलका?

सावित्री:-ह्मणजे. ?

तात्या:-ह्मणजे इतकंच कीं, तिथं थोडासा ह्मटला तर सवती मत्सर उत्पन्न होऊन तुमच्या शांत विचार शक्तीला कदापी थोडा ताप होण्यासारखं तें कारण आहे ह्मणून.

सावित्री:-कोणत्याही विषयांत खरा अभिप्राय वि-

चारल्यावर जर मन निःपक्षपातानं न वागेल तर अन्याय नाहीं कांहो होणार?

तात्याः—ज्यापेक्षां हे तत्व आपण जाणता त्यापेक्षां आतां विचारतों. हें पहा सांप्रत चंद्रेवर. चंद्रा—ह्मणजे तुमची फार जुनी सवत, आले का लक्षांत? तिच्यावर खुनाचा आरोप येऊन ती भयंकर प्रसंगांत आहे. या वेळीं तिला कांहीं मदत करावी किंवा नाहीं. याबद्दल आपले मत मला पाहिजे आहे.

सावित्रीः—सर्व प्राण्यांना आत्मरक्षण हा धर्म पहिला आहे. त्या प्रमाणं जर ही आत्मरक्षणाची बाजू तसं केल्यानं बिनधोक राहत असेल तर प्रत्येक प्राण्यानें दुसऱ्या प्राण्याला मदत करणं या तत्वाचे अवश्य अवलंबन केले पाहिजे हे न्याय्य आहे. आता या बाबतीत साधकबाधक प्रमाण जी आपल्या जवळ असतील त्यांवरून विचार केला ह्मणजे याचं उत्तर आपलं आपल्यालाच देता येईल. आतां प्रसंग विशेषीं हा नियम सुद्धां बाजूला ठेवणं भाग पडतं, व तसं केल्यानं कोणताही दोष उत्पन्न न होतां त्या पासून श्रेष्ठ धर्मश्रेयाचा लाभ होतो. ह्मणजे ज्यांला आपण पारमार्थिक लाभ असं ह्मणतों. पण ही आपण विचारलेली गोष्ट मात्र त्या तत्वाला लायक नाहीं. हें मात्र मला पक्कं ठाऊक आहे. ह्मणून ह्मणतें याचा विचार आतां आपणच करावा.

तात्यरः—शाबास! शाबास! प्रिये तुला न्यायचं तत्व सुद्धां इतकं कळतं हें पाहून अधीकच मनाला संतोष होतो.

सावित्रीः-पण गुरु आपणच ना? मैना जी गोड बोलते त्यांत शिकवणाराची तारीफ, आवाज ही देणगी ईश्वर दत्तच आहे.

तात्याः—प्रिये, तुझं जितकं वर्णन करावं तितकी वर्णनाची हौस अधिकच वाढते. बरं तर, आतां एकदा शेवट गोड झालाच पाहिजे. तिथं मात्र मझा हक्क आहे. कां खरं?

सावित्रीः—जा गडे. इथं मी कायतरी जबाब देणार?

तात्याः—इथं जबाब देण्याला जागाच नाहीं. अशा मुद्यावरच मी तुह्माला आडवलं आहे. कां खरं की नाहीं.

सावित्री—आपण ह्मणाल तें खरं.

तात्याः—तिला आलिंगन देतों.

(पडदा पडतों)

अकं चवथा समाप्त.

श्री.

## अंक ५ रा.

**स्थळः**—सेशन कोर्ट.

**पात्रेंः**--जज कोर्टाचे इतर कामगार मंडळी. वकील, चंद्रा, साक्षिदार वगैरे.

क्लार्क ऑफ् धि क्राऊनः—या गुन्ह्यातील आरोपी चंद्रा नायकीण व रामा यांजवर आरोप ठेवण्यांत आला आहे तो येणें प्रमाणें आरोपीनीं आपला दुष्ट हेतू साधण्या कारितां तारिख ५ माहे आक्टोबर सन १८९९ रोजीं रात्रीं या गावांतील एक सोनार, नांव मुकुंद शेट बिन गोपाळ शेट वाटोळे याचा खून केला; त्याबद्दल इंडियन पिनल कोड कलम ३०२ अन्वयें खुनाचा आरोप ठेवण्यांत आला आहे. आरोपी नंबर २ रामा यानें माजिस्ट्रेट समोर दिलेला जबाब. ते आरोपी नंबर १–२, मुद्देमाल सुरी, लाटण्याचा तुकडा व पातळ. कोर्टापुढें हजर आहेत. आरोपीतर्फे वकील श्रीपतराव व सरकारतर्फे प्रासिक्युटर शेषप्पा हजर आहेत. जूरर्स इसम ५ हजर आहेत. त्यांची नांवें–रा० रा० सुंदरराव अमृतराव अजरेकर, रा० रा० संजीवनराव व्यंकटेश कुडची, रा० रा० भवानराव लिंगु कोलपेक, रा० रा० कृष्णराव बाबा साहेब कानिटकर व रा० रा० चिंतामण दिगंबर हसबनीस. आरोपी तर्फे वकिलाच्या सांगण्यावरून कोर्टाचा

हुकूम कीं या खटल्यांत ज्यांचा साक्षी देण्याचा संबंध आहे त्याणी बाहेर जावें.

शेषप्पाः–आरोपी चंद्रा व रामा तुमच्यावर माजिस्ट्रेट यांजकडून चार्ज ठेवण्यांत आला आहे तो ऐका-

चार्ज माजिस्ट्रेट वर्ग १ ला यांचा.

मी एच्. जे. टर्नबुल माजिस्ट्रेट–आरोपी चंद्रा व रामा राहणार जळगांव याजवर असा चार्ज करतों कीं, ता. ५ माहे जून सन १८९९ इसवी रोजीं, मयत मुकुंदशेट याचा खून सदरहू आरोपितांनीं केला असावा असें मजपुढें झालेल्या चौकशींत दिसून येते. यास्तव या गुन्ह्याची चवकशी करण्याचा अधिकार सेशन कोर्टास आहे. सबब इंडियन पिनलकोड कलम ३०२ प्रमाणें गुन्ह्याचा चार्ज ठेऊन सदरहू कोर्टाकडे आरोपीस चौकशीकरतां पाठविलें आहे तर इंडियन पिनलकोड कलम ३०२ प्रमाणें या गुन्ह्याची चौकशी सेशन जड्ज जिल्हा खानदेश यांणी करावी.

जडज्ः–आरोपी नंबर १ चंद्रा नायकीण आणि आरोंपी नंबर २ रामा घाटी सदरहू चार्ज वांचून दाखविल्याप्रमाणें तुह्मी गुन्हा केला किंवा नाहीं ?

रामाः–मी गुन्हा केला नाहीं.

चंद्रा:--मी खून केला नाहीं व मला याबद्दल कांहीं माहित नाहीं. हें सर्व माझ्यावर कुभांड रचलेलें आहे माझी चवकशी व्हावी.

पोलीसची जबानी

चीफ कानस्टेबल गंगाधरपंत--ता. ६ माहे सप्टेंबर सन १८९९ रोजीं सकाळीं आह्मास खबर लागली कीं, मुकुंदशेट सोनार याचा मुर्दा झाला आहे. व तो त्याचे घरांतच पडलेला आहे. नंतर आह्मी पंच घेऊन त्याचे घरीं गेलो. पंचनामा केला. मानेंत सुरी खुपसून मारल्याचें पंचाचे नजरेस आलें. सुरी तेथेंच मिळाली. ती रक्तानें भरलेली आहे. मुर्दा डाक्टरकडे परिक्षेस पाठविला. व मयताची वारस बायको हिला तिचे माहेरचे गावाहून बोलावून आणली. तिचे हकीकतीवरून आरोपी चंद्रा इच्या संबंधांत खून झाला असावा असें समजल्यावरून तपास करतां पुरावा मिळाला सबब आरोपी यांजवर खटला करून माजिस्ट्रेट वर्ग १ ला यांजकडे रवाना केला. पंचनामा कज्ज्यांत दाखल आहे.

## पंचनामा

खालीं सह्या करणार राहाणार मौजे जळगाव जिल्हा खानदेश ता. जळगांव. आह्मास मयत मुकुंदशेट याचे प्रेत दाखविलें. त्याच्या गळ्यावरील वार लागलेला

आह्मी पाहिला व तेथें रक्तानें भरलेली सुरी व कपडे मिळाले आहेत यावरून आमचे नजरेस असें येतें कीं सदरहु सुरी मयताचे मानेंत कोणीतरी भोसकून खून केला असावा. मयताच्या आंगावर दुसऱ्या कांहीं जखमा नाहींत.

सह्मा—कृष्णाजी आबाजी कुलकर्णी.

वसंतरामजी पितांबर वाणी.

क्रास. प्रश्न० आरोपी चंद्रास कुठं पकडली.

उ० तिच्या घरीं.

प्र० त्यावेळेस ती काय करीत होती?

उ० सामानाची बांधाबांध करून ती बाहेरगावीं जाण्याच्या बेतात होती.

प्र० तुह्मी तिला धरली त्यावेळेस ती काय बोलली?

उ० तुजवर खून केल्याचा आरोप आहे असें आह्मीं बोलल्यावर ती तोंडानें भलतेंच बोलूं लागली व तिची नजर फिरलेली होती.

प्र० ज्या जागीं मुर्दा पडला होता त्या जाग्याची स्थिति पंचनाम्यांत कां लिहिली नाहीं?

उ० ती लिहिण्याची राहिली व त्या जाग्यांत दारूच्या रिकाम्या झालेल्या बाटल्या २ सांपडल्या आहेत त्याही लिहिण्याचें राहून गेलें.

प्र०हा गुन्हा आरोपिनेंच केला हें कसें समजलें?

उ०चौकशींत समजून आलें.

शि:-( पुकारतो ) रखमाबाई हजर है.

रखमाई:-माझं नांव रखमाई. नवऱ्याचं नांव मुकुंदशेट, जात सोनार, उमर वर्षे २३, धंदा घरकाम, राहणार जळगांव, सुमारें ८ महिन्या पूर्वी मी नवऱ्याची परवानगी घेऊन येथून सात आठ कोसावर माझें माहेर आहे तेथें बाळंतपणा करतां गेलें होतें. मयत मुकुंदशेट हा माझा लग्नाचा नवरा आहे. मी गेलें तेव्हां माझ्या नवऱ्याची प्रकृति चांगली होती त्याचा खून होऊन मयत झाला व तो खून चंद्रानायकीण इणेंच करविला आहे. अशी माझी खात्री आहे, कारण मयताचा धंदा सोनार काम करण्याचा असोन चंद्राचे कामकाज दागिनें वगैरे करण्याचे नेहमी मयताकडे येत असत त्या संबंधांत मयताची व चंद्राची दोस्ती ही जमली होती- आज चार वर्षांपासून याप्रमाणें उभयतांचें दळण वळण आहे. चंद्राला पुष्कळ पैसेही मयता कडून पोंचले आहेत. मी बाळंत होण्याकरतां माझे माहेरी जाण्याचेपूर्वी हातांतील सोन्याच्या तोड्याबद्दलमयताचे वचंद्राचेमोठें भांडणझाल्याची मला ठाऊक आहे. त्यांत वाडेकरीण सखूनायकीण इज कडे मयताचे मन वळल्या वरून तिचे हातांत चंद्राचे

तोडे घालण्या साठीं दिले होते यामुळें व पुढें ते तोडे माझे आहेत असें मयत चंद्रेस ह्मणत होता. व चंद्रा ही मयतावर डाफरून ह्मणाली कीं माझ्याशीं बेमानी करून तिकडे जडलास आणि माझा मालही तिला देऊन मला नागविलेंस याचा सूड मी घेईन ते दिवशीची जिकीर खंडू न्हावी व दुसरे कांहीं जम लेल्या लोकांनी मध्यस्ती पडून मोडली. पुढें मी ही माहेरी गेलें तिथे चार सहा महिने होतें. नवरा मेल्याची खबर मला दुसरे दिवशीं गावांतून मुद्दाम माणूस आल्यावरून समजली. तेव्हांच हें कृत्य चंद्रांचें आहे असा मला संशय आला चंद्राची व मयताची दोस्ती भांडणानंतर वरकांतीच होती. सखूची व मयताची दोस्ती मरेपर्यंत होती असें मी सांगते. कारण बाळंतपणांत तिणें मला खण कुंची वगैरे साहित्य पाठविले होतें. चंद्रेची व माझीही ओळख आहे. तिचें माझें बोलणें नसे परंतु एकदां मुद्दाम तिणें घरीं येऊन मला गाठून सांगितलंकीं सखूच्या नादी तुझा नवरा लागला आहे याचा परिणाम नीट नाहीं. घरांत मिळालेली सुरी अद्याप रक्तानें भरलेली आहे. ती मी परवा आल्यावर पाहिली. ती आमच्या घरची नाहीं. तिची मूठ लांकडी नवीन बसवलेली दिसत आहे. फोटोनें दाखविलेले करवती

काठी पांढरें पातळ माझें आहे. तें मयतानें मजबरोबर तंटा करून घरांतून नेलें व तें चंद्रास दिलें. त्यावर बि-ट्याचें नांव मयताचें आहे तें कोर्टानें पहावे. पातळ दि-ल्यास सुमारें एक वर्ष झालें असेल. त्यावरील नांव परि-टाला धुण्याला देते वेळीं घातलें आहे. मयतानें माझे वडील मुलाचे हातातील सोन्याची कडी मोडून चंद्रास दिली; व त्यांत तिणें आपलें कांहीं सोनें भर घालून पाटल्या केल्याहोत्या. त्या पुढें दुरुस्त करण्य करतां मयताकडे आल्यावर त्याच पाटल्या मयतानें सखूसदिल्या. आणि त्याकरतां चंद्राचा व मयताचा वाद होऊन द्वेष उत्पन्न झालाहोता. दोस्तीच्या संबंधांत व द्रव्य संबंधांत इर्षेस पेटून चंद्रेनें हा खून करविला आहे असें मला खास वाटतें, माझ्या नवऱ्याला दारुचा नाद फार असे. त्याच्या हातांत दहाबारा तोळ्याची सलकडी मी गेलें तेव्हां होती. हल्लीं ती मयताचे अंगावर नाहींत, व मी आल्यावर पाहिलें तों घरातील पुष्कळ चीजवस्तही नाहीशी झाली आहे. राधाचें व माझें कधीं बोलणें होत नसे.

(क्रास):—पाटल्याबद्दल चंद्रा तुला कांहीं बोलली कां?

उः— होय. माझ्या पाटल्या त्या रांडेला दिल्या व मला दगा दिला. पाहून घेईन असें चंद्रा डाफरली होती.

प्रः—ही गोष्ट तूं नवऱ्याला कळवाली होतीस किंवा नाहीं?

उः—तो मजबरोबर चांगला बोलत नसे सबब मी कळवली नाहीं ?

प्रः—आरोपी रामा तुझे घरीं कधीं येत असेकां ?

उः—माझ्यासमक्ष कधीं कधीं फक्त चिलमेंत विस्तव मागण्यास येत असे. त्याखेरीज कांही येत नसे.

प्रः—तुझा नवरा रात्री घरी निजत असे किंवा कसें ?

उः—या वर्षांत चंद्राचा नाद लागल्यापासून माझें नांव नाहीं. तो चंद्रेच्याकडे निजत असे.

प्रः—जर तो चंद्राकडे निजत असे तर तुला मुलगं कसं झालं. ?

उः—भांडण वगैरे करून एखादे दिवशीं रात्रीं मी त्याला घरीं ठेवून घेत होतें त्यांत ईश्वराची कृपा, फार तर काय तो जर घरीं निजला असला तर चंद्रा घरी येऊन त्याला उठवूनही नेत असे.

शिपाईः—( पुकारतो ) उमाबाई हजर है.

उमाः—माझी जात मराठी. धंदा घरकाम उमरवर्षें ४५ मी चंद्रा कसबिणीच्या शेजारी राहतें. कोर्टानें दाखविलेली सुरी पाहिली. ती चंद्रा नायकिणीची आहे. कारण कांहीं चिरण्यासवरण्यांकरतां ती मी बरेच वेळा नेली असल्यामुळें मला माहीत आहे. तिला मुठ नवील बसवलेली आहे. तेंही मला ठाऊक आहे कारण आठ महिन्यापूर्वीं शेजारचे बिसाव्याचें कोंबडें चंद्राच्या घरांत शिरून त्रास देउं

लागल्यामुळें तिणे ती त्याला फेकून मारली. ती दगडाच्य भिंतीवर आपटून तिची मूठ मोडली असल्यामुळें चंद्रानें नवी मूठ आपले घरांतील जुन्या लाटण्याची माझ्या मुलाच्या हातून नवी बसवून आणली. मूठ मोडली त्या दिवशीं मी चंद्राच्या घरीं गेलें असल्यामुळें तें मला ठाऊक आहे. सुरी फार चांगली आहे. आतां इला कसं करावं असं ह्मणून तिणे घरांतून एक जुन लाटणं आणून दिलं व त्याची मूठ करण्यासाठीं हें बरं आहे असं तिनें व मी ठरवून तें मूठ बसवण्याकरतां मला दिलं तें मी मुलाच्या हवाली करून त्यानें सुताराकडून मूठ बसवून आणून तिला दिली. कोर्टानें दाखविलेला लाटण्याचा तुकडा याचीच मुठ सुरीला बसवलेली आहे. सुरी दुरुस्त करून आणल्यावर ही किरयेक वेळां ती मी मागून नेली होती. आरोपी नं० २ रामा हा एक महिन्यापासून चंद्राकडे फार जात येत असतो. त्याबद्दल लोभामुळें चंद्राला मी दोन चार वेळां सांगितले कीं असा डांबिस मनुष्य तुजकडे येणें बरोबर नाहीं. रामा हा वाईट चालीचा असल्याबद्दल लोकांत गवगवा आहे, ह्मणून मी बोलले. मयत सोनार याचा खून झाल्या रात्रीं चंद्राच्या घरांत आवशी पासून पहाटपर्यंत गडबड असल्याचे व दोन तीन वेळ तिचा दरवाजा वाजल्याचें ऐकूं आलें. कारण तिचा आमचा शेजार एक भिंत मध्यें आहे यामुळें सहजी ऐकूं येते.

(क्रास:)-मयत, मयत झाल्याचे दिवसापूर्वी रामाला कधीं चंद्रेचे घरीं पाहिला होतास कां ?

उ:-ज्या रात्रीं मयत झाला ते दिवशीं दुपारचे च्यार वाजतां मी रामाला तिचे घरीं बसताना पाहिला तो अलीकडे चंद्राचे घरी हमेष बसतो. आणि जसा घरचाच आहे असा वागत असतो.

प्र:-चंद्रा पाटल्याबद्दल कांहीं बोलत असे कां ?

उ:-त्या मयतानें घेऊन सखूस दिल्या असें बोलून शिव्या देत असे .

शिपाई ( पुकारतो ) सदू सीताराम हजरहै:—

सदू:-ही सुरी चंद्राची आहे. तिच्या सांगण्यावरून गोविंदा सुतार याजकडून मी तिला मूठ ह्याच लाटण्याची कापून बसवून आणली आहे. आरोपी रामा यास मी ओळखतों. तो चंद्राबाईकडे फार लोभानें असतो मला या खुनाच्या बद्दल कांहीं हकीकत माहीत नाहीं

(क्रास)-प्र०मूठ बसवण्याकरितां सुरी व लाटणे तुला कोणी दिले व त्या सुरीला जुनी मूठ होती किंवा नाहीं?

उ-आरोपी चंद्रानें दिली, व लाटणंही तिणंच दिलं. व मजुरी साठी दोन पैसे दिले. ही सुरी व लाटण्याचा तुकडाहीं तींच आहेत सुरीला जुनी मूठ नसून सुटें पातें होतें.

शिपाई:-मैना हजर है.

मैना:-मी चंद्राबाईकडे घर काम करण्याला

असते. त्याबद्दल मला दरमाहा दोन रुपये पगार मिळतो. मी दोन वर्षांपासून त्यांच्या घरीं काम करीत आहे. मयत तिचा यजमान होता. पाटल्या व पातळ ह्या जिनसा मयतानें तिला दिल्याचें तिनें मला सांगितलें होतें. अलीकडे चंद्राचे व मयताचे वाकडें आलें होतें, हें ही मला ठाऊक आहे. कारण चंद्रा नेहमी रडत असे व कधीं मेल्याचा मुर्दा पाहीन असे उच्चार तिच्या तोंडचे मी ऐकिले आहेत. सखू नायकिणीकडे मयताचा लोभ जडल्यामुळें व चंद्राच्या पाटल्या मयतानें तिला दिल्यामुळें हा द्वेष उत्पन्न झाला आहे. लाटणें हें चंद्राच्या घरातील असल्याचें मला ठाऊक आहे. व त्याचाच तुकडा तोडवून सदूकडून मूठ बसवून आणल्याचें हीं मला माहित आहे सुरी चंद्राचीच आहे. आरोपी नंबर २ रामा हा अलीकडे दोन तीन महिन्यापासून चंद्राचे घरीं नेहमीं येत असतो. त्याचा आणि तिचा येकांतही होत असे. मयत झाल्याच्या दिवशीं दिवसा चंद्रा व तो बोलत असतानां मी तिचें लुगडें वाळत घालण्यासाठी जाते तोंच मला पाहून त्यांचें बोलणें बंद झालें. मी आज काम फत्ते करीन असे शेवटले रामाचे शब्द ओझरते माझ्याकानीं आले. दिवसास चंद्राकडे काम करून मी जाते.

(क्रास)प्र—तूं चंद्राच्या घराशिवाय आणखीं दुसरे कोठें मोल मजुरी करतेस किंवा काय? चंद्राच्या घरीं काय काम करतेस व तुला मजुरी काय मिळते?

उ:—मी दोन चार ठिकाणीं मोल काम करते. दळण,

धुणे, भांडी घासणं, वेणीफणी करणं वगैरे कामें मी करते. त्याबद्दल चंद्राकडून मला दरमाहा दोन रुपये मिळतात.

प्र:—मयतास चंद्राच्या घरीं कधीं पाहिला होतास का?

उ:—पहिल्यानें नेहमी पाहत होते. मध्यें कांहीं दिवस येत नसे. आलीकडे मयताची बायको माहेरी गेल्यापासून नेहमी येत असे.

प्र:—मयताला मरण्याचे पूर्वी कधीं पाहिला होतास का?

उ:—मेल्याचे दिवशीं मी भांडीं घाशीत असतांनां तो चंद्राचे घरीं बसला होता व आरोपी रामा हाही होता. त्यावेळेस दिवसाचे सुमारें बारा वाजले होते.

प्र:—ते काय बोलत होते?

उ:—त्या रात्रीस मयताचे घरीं जेवण करंण्याचें त्यांचें ठरलें रामालाही जेवायला बोलाविलें.

प्र:—त्या दिवशीं पुन्हा तूं चंद्राच्या घरीं गेली होतीस का?

उ:—होय संध्याकाळीं तिचें लुगडें वाळत घालण्यास गेले होतें.

प्र:—तेव्हा चंद्रा काय ह्मणाली?

उ:—काम लवकर आटप. मला बाहेर जायचं आहे असें ह्मणाली, आणि ती व मी बाहेर जाण्यासाठीं घरांतून निघालों. चंद्रा मयताचे घरीं गेली व मी पुढे आपले घरीं गेले.

प्रः–त्यावेळेस दिवस किती होता?

उः-दिवे लावण्याची वेळ होऊन गेली होती.

शिपाईः–गोपाळा हजर है?

गोपाळाः–सुरी मला दाखवली तिची मूठ मीच बसवून दिली आहे. पुराव्यांत दाखल असलेला लाटण्याचा अर्धा तुकडा याच्या दुसऱ्या अर्ध्या तुकड्याचीच मूठ केल्याचे मला वाटतें. या गोष्टीला आजमासें महिना दोन महिने झाले असावे. सदूने मूठ बसवून नेली.

( क्रासः )–मुठी बद्दल काय मजूरी मिळाली?

उः–दोने पैसे.

शिपाईः–सखू हजर है.

सखूः–मयत मुकुंद शेट माझ्या ओळखीचा आहे. वर्ष दीड वर्षा पासून त्याचीं माझी दोस्ती आहे. त्याणें दोस्तीच्या संबंधांत आठ तोळ्याच्या पाटल्या दिल्या त्या माझ्या हातांत आहेत. चंद्रा नायकीण हिचा व मयताचा संबंध होता असें मी ऐकून आहे. पाटल्या दिल्यावर सुमारें आठ दिवसांनीं चंद्रा मज कडे येऊन डाफरून ह्मणाली कीं माझा माणूस तोडलास आणि पाटल्याही गिळून बसलीस, या प्रमाणें तिणें पुष्कळ बडबड केल्यावर मी तिला घरातून घालवून दिली. या गोष्टीस सहा महिनें सुमारें झाले असावे. चंद्राचा व मयताचा तंटा पाटल्यावरून झाला होता, त्यामुळें कांहीं दिवस त्यांचे त्याचें वाकडें होतें. अलीकडे महिन्या दीड महिन्या पासून

आरोपी नंबर २ रामा याणें पुन्हा तिची व त्याची समजूत करून दिली. व रामा, चंद्रा आणि मयत हे अलीकडे मोठ्या लोभानें वागत होते. मयत, मरणा पूर्वीं आठ दहा दिवस मजकडे येत नव्हता. यामुळें मला मयताच्या मरणाबद्दल कांहीं हकीकत माहीत नाहीं.

(क्रास)प्रः–आरोपी रामाला तूं ओळखतेस का ?

उः–ओळखतें. तो या गावचाच आहे.

प्रः–तो कधीं तुझे घरीं येतो का ?

उः–मागें येत होता. परंतु त्याची चाल चांगली नसल्या मुळें मी त्याला येण्याचे बंद केले.

शिपाईः–शिदोजी आबाजी पोलीस पाटील हजर है.

शिदोजीः–माझे नांव शिदोजी आबाजी पोलीस पाटील, उमर वर्षे ४९, धंदा पाटिलकी. आरोपी रामा हा आमचे गावचा राहणारा आहे तो जातीचा मराठा आहे. याला शेतवाडी वगैरे कांहीं नाहीं. मजूरीसही जात नसतो गावांतील डांबिस लोकांत याची गणती आहे. चोरीच्या कामांत याला एक वेळ शिक्षा झालेली आहे. हा दांडगा व साहसी आहे. आमचे कडे हजीरींत दाखल आहे. गुन्ह्याच्या रात्रीं दोन वाजतां चाली प्रमाणें याचा तपास केला. याणे हाक दिली. पुढे दुसरें दिवसा पासून हा दाखलाघेतल्या वांचून बाहेर गावीं गेला होता, तेथून गुन्हा झाल्या नंतर पोलिसानें पकडून आणला.

( क्रास ):–तुह्मी पंचनामा केला का ?

उः-होय. तो आह्मी केला आहे. मयत मुकुंद शेट याचा खून झाल्याचें आमचे नजरेस आलें.

प्रः-तपासांत काय मिळालें ?

उः-कोर्टानें दाखविलेली सुरी, मयताचें घरीं मिळाली व उमाचे सांगण्याधरून लाटण्याचा तुकडा चंद्राच्या घ-रांत सांपडला व पातळ करवतीं कांठीं हेहीं मिळालें.

प्रः-आरोपी रामा यास कशा वरून पकडला ?

उः-उमाच्या सांगण्यावरून व त्याच्या नेहमीच्या वर्तणुके वरून त्याला धरून आणला.

**सिव्हिल सर्जनः**-( यांची साक्ष ) मयताचा खून होऊन तो मेला व जी सुरी पोलिसा कडून आली त्याच सुरीनें मयताचा प्राण घेतलेला असावा व ती जखम दुसऱ्यानें केलेली आहे. कारण मानेस झालेल्या जखमेशीं व सुरीशीं मेळ जमतो झालेली जखम प्राण जाण्या सारखी आहे कारण सुरीच्या घावानें प्राण तंतू तुटून गेले असल्यामुळें मय-चा प्राण गेला असा आमचा अभिप्राय आहे.

( क्रास ):-मयत मुकुंदशेट याचामुर्दा तुमचेकडे आला त्याबद्दल काय तपास झाला व काय समजून आलें ?

उः-मुर्दा बरोबर आलेलीं सुरी हिशीं व मयताचे मानेस लागलेल्या जखमेशीं मेळ मिळत असल्यामुळें त्यांच सुरीचा घाव लागून मयत मेला असावा, कारण ती जखम सुरी भोसकून झालेली आहे.

प्रः—मुरदा फाडला होता कां? व फाडला असल्यास काय दिसून आलें ?

उः—होय. मुरदा फाडला होता. पोटांत कांहीं विषारी जिन्नस मिळाला नाहीं पण दारूची घाण आतिशय येत होती

प्रः—सुरीची जखम दुसऱ्यानें केलेली अगर स्वतः करून घेतलेली किंवा सहजी झालेली आहे. यांतून कसं दिसून आलं ?

उः—सुरी दुसऱ्यानें भोसकल्या मुळें जखम झालेली आहे, हातानें किंवा सहजी झालेली नाहीं.

प्रः—हें कशावरून ?

उः—रक्तवाहिनी मानेचें प्राणतंतू जोरानें घाव बसल्यामुळें तुटून काळजावर रक्त सांकळून प्राण गेला आहे. हें काम हातानें किंवा सहजगत्या लागल्यानें होत नाहीं.

ग०प्रासीक्युटरः—आरोपी नंबर १ चंद्रा हिची जबानी होण्या विषयीं कोर्टाची परवानगी असावी.

कोर्टः—ही जबानी घेण्याला कोर्टाची परवानगी आहे.

( चंद्राची जबानी )

कोर्टः—तुझं नाव काय?

उः—माझे नांव चंद्रा, आइचं नाव कोंडाऊ, उमर वर्षें २१, जात मराठी.

प्रः—मयत मुकुंद शेट सोनार यांचे मरणाबद्दल हकीगत तुला काय ठाऊक आहे ती सांग?

उः-मी मयताचा खून केला नाहीं व करविला नाहीं मयताची माझी दोस्ती होती. त्याणें माझ्या पाटल्या सखू नायकीणीला दिल्या पासून मी त्याशीं फारशीं बोलत नव्हते. सुरी माझी आहे किंवा नाहीं हे ओळखतां येत नाहीं लाटण्याचा तुकडा माझ्या घरातील आहे किंवा नाहीं हे ही ओळखतां येत नाहीं. त्याचा तुकडा तोडून मूठ बसविली किंवा काय हें मला आठवत नाहीं. रामा माझ्या घरीं येत जात असतो. मैना माझे घरीं आज दोन वर्षा पासून काम करीत असते. शेजारिण उमा व तिचा मुलगा सदु हे नेहमी माझ्या घरीं येत जात असतात. सखुचा व माझा पाटल्याच्या संबंधांत तंटा झाल्याचें स्मरत नाहीं; मयताची व सखूची दोस्ती असल्याचें मी ऐकत होते. माझ्या हतांत पाटल्या होत्या त्या माझ्या असून दोस्तिच्या संबंधांत मयतानें काढून घेतल्या व त्या सखूला दिल्याचें ऐकल्यावरून मी एक दिवशीं तिच्या इथ सहज जाऊन त्या तिच्या हातांत असलेल्या पाहिल्या.

तारीख ५ आक्टोंबर रोजीं तूं कुठं होतीस?

उः-मी आपल्या घरीं होतें.

प्रः-त्यादिवशीं रात्रीं तूं कोठें जेवलीस?

उः-त्या दिवशीं मला गुरुवारचा उपास होता त्या मुळें मी जेवले नाहीं.

प्रः–रामा व मयत त्यादिवशीं तुला केव्हां भेटले होते ?

उः–रामा दुपारी भेटला होता व मयत भेटला किंवा नाहीं तें स्मरण नाहीं.

प्रः–मयताच्या घरीं त्या दिवशीं रात्रीं जेवणाचा बेत केला होताका?

उः–त्या दिवशीं नाहीं.

प्रः–तर केव्हां ठरला होता ?

उः–त्या दिवसाच्या पूर्वीं दोन चार दिवस अगोदर मी मयतास सहज बोलले कीं आह्माला तुमच्या घरीं एखाददा जेवायला कधीं बोलावणार ? बाई आल्यावर तर जमणार नाहीं.

प्रः–मग मयत काय ह्मणाला व त्याळेवेस आणखी कोणी होतं काय?

उः–मयत ह्मणाला आज रात्रीं. या वेळेस आरोपी रामा तिथं होता.

प्रः–मैना मोलकरीण होती का?

उः–आठवत नाहीं.

प्रः–त्या दिवशीं मयत तुझ्या घरीं निजायला आला होताका ?

उः–आला नाहीं.

प्रः–तो कां आला नाहीं याचा तूं तपास केलास का?

उः—नाहीं तशीच निजून राहिले.

प्रः—मुकुंद शेट मेल्याची खबर केव्हां तुला समजली?

उः—शुक्रवारी सकाळीं समजली.

प्रः—तूं मग त्याच्या घरीं गेली होतास का?

उः—मी गेलें नाहीं.

प्रः—तूं कां गेली नाहींस?

उः—मी भ्याले. कारण तो काल चांगला होता आणि त्याचा एकदम खून होऊन तो मयत झाला ह्मणून मी गेले नाहीं.

प्रः—पोलीस तपासण्या करिता आले त्या वेळेस तूं काय करित होतास?

उः—बहिणीच्या गावीं जाण्याचा माझा बेत असल्या मुळें मी आपली तयारी करित होते.

चंद्राला कोर्टाचे प्रश्न—

प्रः—तुझ्या घरीं मोलानें काम कोण करते.

उः—हल्ली दाखवलेली मैना ही काम करते.

प्रः—आरोपी रामा तुझे घरी येत असेकां? व मयतही येत होताकां?

उः—होय. दोघेही येत असत. आमचं कसबिणीचंच घर आहे.

प्रः—रामाची व मयताची तुझी दोस्ती आहेकां?

उः—रामाची व माझी दोस्ती नाहीं मयताची होती.

प्रः—मयताचा व तुझा कांहीं दिवस बेबनाव झाला होताका ? व कारण काय ?

उः—माझ्या पाटल्या त्यानें घेतल्यामुळें व त्या सखूस दिल्यामुळें बेबनाव झाला.

प्रः—पुन्हा तुमचा समेट कसा झाला?

प्रः—तो आपण होऊन येऊं लागला त्याला मी प्रतिबंध केला नाहीं.

प्रः—कोर्टासमोर असलेला लाटण्याचा तुकडा व सुरी आणि पातळ ह्या जिनसा कोणाच्या आहेत ?

उः—पातळ मयतानें मला दिलेलें आहे. लाटण्याचा तुकडा व सुरी याबद्दल मला कांहीं ठाउक नाहीं.

प्रः—ह्या जिनसा कुठें मिळाल्या ?

उः—माझे घरी झाडा झाला त्यांत मिळाल्या

ग०प्रासिक्यूटरः—या कामांतील आरोपी रामा यास जर माफीचा साक्षिदार केला तर या संबंधीं खरीहकीकत समजून येईल.

कोर्टः—गुन्ह्याचा खरा व पुरा मजकूर रामा सांगेल तर त्याला कोर्ट माफी देईल.

प्राः—रामा, तूं खरा मजकूर सांगशील तर कोर्ट तुला माफी देईल, त्याप्रमाणें तूं माफीचा साक्षीदार

होण्यास कबूल आहेस काय ?

रामा:-होय मी कबूल आहे.

प्र०-या खटल्यांत मयत कशानें मेला वगैरे सर्व सांग ?

रामाची जबानी:-मयत मुकुंदशेट याला मी ओळखतों. आरोपी नंबर १ चंद्रा नायकीण हिला मी ओळखतों. माझा धंदा हरकाम करण्याचा आहे. सुमारें तीन महिनें झाले, चंद्रानें मला घराकडे येऊन जा काम आहे ह्मणून बोलावलें. मी गेलों, तेव्हां मला पाटल्याची व तिच्यावरची मयताची दोस्ती तुटल्याची सर्व हकीकत तिणें मला सांगितली. आणि ह्मणाली कीं या मेल्याचा सूड जर उगवशील तर मी तुला माझा घरधनी करीन. असें ह्मणून पुढें आह्मी उभयतां अती प्रेमानें वागूं लागलों व असा बेत केला कीं मयताशीं आतां वाकडें न राहतां चांगले सलगीनें राहून हें आपलें कार्य करून घ्यावें. त्या प्रमाणें चंद्रानें पुन्हां त्याच्याशीं ममतेचा घाट घालून त्याला आपलासा करून घेतला, व चंद्राच्या येथें मी नेहमी असल्यामुळें माझा व त्याचाही चांगला लोभ जमला. आह्मी तिघे मोठ्या स्नेहानें वागूं लागलों. परंतु आमचा उभयताचा विचार आपला मतलब साधण्याचा होता. सुमारें आठ दिवस झाले. तारिख मित्ति माहित नाहीं, त्या रोजीं दिवसा चंद्रानें मयतास सांगितलें कीं,

आतां तुझी बायको इथं नाहीं आह्माला जेवण दे तुझी बायको आतां लवकरच येणार सबब पुढें बेत जमणार नाहीं. ती गोष्ट मयतानें कबूल करून मलाही जेवायला येण्यास सांगितलं, व रात्रीचा बेत केला. स्वयपाक चंद्रानें केला. त्यांत मास, दारू वगैरे आणली होती. रात्रीचे सुमारें दहा वाजतां जेवणें आटोपलीं. मयत दारू वगैरे पिऊन झिंगला होता. चंद्राचा व आमचा पूर्वी संकेत झाल्याप्रमाणें तिनें इशारत करून मला सुरी दिली व आतां उशीर करूं नको व संधी घालवू नको असें बोलल्यावरून मी मयताचे छातीवर बसून त्याच्या मानेंत सुरी भोसकली. चंद्रानें पाय धरले होते. कोर्टानें दाखविलेली सुरी ही तीच आहे ती चंद्राची आहे. कांहीं वेळानें सामसूम झाल्यावर रात्रीचे अडीच वाजतां मी व चंद्रा आपआपल्या घरीं गेलों. दुसरे दिवशीं मी निघून माझ्या सासुरवाडीस वीरगांव येथे गेलों. तिथें आठ दिवस होतों. पोलिसानें मला तेथून धरून आणलें आहे सुरी भोसकून मी ती तिथंच टाकली.

कोर्टाचा प्रश्नः—चंद्राच्या घरीं काम करण्याला कोण येत होतं?

उः—मैना मोलकरीण येत होती.

प्रः—मयताचे घरीं जेवण करण्याचा बेत झाल्याचें

तूं व चंद्रा याशिवाय दुसरे कोणास ठाऊक असावें असं तुला वाटतें कां ?

उः-आमचा बेत ठरला त्यावेळेस मैना मोलकरीण तिथं काम करीत बसली होती. त्यावरून कदाचित् तिला माहीत असेल.

प्रः-तुला पूर्वीं कधीं शिक्षा झाली होती कां ?

उः-होय. घरफोडीच्या कामांत दोन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली होती पण तो मजवर अन्याय झाला होता.

प्रः-तूं काय उद्योग करतोस ?

उः-गावांत इकडेतिकडे फिरून कांहींतरी मिळवतों

गवरमेंट प्रासिक्यूटरः- या कज्जांत कोर्टा पुढें झालेल्या पुराव्या वरून हा खून आरोपी चंद्रा इनें केल्याचे कोर्टाचे नजरेस येईल. कारण पुराव्यातील सरकार तर्फे माफीचा साक्षीदार रामा हा आपण व तिनें मिळून खून केला असें कबुल करतो. व सुरी चंद्राची असे ओळखतो असें तो सांगतो. व त्या गोष्टीस प्रत्यंतर नंबर ३ चे साक्षीदाराच्या मेळ पडतो. चंद्राची व मयताची दोस्ती असून शिवाय मयतानें तिचें सोनेही घेतलें आणि तिची दोस्ती सोडून दूसरीकडे रममाण झाला या द्वेषामुळें चंद्राची अदावत मयताचा प्राणघेण्या पर्यंत वा-

ढली. हेंही आरोपी चंद्राच्या सांगण्या वरून कोर्टाची खातरी होईल. पोलिसच्या तपासा खेरीज सुरीस घातलेली मूठ अकस्मात चौकशींत पुढे आली आहे, व ती मुद्देमाल सुरीच्या मुठीशीं मिळते याचा विचार व्हावा.

आरोपी तर्फे वकील:—या कज्जांत कोर्टासमोर आलेल्या पुराव्या वरून आरोपी चंद्रा इजवर शाबिती असावी असें मला वाटत नाहीं. कारण चंद्राही बायको मनुष्य आहे. घरची एकटी आहे. तिला कोणाची मदत नाहीं. सुरी चंद्राची असेल असं जरी मानलं तरी मयताची व तिची बरेच दिवस पूर्वीची दोस्ती होती. या संबंधांत कोणत्याही कारणानें सुरी मयताचे घरीं जाण्याचा संभव आहे. चंद्रानेच ती नेली अशा बद्दल पुरावा नाहीं लाटणं जुनं वसुरीची मूठ या लाकडांशीं परस्पर मेळ पडतो असं मानलं तरी हे अनुमानच आहे. लाटण्याचा तुकडा सुरीच्या मुठीशी जुळतो हें जरी खरं मानलं. तरी एखादे वेळेस असा अकस्मात संबंध जुळून येईल ह्मणून या मुद्यावरच कोर्ट बळकटी देईल असें वाटत नाहीं. मयताचे व तिचें वाकडें आलें त्या प्रमाणें जगांत पुष्कळ उदाहरणें होतात ह्मणून त्यावरून खून तिनेंच केला असें ह्मणतां येणार नाहीं. या कज्जांत चंद्रानें खून करण्याचा पूर्वी संकेत केला व त्या प्रमाणें

मयताचे घरीं गेली असा पुरावा कोर्टा पुढें आलेला नाहीं आरोपी रामा हाही पूर्वीं गुन्ह्यास ना कबूल असोन पुढें माफी झाल्यामुळें जिवाच्या आशेस्तव दुसऱ्यावर ढकलून आपण मोकळा होण्याच्या आशेनें बोलतो. त्यास त्याला कायद्याचें तत्व माहित नसल्यामुळें तो घाबरेपणानें आपला प्राण वांचविण्या करतां तिच्या प्राणाची पर्वा करीत नाहीं माझ्या मतें आरोपी नंबर १ व २ हे दोघेही निर्दोष आहेत. मयत यास दारू पिण्याची आदत असोन, घरीं एकटा असोन कांहीं ऐपत वालाही आहे दारूच्या अमलांत गुंग होऊन पडला असेल आणि दुसरे कोणीतरी येऊन त्याचा प्राण घेऊन कांहीं चोरीही करून गेला नसेल असें कोर्टाच्या मनांत कां येऊं नये ? कारण मयताच्या हातांत सोन्याचीं सलकडीं असल्याचे त्याची बायको सांगते व ती मयताचें प्रेतावर मिळाली नाहींत. या वरून आरोपी हेच खुनी असतील असें कोर्ट मानील असें वाटत नाहीं. या तपासांत पोलिसाच्या फार चुका व घालमेली आहेत. मुद्यांची तपासणी बरोबर झाली नाहीं. झालेले तोंडचे साक्षीदार बनावट असावेत आणि मुख्य गोष्ट तपासांत पूर्वींचा आरोपीचा गुन्हा करण्याचा संकेत झाला असल्याचा पुरावा यांत कांहीं नाहीं. या वरून तो पोलि-

सास आरोपीचा संकेत नसल्यामुळें तो पुरावा मिळा-
लाच नाहीं. माफी कबूल करण्याविषयीं ही पोलिसाची रामास शिकवणी असावी असें वाटतें. कारण पोलिसाचेच ताब्यांत तो असतो. मयत दारू प्याला होता आणखी तेथें त्या बाटल्या वगैरे पडलेल्या असल्याचें पंचनाम्यांत काहींच नमूद केलें नाहीं. मयताचा मुर्दा पडलेल्या जागेच्या स्थितीचेंही वर्णन झालें नाहीं. यावरून आरोपीनें खून केला असेल असें कोर्टाचे नजरेस येईल असें वाटत नाहीं.

( कोर्टाचे जुरीला कज्जा समजावून देणं )

**कोर्टः**—या कज्जांत माझे नजरेस आलें तें मी आपणास कळवतो. या खटल्यात मयत मुकुंद शेट याचा खून आरोपी नंबर १ चंद्रा नायकीण इने हजर राहून आरोपी नंबर २ रामा याजकडून कोर्टांत हजर असलेल्या शस्त्रानें खुन करविला असें कोर्टाचे नजरेस येतें. कारण झालेल्या चौकशींत पूर्वीची स्थिती आणि नंतरची स्थिती आरोपीचे मयता बरोबर तेढेपणा असल्याची खात्री होते व त्याचें दृढ कारण होण्यास आरोपी नंबर २ रामा यास माफीचा साक्षीदार केल्यावरून झालेले साक्षीनें खात्री लायक मयताचा खून आरोपीनेच केला असें सिद्ध आहे. व प्रत्यंतर पुराव्यावरून प्रेता जवळ मि-

ळालेली सुरी आरोपी नंबर १ चे घरची आहे असे नंबर ३ चे साक्षीवरून सिद्ध होतें व द्रव्य आणि दोस्ती संबंधी चुरस मयता बरोबर आरोपीची असल्याचें उघड शाबीत आहे. असे संबंधांत केवळ आक्रसानें बहुतेक खून होतात त्या प्रमाणें आरोपी चंद्रा इने पिनल कोड कलम ३०२ प्रमाणें हा खून केला असा आमचा अभिप्राय आहे याचा विचार होऊन आपले मतास काय येतें तें कळवाल असें मी इच्छितों.

( ज्यूरी मतासाठी चेंबरमधें जाऊन बाहेर येतात )

फोरमनः–सदरहू गुन्ह्यातलि झालेल्या चौकशीचा विचार केला. हा गुन्हा आरोपी चंद्रा इने केला असें शाबीत होतें. परंतु प्रत्यक्ष खून करणारी ही नसून गुन्ह्याचें ठिकाणीं हजर राहून गुन्ह्याला पूर्ण उत्तेजन देणारी ह्मणजे मयताचा खून करतेवेळेस त्याचे पाय वगैरे धरून खुनास साह्य केलें आहे यामुळें ही पूर्ण अपराधी होते. तत्रापी स्त्रीजाती असल्यामुळें शिक्षेच्या संबंधांत नजरेस येईल तर कोर्ट य.चा विचार करील. रामाला कोर्टानें माफी दिल्यामुळें या गुन्ह्याचा खात्रीलायक खुलासा झाला याविषयीं आह्मास फार आनंद वाटतो कीं मूळ गुन्हा वारंवार होण्याचें बीज चंद्रा इला शिक्षा झाल्यास तें बीज नाहिंसे होईल व पुढें कोणावर असा प्रसंग येणार नाहीं, ( फोरमन बसतो. )

कोर्टः–या गुन्ह्याची चौकशी आमचे समक्ष हजर असलेले जूरर्स याच्या मदतीनें चालल्यात मुकुंद सोनार याचा खून दोस्तीचे व द्रव्याचे आक्सानें आरोपी चंद्रा आईचें नांव कोंडाऊ इनें केला असें प्रत्यंतर माफीचा साक्षीदार रामा याचे सांगण्यावरून व त्याचे प्रत्यंतरास साक्षिदार नंबर३ मैना व नंबर२उमा व सदू व सुतार व मुदेमाल सुरी आणि लाटण्याचा तुकडा आरोपीचे घरांत मिळालेला आरोपीचा असल्याचें शाबीत झालें यावरून हा गुन्हा चंद्रा इणे केला असे कोर्टाचें नजरेस येतें. जुरर्स यांचेही आमचे मतास अनुमोदन मिळत आहे. चंद्रा इनें हा खून प्रत्यक्ष जरी केला नाहीं तरी तिणें शस्त्र दिलें व मारण्यास रामा यास उत्तेजन देऊन त्याजकडून मयतास वार करविला. आपण पाय धरलें होतें, त्या योगानें तो मयत झाला तेव्हां कायद्याचें दृष्टीनें तिनेच खून केला असें सिद्धहोतें. परंतु ही स्त्री जाती असल्यामुळें कायद्याचे तत्व तिच्या ध्यानांत आलें नाहीं. आपण मयतास घाव मारला नाहीं एवढ्या वरून आपण खून केला नाहीं अशी तिची समजूत दिसते. परंतु ही पूर्ण अपराधी आहे. या वरून कोर्टाचा हुकूम कीं ता. ५ माहे अक्टोंबर सन १८९९ इसवी रोजीं दोन प्रहर रात्रीस किंवा त्या सुमारास आरोपी चंद्रा

इनें माफीचा साक्षिदार रामा याचे साह्यानें मयताचे घरांत त्याजला जेवण घालून व दारूच्या निशेनें धुंद करून खून केला सबब इंडियन पिनल कोड कलम ३०२प्रमाणे गुन्हा शाबीत आहे. करतां आरोपी चंद्राइनें जन्मपर्यंत काळेपाण्यावर राहावें असा ठराव कोर्टानें केला आहे. आरोपी रामा माफीचा साक्षीदार केला असल्यामुळें त्यास सोडून देण्यांत आलें आहे. ह्या खटल्यांत पोलिसाकडून तपासाचें कामीं पुष्कळ चुका व हयगय झालेली आहे. रामा यास माफी दिल्यामुळें ह्या गुन्ह्याचा स्पष्ट खुलासा झाला. व त्या मुळें पोलिसाचे कर्तव्यास झांकण पडलें. तथापि पुढें पोलिसांनीं गुन्ह्याचे तपासांत फार कायदेशीर रितीनें वागले पाहिजे.

ता. ६ सोमवार माहे नोवेंबर सन १८९९ इसवी.

अंक पांचवा समाप्त.

चुरूं लागले. काल गाण्याला गेलों होतो. आणि आज आफीसांत कामही चेपून होतं, त्यामुळें क्षणभरसुद्धां आडव आंग करायला वेळच झाला नाहीं.

चंदुलाल–गाणं जमलं नाही ह्मणतात चांगला.

मन्याबाः–कशाच राव गाती ती वेंगरूळ चिमी. तिला ऑवी करायला न्हाइ येत आन उगच आपलं.

रघुः–गाण बरं झालं, पण आरंभालाच रात्र झाली

चंद्राः–चिमणी कां गायला आली होती ? ती काय गाईलतं आहे ठाऊक. पण ह्मणतातना तशांतली गत; आवडीला मसण गोड. मनांत लोभ असला ह्मणजे सर्व नीट नाहींतर रंभा आली तरी तिला कोण पुसतो. असो गावांत आहेत माझ्या दोन सवती ह्मणून मंडळीना उगींच समाधान तरीं होतं मग इथं कशाला मंडळी येणार ?

रघुः–( उठून ) गडे मी येतों आतां बरीच रात्र झाली.

चंद्राः–वा हें काय बर ? अंमळ बसा.

रघुः–( बसतो ) इथे आलें ह्मणजे हेंच पडतं. सुटका होत नाहीं. आणि जावं असं वाटत नाहीं.

चंद्राः–अहाहा ! काय चंद्राची प्रीती अगदीं कुठं ठेवायलाच जागा नाहीं. तिच्या वांचून क्षणभर करमत नाहीं आजून ओळख पडून आठ दिवस झाले नाहींत

रघुः—या दिवसांत पाणी कितीही गार केलं तरी ते पितां पितां ऊन्ह होतं. मात्र हे दिवस ऐषआरामाच्या उपयोगीं खरें. कां तात्यासाहेब खरं कीं नाहीं?

तात्याः—तें सगळं तुला ठाऊक.

चंद्राः—कोणाची आवड कशी असते कोणाची कशी असते. कोणाला उन्हाळा तर कोणाला पावसाळा शत्रू वाटतो. ज्याला भाकर पोळी जिलबी एक सारखीच वाटते व ज्यांचा मतलब केवळ पोटभरण्याचाच असतो असे कितीएक असतात. एखाद्याला जो पदार्थ आवडतो तो मिळेल तरच खाइन नाहींतर उपोषण करीन असं ते ह्मणतात. पण सर्वच पदार्थ सारखे किमतीचे आहेत असं मानल तर मग पृथ्वींत उंचनीचपणा नाहीं असंच ह्मटलं पाहिजे. तर तसं नव्हे. जगांत उंच नीच आहेत. व तसं मानलही पाहिजे. मात्र आवड ही गोष्ट निराळी आहे.

रघुः—काहो? ही तुमची समजूत पण अशीच सर्वत्रांची असेल असं तुह्माला वाटतं का?

चंद्राः—शूः शूः (पंखा हालविते) माझी वेडीची पाहिजेतो फजीती करील. (तबकातले विडे देते व तात्यासाहेबानां देतांना उजव्या हाताला दुसरा हात लावून देते)